साप्ताहिक

# माणूस


१८ मे ८५/दोन रुपये

## बालरंगभूमी



कल्पना नाविन्यात मागे,
जादुई अवास्तवतेच्या आकर्षणात,
वैज्ञानिक नाटकांची कमी संख्या,
कुमारांबाबत उदासीन,

## का?



## अमोल पालेकरांचा 'अनकही'

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : एक्कावन्नावा

¤

१८ मे १९८५

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर

पुणे वार्ता

## मॅजेस्टिक गप्पा : डॉ. लागू

'नाटक म्हणजे काय ते माहीत नव्हतं तेव्हा नाटकात काम केलं. इंग्रजी ३ री ४ थीत असेन मी. आम्हाला मुंडले मास्तर म्हणून होते. त्यांनी एक 'सवाद' लिहिला. संवाद पाठ करून बोलायचे ते नाटक म्हणून त्याला सवाद म्हणत. त्यात गोपाळकृष्ण गोखल्याची भूमिका माझ्या वाटयाला आलेली. वर्गात तासाला तालमी व्हायच्या. पण नाटकाच्या दिवशी स्टेजवर जायला छाती दडपून गेली. माझा प्रवेश न झाल्याने, संभाषणं बोलून संपलेले जोडीदार तिथून 'ये ये' म्हणून खुणवत होते. मी मात्र प्रेक्षक वर्ग बघून तसाच घट्ट मागील पडदा धरून उभा राहिलो. अखेरीस मास्तरांनी मला अगदी उचलून फेकला...मग शब्दही आठवेना. नंतर बोलायला लागल्यावर सार आठवलं. तेव्हा कानाला खडा लावला, बापजन्मी स्टेजवर पाय ठेवणार नाही....'

डॉ. श्रीराम लागू आपल्या आयुष्यातील पहिल्या नाट्यप्रवेशाची आठवण सांगत होते. मॅजेस्टिक गप्पामध्ये गुरुवार, ९ मे रोजी डॉ. लागूंची मुलाखत चालली होती. प्रश्नकर्ते होते स. शि. भावे, मगेश तेंडुलकर, माधव वझे व रविंद्र सुर्वे

त्यावेळी अत्र्यांची व संगीत नाटकं आवडत असं सागून डॉ. लागू म्हणाले, 'पण स्टेजवर जायच नाही आणि नाटकाची भयंकर आवड या कात्रीत १०–१२ वर्षे गेली. नतर मात्र गडकऱ्यांच्या नाटकामुळे परिणाम झाला मग फर्ग्युसनमध्ये शिकताना नाटकात भाग घ्यायचे ठरवले पण तिथंही 'ट्रायल'चं नाव ऐकून पळालो. मग दोन वर्षांनी स्वतःच ड्रामा सेक्रेटरी झालो व आपल्याला आवडणाऱ्या नाटकात आवडेल ते काम स्वतः घेतलं. आणि तिथच भालबा केळकराशी ओळख झाली. मग बराच काळ एकत्र होतो आम्ही.'

पी. डी. ए. नाट्यसंस्थेच्या जन्माची हकीकत सागताना श्री लागू म्हणाले, 'कॉलेजनंतर नाटकाची हौस जाईना. मग भालबा केळकर, मी व जयत धर्माधिकारी या नाटकवेड्या तरुणांनी एक नाट्यसंस्था काढायचं ठरवलं. त्या वेळच्या पुण्यातील सोशल क्लब व कलोपासक या मातब्बर सस्थांनी आमची नावे 'बरे नट' म्हणून ऐकल्याने नव्या सस्थेऐवजी आमच्या संस्थेत या असे म्हटले. पण 'कीचक वध' वगैरे पेक्षा काही तरी वेगळं करायचं होतं. तेव्हा सस्थेचं नाव 'इंटर कॉलेजिएट सोशियल ड्रॅमॅटिक असोसिएशन' ठेवून पहिलंच नाटक बसवलं अत्र्याचं 'उद्याचा संसार!' हे नवीन व त्यातल्या त्यात सामाजिक म्हणून. अशी पी. डी. ए. १९५१ साली जन्माला आली.'

नाट्य कलावंताचं नाट्य शिक्षण महत्त्वाचं असत. पण त्या शिक्षणाच्या सामर्थ्याबरोबर मर्यादाही ओळखाव्या लागतात, असं सांगून डॉ. लागू म्हणाले, 'आम्ही मात्र चुकत चुकतच शिकलो. 'उद्याचा ससार' मध्ये आम्ही प्रेक्षकांना अगदी घरच्यासारखं वाटावं असं वातावरण राखल. त्यावर एक निरीक्षण असं आलं की 'उद्याचा संसार' हे नाटक नाही तर एका घराची चौथी भिंत पाडून आपण आत डोकावत असल्याचा अनुभव आला. पण यातूनच मग 'बेबदशाही' सारखं नाटकही घरगुती वातावरणात करता येणार नाही हे समजलं. अभिनय एका साच्याचा नसतो हे तिथंच शिकलो. माझ्या घडणीत पी. डी. ए. चं फार मोठं देणं आहे. अनेक समिक्षकांच्या चागल्या सूचनातून चुकत–माकत शिकलो. त्यामुळे बराच काळ गेला. पण त्याबद्दल खेदही नाही.

मुद्राभिनय आणि आवाजाच्या ताकदीचे महत्त्व सांगताना ते म्हणाले की, अभिनेत्याची काही बलस्थाने व काही मर्यादा असतात. त्या त्याच्या त्यालाच कळायला हव्यात. एखाद्याला चांगला आवाज असेल तर त्यानं आवाजाचा उपयोग करावा. चेहरा, अंगीक अभिनय असेल तर त्याचा उपयोग करावा. एक नट म्हणून किती खोलवर जाता यावर त्या भूमिकेचं यश अवलंबून असतं. के. नारायण यांच्यामुळे मी जाणीवपूर्वक आवाजाचा वापर करायला शिकलो. त्यानी एका अभिनय शिबिरात त्यावर माझी व्याख्यानं ठेवली. त्यासाठी ५–६ पुस्तकं वाचायला दिली. त्यामुळे आवाजाच्या वापराची जाणीवपूर्वक ठेवण लक्षात आली.

आपल्या 'रंगायन' च्या प्रवासाबद्दल

सांगताना डॉ. लागू म्हणाले, 'पी. डी. ए. मध्ये असतानाच 'रंगायन' चं बोलावणं आलं. तेव्हा विजया मेहतांचं 'शितू' मधलं काम पाहिलं होतं. त्यात त्या 'पुढं' गेल्याचं जाणवलं. नंतर त्यांच्याबरोबरच तेंडुलकरांची 'मादी' एकांकिका केली. तो विलक्षण अनुभव होता. मला रंगायनमध्ये काहीतरी वेगळं, ज्यादा असं मिळत होतं. त्याच बरोबर इग्लंड, कॅनडाला आल्यानंतर तनमनधनानं काम केल तर ते अप्रतिष्ठेच, गैर नाही ही जाणीव वाढत गेली. इंग्लंड, कॅनडात या क्षेत्रातले काही कर्मयोगी पाहिले.'

नाटयकलावंतानं मन व्यवस्थित ठेवावं, शरीर व्यवस्थित ठेवावं व डोकं ठिकाणावर राहू द्यावं असं सांगून ते म्हणाले, 'ॲरिस्टॉटलनं म्हटल्याप्रमाणं तो 'ॲथलिट फिलॉसॉफर' असावा. म्हणजे त्याची बुद्धी सर्वगामी असावी. कुठलाही अनुभव, विचार पसत नाही असा संकुचित विचार नसावा. ॲथलेटप्रमाणं नटाला स्वत:चं शरीर वापरता आलं पाहिजे. लवचिकपणा भिनायला हवा. यात वाद्य वाजवणारा व वाद्य तूच हे नटाचं वैशिष्टय. वाद्य मोडलं तर तुझं तुलाच ते दुरुस्त करायला हवं...हे रंगायननं दिलं.'

भालबा केळकरांबरोबर नाटक निवडीबाबत मतभेद होऊ लागले. त्यामुळे एकमेकांनी वाटा वेगळया करून घेतल्या असे श्री. लागू म्हणाले.

'हिमालयाची सावली'मधील पक्षघाताचा अभिनय हा विशिष्ट 'मसल कंट्रोल'चा विशिष्ट स्नायू आखडून धरण्याचा प्रकार आहे, तर 'सुधाकरा'च्या भूमिकेबद्दल ते म्हणाले, मी ५८ व्या वर्षी ती भूमिका केली व मी माझं वय विसरून दाखवू शकलो नाही, तर नानासाहेब फाटकानी ७० व्या वर्षीही 'सुधाकर' रंगवलाय. ती त्यांची ताकद आहे. मला नवीन पद्धतीनं 'एकच प्याला' करायचं होत या पोटी ते सार घडल.

सध्याच्या पिढीतील कलावंताबरोबर काम करताना मी चष्मा काढून (ज्यामुळे मला काही दिसत नाही) काम करतो. शरीर, बुद्धी ताब्यात न ठेवणाऱ्या लोकांबरोबर कसला आनंद मिळणार असे सांगून डॉक्टर म्हणाले, 'भूमिकेशी समरस होणे वगैरे मला पसत नाही. व्यक्तिरेखेत शिरण हे थोतांड. स्टॅनिलाव्हस्कीचं एक पुस्तक अभिनयशास्त्रावर आलं व आपल्याकडे के. नारायण काळे यांच्यासारखीही माणसं अर्ध्या हळकुडानं पिवळी झाली. काळे याच्याबद्दल आदर असूनही हे सत्य नाकारता येत नाही. मला भूमिका वाचल्यावर कलात्मक अनुभव येतो. तेव्हा मनासमोर पात्र उभं राहतं अन् तो कलात्मक अनुभव पोहोचवण्यासाठी तालमीत निरनिराळया शिडया तयार करतो. हे तंत्र प्रत्येक नटानं आत्मसात केलं पाहिजे. तर आपण नाटकात आहोत, प्रेक्षकासमोर आहोत हे क्षणभरही विसरू नये. 'समरसतेत' हे सगळं बाजूला पडतं.'

हिंदी चित्रपटातील दोन चांगल्या भूमिकांसाठी ४८ भूमिका वाईट अशा कराव्या लागतात. नटानं प्रेक्षकांसमोर दिसत राहणं महत्त्वाचं असतं. असं सांगून ते म्हणाले की, अनेक भूमिका 'इमेज'मुळे दिल्या जातात. तो व्यवसायातला भाग आहे.

नाटक दिग्दर्शनाबाबत सांगताना डॉ. लागू म्हणाले, 'नाटक-दिग्दर्शकाचा पहिला डोळा नाटककाराच्या म्हणण्यावर, आशयावर असावा लागतो, तर दुसरा डोळा 'कशाप्रकारे तो पोहोचवायचा' याच्यावर. थोडक्यात काही आशयवादी तर काही घाटवादी, आकारवादी असतात. मी स्वत: आशयवादी आहे.'

अशा गप्पांत मुलाखत संपली. मात्र संपूर्ण मुलाखतीत रवींद्र सुर्वे व मंगेश तेंडुलकर यांचे प्रश्न काही वेळा त्यानाच नीट मांडता आले नाहीत. हा कार्यक्रम माधव वझे यांनी बराच सावरून नेला; पण तेही 'ॲथलिट फिलॉसॉफर' भोवतीच फिरत होते. झाकोळ, सामना या चित्रपटाची नावेही संपूर्ण मुलाखतीत आली नाहीत याच आश्चर्य वाटलं.

एकंदर चांगल्या प्रश्नकर्त्यांची उणीव प्रकर्षानं भासली.

स. शि. भावे 'त्या प्रांतात' अनोळखी म्हणूनच वावरले.

—पांडुरंग गायकवाड

# प्रदर्शनांचा महिना

प्रदर्शन हा एक उन्हाळी उद्योग झाला आहे पुण्यात गेल्या आठ–दहा वर्षांत या 'व्यवसायाला' चांगलीच बरकत आली आहे. आता मे महिन्याची सुरुवात झालीय. साहजिकच प्रदर्शनाना असणारी गर्दीही शिगेला पोहोचलीय

सारसबागेसमोरच्या म्युनिसिपल ग्राउंडात गेली अनेक वर्षं नेमेचि भरणारं Ex-Servicemen league चं प्रदर्शन हे पुण्यातलं त्यातल्यात्यात मोठं प्रदर्शन सालाबादप्रमाणं ते याही वर्षी भरलं आहे.

या वर्षी एकूण १०८ स्टॉल्सनी निम्मं अधिक म्युनिसिपल ग्राउंड व्यापून टाकलं आहे या स्टॉल्समधील ७० टक्के स्टॉल्स दिल्लीच्या श्री. डी. पी. कोहली यानी विकत घेतले आहेत. २० टक्के स्टॉल्स दिलीपभाईंचे आहेत तर उर्वरित १० टक्के स्टॉल्स सरकारी आहेत. विद्यार्थी किंवा मध्यमवर्गीय माणसाकडे भांडवलाचा तुटवडा असतो. अशा वेळी श्री. कोहली त्याना स्टॉल्स चालवायला देतात. चालवायला देताना 'चालकाला होणाऱ्या नफ्यातील निम्मा हिस्सा त्यानी कोहलीना द्यायचा' असा किंवा यासारखा करार केला जातो

या प्रदर्शनातील एका स्टॉलचे चालक श्री. प्रकाश राजवाडे बोलताना म्हणाले, '१९८१ पासून या प्रदर्शनाचे संयोजन 'Ex-servicemen league' ही निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांची संस्था करते. प्रदर्शनाच्या समाप्तीनंतर या संस्थेला होणारा नफा हा जवानांच्या योगक्षेम निधीला (welfare fund) जातो. त्यामुळे स्टॉल्सचं वाटप करताना लाच घेण्याचे किंवा देण्याचे प्रकार सहसा घडत नाहीत.'

या प्रदर्शन नगरीतील शे-सव्वाशे स्टॉल्सच्या उभारणीचं काम श्री. छोटलाल गुजराथी करतात. त्याचा खरा व्यवसाय लाईट डेकोरेशनचा; परंतु आपण ज्या कामाना 'सामाजिक' म्हणतो त्या कामांना 'सामाजिक' असे न म्हणताही ते तसल्या कामात व्यग्र

असतात.

पन्नास पैसे खर्चून प्रदर्शन पहायला येणारा माणूस काही खरेदी करेलच असं नाही. त्यातून पुणेरी वृत्ती म्हणजे अंमळ चोखदळच! त्यामुळे तिकिटाची विक्री आणि मालाची विक्री यामध्ये तफावत ही राहतेच. परतु ती दखलपात्र मात्र नसते. 'लीग' चे मेजर पानसरे तर म्हणाले, 'स्टॉलचं रोजचं भाडं, वीजेचा वाहतुकीचा खर्च, विक्रेत्याचा पगार आणि इतर लहानसहान खर्च जर बघितले तर कुठल्याही स्टॉलला आपली विक्री पाचशे रुपयांपर्यंत तरी न्यावीच लागते त्या शिवाय त्यांना परवडणेच शक्य नाही'

या प्रदर्शनाला मिळालेला प्रतिसाद नेहमी प्रमाणेच उदंड आहे. ३१ मे पर्यंत ते चालू रहाणार आहे.

¤

मुलांसाठी आपण अगदी ठराविक साच्यातली खेळणी आणत असतो. ठराविक मोटार गाडी, ठिणग्या उडणारी पिस्तुल, डोळे उघड बद करणारी बाहुली इ. इ. याशिवाय काही खरोखरच सुरेख खेळणी आहेत हे मुलाना आणि पालकांनाही ठाऊक नसतं. अशी बरीच अज्ञात खेळणी गरवारे बालभवनच्या सभागृहात पी. बी. एंटरप्राइझसने आयोजित केलेल्या प्रदर्शनात बालमंडळींना पहायला मिळाली मुंबई, दिल्ली आदी खेळण्याच्या प्रमुख निर्मिती केंद्रातून खेळणी आणलीच होती; परतु परदेशी बनावटीची खेळणीही सयोजकानी आयात केली होती. पी. बी. एंटरप्राइझेसचे श्री. शहा म्हणाले, 'मुलाना एवढी खेळणी एकत्र पहायला मिळत नाहीत. दुकानातसुद्धा सगळी खेळणी एकाच ग्राहकाला दाखवण जागेअभावी अशक्य असत. अशा वेळी प्रदर्शन उपयोगी पडतात. शिवाय खेळण्याची जाहिरात हासुद्धा हेतू आहेच.' श्री. शहा यानी आपल्या दुकानातील खेळणी इथं विक्रीला ठेवली होती त्याचबरोबर अनेक कपन्याची खेळणी 'ऑन सेल' बेसिसवर माडून ठेवण्यात आली होती. हे प्रदर्शन ५ मे पर्यंत चालले होते

¤

याच महिन्यात आणखी एका प्रदर्शनानी पुण्यातील कलाप्रेमी मडळींचं लक्ष वेधून घेतलं. ते प्रदर्शन होतं गो. नी. दांडेकरांनी टिपलेल्या छायाचित्रांचं. या प्रदर्शनाची मूळ कल्पना आशा भोसलेंची होती. गोनीदांची नात मृणाल देव हिनं आपल्या मित्रमडळीच्या सहकार्याने ती मूर्त स्वरूपात आणली. एकूण ७३ छायाचित्रानी प्रबोधिनीचं उपासना मंदीर सजलं होतं. प्रत्येक छायाचित्रातून गोनीदाच्या कॅमेऱ्याची ताकद जाणवत होती. आधी हा गृहस्थ साहित्यिक, त्यात भटकंतीचा विलक्षण छंद शिवाय कॅमेरा या अस्त्राची अचूक जाण या तिन्ही घटकांचा एकत्रित परिणाम त्यांच्या छायाचित्रातून प्रकट होत होता. छायाचित्राखाली जोडण्यात आलेल्या कॅप्शन्सही मोठ्या काव्यात्म आणि छायाचित्रातील नेमका आशय समजून घ्यायला मदत करणाऱ्या होत्या. पं. भीमसेन जोशी, आशा भोसले, गो. आ. भट यासारख्या तालेवार व्यक्तिबरोबरच अनेक कलाप्रेमी रसिकानी या प्रदर्शनाला भेट दिली.

¤

मे महिना आला की पुस्तक प्रदर्शनाचं नुसत पेव फुटते. या प्रदर्शनाची गोष्ट निराळी असते. नव्या जुन्या पुस्तकांची जाहिरात हा तर मूळ हेतू असतोच; परंतु दुकानात पडून राहिलेल्या पुस्तकाना प्रदर्शनात मांडून, ग्राहकाला सवलतीचं अमिष दाखवून, अडकलेल्या भाडवलाची सोडवणूक करणे हा फार महत्त्वाचा हेतू यामागे असतो. ग्रथप्रेमीना पुस्तकांची माहिती मिळावी. त्यानी विकत घेऊन ती वाचावीत वगैरे सांस्कृतिक (आणि खरं तर दिखाऊ) हेतू बाजूला सारले तर वरील केवळ व्यावसायिक हेतूच शिल्लक राहतात.

पुण्यात मॅजेस्टिक, रसिक, उत्कर्ष वगैरे प्रकाशनांनी आपली दुकाने पुण्यात थाटली आहेत. सुधाकर जोश्याच्या उत्कर्ष बुक सर्व्हिसने विमलाबाई गरवारेमध्ये ३ मे ते १२ मे असं प्रदर्शन भरवलं आहे खरं तर हे प्रदर्शन लहानमुलांसाठी आहे. त्यांची आवडती कॉमिक्स, भा. रा. भागवत, सुधाकर प्रभू वगैरे लेखकांच्या अनेक पुस्तकानी प्रदर्शनाचे सभागृह भरले आहे. उत्कर्षचं साधारण हे १० वे पुस्तक प्रदर्शन आहे. मॅजेस्टिक, रसिक आदी बड्या प्रकाशनानी भरवलेल्या प्रदर्शनांचा नाही म्हटल तरी या प्रदर्शनावर परिणाम होतोच. परंतु ज्या डेक्कन जिमखाना या अनेक अंगांनी विकसित झालेल्या भागामध्ये या प्रदर्शनाचे स्थळ आहे, त्याचाही उपयोग ग्राहकांच्या प्रतिसादाच्या दृष्टीने उत्कर्षला होतो असं 'उत्कर्ष'चे श्री. डांगे म्हणाले.

गरवारे हॉलचे भाडे शिवाय इतर खर्च बघता रोजी निदान आठशे रुपयाच्या पुस्तकाची विक्री होणं आवश्यक आहे आणि तेवढी विक्री सहज होते अस उत्कर्षचं म्हणणं आहे. या प्रदर्शनासारखंच प्रदर्शन दरवर्षी भरवण्याचा उत्कर्षचा मानस आहे. या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यात भरणाऱ्या साहित्य संमेलनानिमित्त नांदेडलाही उत्कर्ष मोठं प्रदर्शन भरवणार आहे.

मॅजेस्टिक पुस्तक प्रदर्शन (उर्फ) साहित्यिक गप्पाचं यदाचं बारावं वर्ष आहे. साहित्याची जाण असलेल्या कै. केशवराव कोठावळयांसारख्या रसिक प्रकाशकानं व्यवसाय आणि रसिकता यांचा सुंदर मेळ घालणारी एक सास्कृतिक घटना दरवर्षी पुण्यात घडवायचं ठरवलं आणि त्याला प्रतिसादही उत्तम मिळाला. पधरा दिवस साहित्यिक गप्पा आणि महिनाभर पुस्तक प्रदर्शन असा हा उपक्रम लेखक–वाचक भेट घडविणारा हा उपक्रम म्हणूनच प्रसिद्ध झाला. सवंग कार्यक्रमाच्या नादी न लागता दर्जेदार कार्यक्रमाचा रसिकानी आस्वाद घ्यावा यासाठी हा कार्यक्रम विनामूल्य असतो पुस्तक पाहणे, त्याना हात लावता येणे, ती चाळून पाहणे आणि विकत घेता येणे या कै. केशवरावांच्या कल्पनेला मिळालेला प्रतिसाद वर्षोनुवर्षे वाढतोच आहे.

प्रदर्शन भरविले जाण्यामागच्या हेतुवरून प्रदर्शना प्रदर्शनात फरक करता येईल. आता गोनीदाच्या छायाचित्राचं प्रदर्शन – हे प्रदर्शन स्वच्छ सास्कृतिक प्रदर्शन होतं अस म्हणता येईल. कारण इथे विक्रीचे प्रकरण नव्हत. विक्री आली की व्यवसाय आला अणि नफा आणि अडकलेल्या भाडवलाची सोडवणूक हे दोन व्यावसायिक हेतूही आलेच. गोनीदाच्या प्रदर्शनामध्ये विक्री नव्हती. त्यामुळे वरील दोन घटकांचा प्रश्नच उद्भवत नव्हता. अर्थात प्रवेशमूल्यातून मिळालेले पैसे हे प्रदर्शनासाठी झालेल्या एकूण खर्चापेक्षा वरचढ होत असतील तर त्याना नफाही झाला असण्याची शक्यता आहे परंतु तो त्याचा हेतू मात्र नव्हता. इतर प्रदर्शने नकळत सास्कृतिक कार्यही करत होती; पण

त्यांचा मूळ हेतू मात्र शुद्ध व्यावसायिक होता आणि त्यात काही गैरही नाही.

उन्हाळ्यात पुण्याचं सांस्कृतिक अंग असं वेगानी फुलत असतं. गल्लोगल्ली शिबिरं, व्याख्यानमाला, चर्चासत्रं, प्रदर्शनं भरवून सुसंस्कृत, सुशिक्षित ( आणि 'सु' या सदरात मोडणाऱ्या ) पुणेकरांची संध्याकाळ कंटाळवाणी जाणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जात असते. एकूण काय, मे महिना हा ' मे महिन्या'सारखा सरत असतो.

—मिलिंद संगोराम

सांस्कृतिक नागपूर

## 'सागरशक्ती आकाशी'चे प्रकाशन

अनेक दिवसांनंतर नागपूरकरांना एका जिव्हाळ्याच्या प्रकाशनसमारंभाला हजर राहाण्याचे सौभाग्य लाभले. हा प्रकाशनसमारंभ अमित प्रकाशन आणि विदर्भ साहित्य संघ यांनी रविवार दिनांक २१ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता स्थानिक धनवटे रंगमंदिरात आयोजित केला होता. प्रकाशन होते तपोवनाच्या कुष्ठसेविका श्रीमती अनुताई भागवत लिखित 'सागरशक्ती आकाशी' ह्या नाटकाचे. नाटकाचे प्रकाशन जगप्रसिद्ध कुष्ठसेवक श्री. बाबा आमटे यांनी केले. प्रमुख वक्ते म्हणून न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी उपस्थित होते, तर समारंभाचे अध्यक्षस्थान वि. सा. संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांनी स्वीकारले होते.

'सागरशक्ती आकाशी' ह्या आपल्या नाटकाच्या प्रकाशनप्रसंगी लेखिकेचे मनोगत व्यक्त करताना श्रीमती अनुताई भागवत म्हणाल्या, 'हे नाटक बारा वर्षांपूर्वीच्या एका सुप्रिम कोर्ट निवाड्यावर आधारलेले आहे. पत्नीला कुष्ठरोग झाल्याने कोर्टाने नवऱ्याला घटस्फोट मंजूर केला. ह्या निर्णयामुळे तामिळनाडूतील त्या कुष्ठरुग्ण स्त्रीने आत्महत्या केली. ह्या घटनेमुळे आम्ही सारे हेलावून गेलो. आत्महत्या हे या समस्येवरील उत्तर नव्हते. समाजाशी एकाकी पण यशस्वी झुंज देणारी कुष्ठरोगी स्त्री समाजापुढे आणण्याच्या दृष्टीने मला ही नाटयकृती सुचली. कुष्ठरोगामुळे परित्यक्त असलेल्या स्त्रियांना जीवनाचा अर्थ हवा आहे. तो देण्यासाठी समाजातील गौतमांनीच या यशोधरांच्या दारी जावे.'

नाटकाचे औपचारिक प्रकाशन करताना श्री. बाबा आमटे म्हणाले, 'कुष्ठरोग हा इतर रोगांसारखाच उपचाराने बरा होणारा रोग आहे हे साऱ्या समाजाला प्रत्येक घराच्या छपरावरून ओरडून सांगा.'

'कुष्ठ रोगाविषयी सामान्य माणसांपेक्षा डॉक्टर मंडळीतच गैरसमज जास्त आहेत' अशीही कोपरखळी मारायला त्यांनी मागेपुढे पाहिले नाही.

त्यानंतर प्रमुख वक्ते म्हणून उभे राहिले न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी. त्यांनी अर्धापाऊण तास श्रोत्यांना जागच्या जागी खिळवून ठेवलं. त्यांच्या वक्तृत्वाची जात कोणती असा जर मला कोणी प्रश्न केला तर त्याला उत्तर देणे कठीण आहे. परंतु दादा धर्माधिकारी, विनोबा भावे ह्यांचे संस्कार तर चंद्रशेखर धर्माधिकाऱ्यांवर आहेतच. परंतु नागपुरी रोखठोकपणाही त्यात आहे. धर्माधिकारी मधून मधून विनोदाचाही असा शिडकावा करतात की आपण नुसते ऐकतच बसावे. आजकाल सार्वजनिक जीवनातून वक्तृत्वकला हळूहळू लोप पावत चाललेली आहे. उन्हाने अंगाची लाही लाही होत असताना एखादी थंडगार झुळुक अंगावरून जावी त्याप्रमाणे त्यांचे वक्तृत्व आहे. आपल्या भाषणात ते म्हणाले, 'कुष्ठ रोगासंबंधी जो गैरसमज पसरला आहे त्याचे डॉक्टरांनी विज्ञानाच्या कसोटीवर खंडन केले पाहिजे. स्वातंत्र्याच्या ३८ वर्षानंतरही हे सांगण्याची पाळी यावी हा दैवदुर्विलास होय. आपली समाजरचनाच खराब झाली आहे कोणत्याही गोष्टीकडे बघ्याची भूमिका घेणारे बहुसंख्य, आणि त्यात सहभागी होणारे अत्यल्प हे खरे दुखणे आहे.' कायद्याच्या मर्यादा सांगताना ते म्हणाले, 'कायदे द्रोणासारखे कलंडून जातात ते समाजाला प्रेरणा देत नाहीत, फक्त नियंत्रण करतात.' कायद्याचे सध्याचे वाभाडे निघत असल्याबद्दल चिंता व्यक्त करून न्या. धर्माधिकारी म्हणाले, 'कायद्याचे राज्य हवे असलेला समाजच प्रथम गुन्हे निर्माण करतो. गुन्हेगार नंतर येत असतो. पूर्वी पाच–सात खून माफवाले सुभेदार होते. आता स्वातंत्र्यात सब खून माफवाले सुभेदार निर्माण झाले आहेत. कायदा मोडण्याच्या तुमच्या क्षमतेवर तुमची प्रतिष्ठा ठरविली जात आहे!'

शेवटपर्यंत सर्वच कार्यक्रमाचा सूर मोठा जमून गेला. असे होते कधी कधी. कार्यक्रमाला कसलेच गालबोट कसे नाही, याचे आश्चर्य रामभाऊ शेवाळकरांच्याही चेहऱ्यावर उमटलेले दिसत होते. परंतु व्यासपीठावर श्री. बाबा आमटे, सौ. साधनाताई आमटे, श्रीमती अनुताई भागवत ह्यासारखी ऋषीतुल्य माणसे उपस्थित असताना समारंभाला गालबोट लागेलच कसे ?

—शरच्चंद्र




## राजहंसची
## दोन नवीन प्रकाशने

मराठी माणसाला "नाटक" हा आणखी एक अवयव विधात्याने बहाल केला आहे. असे अनेक कलावंत आहेत की आपली वहिवाटीची वाट सोडून नाटकाच्या बिकट वाटेकडे वळले आहेत. म्हणूनच आपली मराठी रंगभूमी एक वेगळाच घाट घेऊन मानाने मिरवीत आहे. रंगभूमीच्या या हृद्य आठवणी अगत्याने सांगण्याचा हेतु इतकाच की, आजच्या पिढीला आपल्या पूर्वसुरींची ओळख व्हावी, आठवण रहावी नि त्यांच्याबद्दल सदैव कृतज्ञता वाटावी.

साप्ताहिक माणूस मधील
गाजलेल्या लेखमालेचा संग्रह

# नाट्यपंढरी

गो. रा. जोशी

किंमत वीस रुपये

# ऊर्जा प्रश्न
## आशा उद्याच्या

प्रि. खं. कुलकर्णी

किंमत पंचवीस रुपये

श्री. कुलकर्णी यांनी या पुस्तकात ऊर्जेच्या प्रश्नासंबंधी माहिती, आपल्या देशाच्या संदर्भात दिली आहे आणि तिच्या वापरासंबंधी सर्वांची जबाबदारी काय आहे याविषयी चांगले विचार मांडले आहेत. निरंतर मिळणाऱ्या ऊर्जेच्या उपयोगासाठी माणसाचे काय प्रयत्न चालू आहेत आणि भावी काळात त्यांची दिशा काय राहील याचेही चांगले दर्शन मिळते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही सर्व शास्त्रीय माहिती व आकडेवारी, किचकट न करता, सुलभ भाषेत सांगितली आहे. विद्यार्थ्यांना आणि सर्वसामान्य वाचकांना, ऊर्जेची आजची समस्या, त्याची कारणे आणि त्यावरील उपाय याविषयी सोपी परंतु मूलभूत माहिती या पुस्तकाद्वारे होईल, असे वाटते.

वि. ग. भिडे
कुलगुरु
पुणे विद्यापीठ

## राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०
फोन : ४४३४५९

C/o श्री. वा. र. गोडे ४१, भवानी शंकर रोड, चितळे पथ कॉर्नर
जोशी वाडी, दादर (प.) मुंबई ४०० ०२८ फोन : ४२२५४५५

बालरंगभूमी

# संख्येत वाढ पण गुणवत्तेचे काय ?

शुभदा रानडे

सध्या वर्तमानपत्र उघडलं की, चित्रपट नाटकाच्या जाहिराती ज्या पानावर असतात त्या पानाचा अर्धाअधिक भाग बालनाटकाच्या जाहिरातींनीच व्यापलेला दिसतो. पूर्वी बालनाटकाची एखाद दुसरी जाहिरात इतर जाहिरातीमध्ये कशी–बशी अग चोरून उभी असायची. अलीकडे मात्र शाळाना सुट्या लागायचा अवकाश की, बालनाटकाना अगदी जोर येतो. धडाधड नव्या नव्या बालनाट्यसस्था उभ्या राहतात. कलाकार–लेखकाची टीम तयार होते आणि बालनाटकं झोकात झळकायला लागतात. त्यामुळंच अलीकडं बालरगभूमीकार आणि बालनाटक याच्यात आश्चर्यकारक वाढ झालेली दिसते. पण अशी सख्यात्मक वाढ झालेली असून, आणि बालरंगभूमीच्या वयानं बाल्यावस्थेचा उंबरठा ओलाडलेला असूनही बालरंगभूमीला खऱ्या अर्थानं चळवळीच स्वरूप आलंय असं मात्र म्हणता येणार नाही. मग बालरगभूमीवरील चळवळीनं जोर का धरला नसावा ? तांत्रिकदृष्ट्या प्रगतीच्या मर्यादा ओलाडणारी बालरगभूमी कल्पनाविन्याच्या बाबतीत किंवा विषयवैविध्याच्या बाबतीत मागं का ? बालरंगभूमीला जादूई कल्पनारम्य अवास्तवतेच इतक आकर्षण का ? ऐतिहासिक, वैज्ञानिक बालनाटकांचं प्रमाण इतक अल्प का ? बालनाटक सादर करताना निर्मात्याच्या डोळ्यासमोर कुठला प्रेक्षकवर्ग अपेक्षित असतो ? कुमारवयीन रगभूमीबाबत बालनाटककार उदासीन का ? बालनाटकं एका विशिष्ट वर्गातील बालप्रेक्षकापर्यंत मर्यादित न राहता, सर्व थरातील बालप्रेक्षकांपर्यंत पोचावीत यासाठी बालनाटककारानी काय काय योजना हाती घेतल्या आहेत. असे अनेक प्रश्न निर्माण होतात. याच प्रश्नाची उत्तर शोधण्यासाठी बालरंगभूमीशी बराच काळ संबधित असणाऱ्या सुधा करमरकर, रत्नाकर मतकरी याची भेट घेतली.

सुधा करमरकर याच्या लिट्ल थिएटरनं गेल्या वर्षीच रौप्यमहोत्सव साजरा केला. रत्नाकर मतकरी याच्या बालनाट्यने अजून रौप्यमहोत्सव साजरा केला. नसला, तरी ही संस्थाही रौप्यमहोत्सवाच्या मार्गावर आहे साहजिकच बालरगभूमीच्या पायापासून तिच्या विकासापर्यंतची अनेक स्थित्यतर या दोघानीही पाहिलेली आहेत. अनुभवलेली आहेत त्यासाठी आपापल्यापरीन धडपड केली आहे. नवीन नवीन योजना आखल्या आहेत राबवल्या आहेत. हे दोघंही प्रौढ रंगभूमीशी जेवढ्या प्रामाणिकपणे आणि निष्ठेने सबधित राहिले तेवढ्याच निष्ठेने किंबहुना जास्तच बालरंगभूमीशी सबंधित राहिले. सर्वसाधारणपणे बालरगभूमीचा 'स्टेपिंग स्टोन' म्हणूनच उपयोग केला जातो. त्यामुळ प्रौढ रगभूमीवर पावलं स्थिरावली की, बालरगभूमीला टाटा करणाऱ्याचं किंवा काठावरनं सबध ठेवणाऱ्याचंच प्रमाण जास्त. पण सुधा करमरकर आणि रत्नाकर मतकरी यानी मात्र बालरंगभूमीत अक्षरशः स्वतःला झोकून दिलय आणि थोडी थोडकी नाही वीस पचवीस वर्षं ते बालरगभूमीवर निरनिराळे प्रयत्न प्रामाणिकपणे करत आहेत.

## लिट्ल थिएटर

प्रौढ रंगभूमीचा प्रेक्षकवर्ग हा सुजाण, एक विशिष्ट वैचारिक पातळी लाभलेला असल्यान निर्मिती प्रक्रिया अधिक सुलभ होते. निदान बालरगभूमीच्या तुलनेत तरी, कारण प्रौढ प्रेक्षकवर्गाप्रमाणे बालप्रेक्षकवर्गाला गृहीत धरता येत नाही. प्रत्येक गोष्ट पुरेशा स्पष्टपणे, सहजतेन समोर माडावी लागते. त्यात त्याची करमणूक करायची असते, विचार समोर माडायचा असतो, विचार करण्याची सवय लावायची असते आणि हे सगळं त्याच्या कलाने, त्याना सहजी पटेल अशा स्वरूपातच कराव लागतं. साहजिकच बालरगभूमी हाताळण अधिक अवघड, जिकीरीचं काम. अशा परिस्थितीत वीस–पचवीस वर्षांपूर्वी जेव्हा बालनाटकांविषयीच्या फारशा कल्पना प्रेक्षकाच्या डोळ्यासमोर नव्हत्या, बालरगभूमीच स्वरूप निश्चित झाल नव्हतं, तेव्हा या दोघांनी हे पाऊल कसं काय उचलल असाव ? त्यासाठी कशी आणि काय तयारी केली असावी हे समजावून घेण महत्त्वाच होत. तेव्हा सुधा करमरकर म्हणाल्या, 'मुलासाठी काही तरी केल पाहिजे, असं नेहमी वाटायच. पण सुरुवातीला नुसता विचारच गोधळ घालत होता. त्या दृष्टीन योग्य मार्ग, विशिष्ट दिशा सापडत नव्हती. त्याच सुमारास मला अमेरिकेला जायची सधी मिळाली आणि या निमित्तानं तिकडच्या बालरंगभूमीचा अभ्यास करायला वाव मिळाला. तोच धागा मनात घेऊन मी भारतात परत आले आणि 'लिट्ल थिएटर'ची कल्पना निश्चित केली. पुढं साहित्य सघाच्या मदतीन ही कल्पना प्रत्यक्षात आणली. १९५९ मध्ये 'लिट्ल थिएटर' तर्फे पहिल नाटक सादर झालं ते 'मधुमजिरी'. परकीय कल्पना भारतीय वातावरणात बसवून हा प्रयोग आम्ही सादर केला होता या नाटकाला मात्र बरीच टीकेची झळ सहन करावी लागली. कारण या नाटकाच्या बाबतीत माझी एक चूक अशी होती की हे नाटक मी अतिशय वास्तववादी पद्धतीन हाताळल होत त्यातली चेटकीण, तिची वेशभूषा, नाटकाच नेपथ्य सारच अगदी खरं वाटावं असं त्यामुळ एकंदरीतच नाटकाविरुद्ध आरडाओरडीचा सूर असा होता की, कसली नाटकं दाखवता ? आमची मुलं हे नाटक पाहून घाबरली. रात्री झोपेत किंचाळून उठली. चागली नाटकं करायची सोडून हे कसल चेटकिणीच भीतीदायक नाटक केलय ? वगैरे. अर्थातच पुढं हे नाटक आम्ही जरा सौम्य केल आणि शाळातून दाखवले ते मुलाना आवडलही. पण मुळात बालरगभूमी हाताळण्याचा पहिला धडा मला तिथे मिळाला. लहान मुलाना तीन तास रमवायच, त्याची करमणूक करायची तर फॅण्टसी, अद्भुतता, जादूच्या करामती याच्या अगानी जायला हवे, नव्हे, माझ्या दृष्टीने तर ते अपरिहार्यच आहे. पण त्यातही सीमारेषा ठरवून घेतल्या पाहिजेत. अन्यथा काकणभर जरी पुढे गेले

तरी सपूर्ण नाटकाचा तोल ढळण्याची आणि नाटकावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. हा सगळा तोल सांभाळण्याची कसरत करत असतानाच चार शिकवणुकीच्या, समजुतीच्या गोष्टी सांगायच्या असतात. त्याही नकळत सांगत आहेत असा आभास निर्माण करून कारण मुलांना शिकवायचे म्हणजे प्रत्यक्ष पद्धतीपेक्षा अप्रत्यक्ष पद्धतीचाच जास्त उपयोग होतो.

## मतकरींचं 'बालनाट्य'

रत्नाकर मतकरी म्हणाले, 'सुरुवातीला मी सुधाच्यावरोबर 'लिटल थिएटर' मध्येच काम करत होतो. म्हणजे बालरंगभूमीकार म्हणून माझी सुरुवात झाली ती 'लिट्ल थिएटर' मध्येच. अर्थात आमची बरोबर काम करायला सुरुवात झाली ती थोडयाशा योगायोगानच. म्हणजे अस की, त्यावेळेस मी नुकताच बी ए झालो होतो. नाटक लिहीत होतो. माझी नाटकं रंगभूमीवरही सादर होत होती. त्यातल्याच एका नाटकात सुधा काम करायची. त्यामुळं आमची ओळख झाली सुधानं बालनाटक करायच ठरवल्यावर लिखाणासाठी तिन मला विचारलं. त्याआधी बालनाटक असं मी लिहिलं नव्हतं; पण एक वेगळा अनुभव म्हणून मी लिखाणाची जबाबदारी स्वीकारली. हा प्रयत्न यशस्वी झाल्यावरच खऱ्या अर्थानं मी बालनाटकाकडे वळलो 'लिट्ल थिएटर' बरोबर मी फक्त दोनच नाटकं केली. 'मधुमंजिरी' आणि 'कळ लाव्या काद्याची कहाणी' त्यानतर मी 'लिट्ल थिएटर' सोडलं. याचं प्रमुख कारण म्हणजे बालरंगभूमीकडे बघण्याच्या आमच्या दोघाच्या दृष्टिकोनात असलेली तफावत. सुधाचा दृष्टिकोन अतिशय वास्तववादी, सत्याच्याजवळ जाणारा होता तर मला जी बालरंगभूमी अपेक्षित होती ती अधिक इलॅस्टिक अशी होती मुलांच्या कल्पनाशक्तीला ताण देणारी होती. सुधानं पाश्चात्य बालरंगभूमीचा अभ्यास केला होता आणि या अभ्यासाचा तिच्यावर पगडा होता, तेच वातावरण ती भारतीय चौकटीत बसवण्याचा प्रयत्न करत होती. त्यामुळं या नाटकातली रिजिडिटी वाढत होती. ही तफावत कमी होण्याऐवजी जास्त होत होती आणि माझ्या कल्पनाबरहुकूम बालनाटक काढायची माझी स्वतःची इच्छाही मला गप्प बसू देत नव्हती. आम्ही एकत्र काम करत होतो, तोपर्यंत हे शक्य नव्हतं. त्यामुळं मी बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आणि 'बालनाट्य' ही स्वतःची संस्था स्थापन केली.

मतकरी 'लिट्ल थिएटर' मधून बाहेर पडले आणि 'बालनाट्य' या संस्थेद्वारा स्वतःच्या कल्पनानुसार त्यांनी बालनाटकं सादर करायला सुरुवात केली यामुळ बालरंगभूमीला एक नवा घाट तर मिळालाच पण हा घाटही यशस्वी झाला. 'लिट्ल थिएटर' आणि 'बालनाट्य' या संस्थांनी आतापर्यंत बरीच नाटकं सादर केली आहेत. तसंच पुनरुज्जीवित नाटकांचं प्रमाणही बरंच आहे नाटकाचं किंवा एखाद्या कलाकृतीचं पुनरुज्जीवन केलं जात. तेव्हा त्यामागं दोन–तीन कारणं संभवतात. एक तर पहिल्यादा कलाकृती मनासारखी उतरलेली नसेल तर त्याचा सल मनात खुपत असतो त्यासाठी तीच कलाकृती पुन्हा सादर करण्याचा प्रयत्न केला जातो किंवा जुनी कल्पना नव्या स्वरूपात पुन्हा माडायची असते किंवा एखादी कल्पना पूर्वी यशस्वी ठरली असेल तर कालातरान पुन्हा तीच कल्पना पुनरुज्जीवित करून यशाचं भाडवल करण्याचा व्यावसायिक हेतूही असू शकतो. बालरंगभूमीवर मुख्यत्वे करून जे विषय हाताळले जातात ते ते पऱ्या, राजे–राण्या–राजपुत्र–राजकन्या–राक्षस–चेटकीणी, जादू वगैरे हे विषय सदासतेज आहेत. काळाचं त्याना बंधन नाही. तसच बालरंगभूमीचा प्रेक्षकवर्ग बदलण्याचा वेगही जास्त आहे. त्यामुळं पूर्वापार चालत आलेल्या 'अल्लाउद्दीन आणि जादूचा दिवा' 'हिमगौरी आणि सात बुटके' यांसारख्या विषयाचं ना महत्त्व कमी झालय ना त्यातली गोडी आधी अनेकदा ही नाटक येऊन गेलेली असल्यानं या नाटकाच खणखणीत यशही डोळयासमोर आहेच. त्यामुळं बालरंगभूमीवर ज्या प्रमाणात नाटकांच पुनरुज्जीवन केल्याच दृष्टोत्पत्तीस येतं. ते पाहता बालरंगभूमी व्यावसायीकारणाच्या खोडयात अडकली असावी अशी शका बळावते; पण 'व्यावसायीकरण' या शब्दाला जोरदार आक्षेप घेत सुधा करमरकर म्हणतात, 'लिट्ल थिएटर' नं जुनीच नाटकं पुनरुज्जीवित केली आहेत, ही गोष्ट मी नाकारत नाही; पण त्यात व्यावसायीकरणाचा हेतू निश्चितच नाही. यामागं आहे ती एक साधी सरळ कल्पना. त्याला व्यावसायीकरणाचं स्वरूप दिलं समीक्षकांनी. कल्पना करा : 'मधुमंजिरी' हे 'लिट्ल थिएटर' चं पहिलं नाटक. म्हणजे पंचवीस वर्षापूर्वीचं. म्हणजे त्या काळातला बालप्रेक्षक आज कुटुंबवत्सल झालाय सांगायचा उद्देश एवढाच की, बालरंगभूमीचा प्रेक्षकवर्ग सतत बदलता आहे. तेव्हा आज नव्यानं येणारा जो बालप्रेक्षक आहे. त्याना ही जुनी नाटकं का बघायला मिळू नयेत ? कारण नाटकं जुनी असली तरी विषय कुठल्याही काळात खपावेत असेच आहेत. त्याला काळाचा गंज चढलेला नाही की, परिस्थितीचं शिळेपण आलेलं नाही, मग नव्या प्रेक्षकवर्गाला ही नाटकं का बघायला मिळू नयेत ? नाटकाचं पुनरुज्जीवन का होऊ नये ?

## विषय–कल्पनांची मर्यादा

हाच मुद्दा अधिक स्पष्ट करून सांगताना रत्नाकर मतकरी म्हणाले, 'व्यावसायीकरण केल जातं ते पैशाकडं बघून पण नाटकांचं पुनरुज्जीवन याला व्यावसायीकरण म्हणायचं झालं तर व्यावसायीकरणाची व्याख्या, त्यामागचा दृष्टिकोन सारंच बदलायला लागेल. साध बघा– नाटकाचा विषय, पटकथा या गोष्टी जुन्या असल्या तरी पुनरुज्जीवन करताना याच काय त्या दोन गोष्टी 'रेडीमेड' हातात मिळणाऱ्या बाकी कलाकार तेच घेऊन चालणार आहेत ? तेच जुनं नेपथ्य वापरून चालणार आहे ? म्हणजे कलाकार नवे घ्यायला हवेत कलाकार नवे म्हणजे नव्यान तालमी घ्यायला पाहिजेत. त्यात पुष्कळ वेळ घालवायला पाहिजे जुनं नेपथ्य ठीक असेल तर जरा डागडुजी करून पुन्हा वापरता येण्याची शक्यता आहे पण मुळात हे नेपथ्य किती दिवस टिकणार ? नेपथ्य ठेवायला जागा नाही, तिथं ते पुन्हा वापरण्याच्या स्थितीत असेल ही तर केवळ कल्पनेतली गोष्ट. म्हणजे नेपथ्य पुन्हा करून घेणं आलं. आताचा काळ लक्षात घेता पूर्वीचे दर आणि आताचे दर यात केवढा तरी फरक पडलाय. आताचा खर्च कदाचित जास्त येण्याची शक्यता आहे. पण आतल्या गोष्टीचा

पृष्ठ २९ वर

ह्या ना त्या निमित्ताने

# गप्पाच....पण साहित्यिक

फिरोझ रानडे

मुंबईच्या पुण्यात, म्हणजे विलेपार्ल्यात गेले काही दिवस गप्पांचे सत्र चालले होते. दररोज कोणी तरी चागला गप्पाकार काही चांगला विषय घेऊन त्यावर गप्पा मारत असे. काही वेळा गप्पाकाराची जुडी असे, कधी ते एकटे असत. त्यात चागले नामांकित कवी होते, लेखक होते, कवयित्री होत्या, लेखिका होत्या.

असा उत्तम कार्यक्रम दहा दिवस चालणार होता तरी राधा व श्यामला दररोज जाणे काही शक्य नव्हते; पण काही झाले तरी आजच्या कार्यक्रमाला जायचेच असा राधाने ज्या दिवशी सपूर्ण कार्यक्रमाची जाहिरात आली, त्या दिवशीच निश्चय जाहीर केला होता व आशाशी म्हणजे गोविंदाच्या बायकोशी बोलून, त्यांच्या येण्याचे पण पक्के केले होते.

ह्या कार्यक्रमात फक्त एक व्यक्ती गप्पा मारणार नव्हती तर चागल्या पाचजणी गप्पा मारणार होत्या. विषय होता 'पुरुषांच्या आत्मचरित्रातल्या स्त्रिया' वा तत्सम काही तरी ह्यातल्या बहुतेक स्त्री मुक्ती आदोलक असल्याने राधा व आशाला त्याचेबद्दल जिव्हाळा वाटत होता.

प्रथम राधाने ह्या गप्पाना जायचा विषय काढला त्यावेळची श्यामची टीका-टिप्पणी अशी :

*'अरे तुम्ही स्त्री-मुक्ती आदोलन चालवणाऱ्या बायका स्वत.ला स्वतत्र मानणाऱ्या. आणि पुरुषाच्या आत्मचरित्रात स्त्रीविषयी काय लिहिले आहे ह्याची फिकीर तुम्हाला कशाला?* व त्यावर चर्चा आणि गप्पा म्हणजे कहरच आहे.'

'तुमचे आपले नेहमी वेगळेच असते अहो आम्ही बायका ससाराकरता इतक्या खस्ता खातो, घरचे बघतो, बाहेरचे बघतो, मुलांच्याकडे पहातो, नवऱ्याला साथ देतो तर ह्या पुरुषाच्या लेखी आम्हा बायकांना काय महत्त्व दिले जाते त्याचा विचार व्हायला नको ?'

'पण ज्या गणिताचे उत्तर माहीत आहे ते सोडवायचा खटाटोप कशासाठी? ह्या सगळ्या पुरुषानी बायकाना काही किंमत *दिली नाही असाच निष्कर्ष शेवटी ह्या* पाचजणी काढतील बघ, मग त्यात गप्पा कसल्या ?'

'हे बघा तुम्ही येणार आहात की नाही ते एकदा सांगा. म्हणजे माझ मी बघून घेईन.'

आजच्या कार्यक्रमाला आशा आवर्जून व गोविंदा न आवर्जून येणार असल्यामुळे राधाला सोबतीची काळजी नव्हती त्यामुळे श्याम आला काय न् न आला काय तिचे काही बिघडणार नव्हते. त्यामुळे राधाचा हा तडक प्रश्न.

'मी कुठे नाही म्हटल ?' श्याम घाईघाईने म्हणाला, 'मला फक्त आश्चर्य वाटते ते ह्याचे की, स्त्री स्वतत्र आहे, मुक्त आहे म्हणणाऱ्या बायका पुरुष आत्मचरित्राची उठाठेव करतात पुरुष बायकाविषयी काय *म्हणतात ह्याची उत्सुकता दाखवतात.* पुरुषानी कधी अशा गप्पा मारल्या आहेत का की, स्त्रियाच्या आत्मचरित्रात त्या पुरुषाबद्दल काय म्हणतात म्हणून ?'

पण श्यामच्या ह्या गप्पा ऐकायला राधा जागेवर होती कुठे? श्याम कार्यक्रमाला येणार आहे हे तिच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. त्याचे विचार नव्हते. तेव्हा ती आपल्या कामाला निघून गेली होती.

कार्यक्रम सातला सुरू होणार होता तरी तो खरा ७।-७॥ ला सुरू होणार ह्या कल्पनेने बरीच मडळी ७।-७॥ ला पोहोचली, तशीच ही चौकडी पण ७।-७॥ वाजेपर्यंत पोहोचली.

इमारतीच्या बाहेरच्या पटागणात जाजम हंतरली होती. काही भाग पुरुषानी व काही स्त्रियानी व्यापला होता पुढे पुष्कळ जागा असूनसुद्धा ह्यानी मागेच बसायचा निर्णय घेतला. मागे बसले म्हणजे मोकळेपणी टीका-टिपणी करता येते व कटाळा आला तर उठून जाता येते, ही सोय.

असाच काही तरी ७॥ च्या सुमारास कार्यक्रम सुरू झाला. मंचावर पचकन्या येऊन बसल्या त्या दिवशीच्या कार्यक्रमाचे सचालन एक मोठ्या विद्वान व समतोल विचाराच्या प्राध्यापिका करणार होत्या. त्यानी प्रास्ताविक केले. त्यात त्या पाचजणी ज्या वेगवेगळ्या आत्मचरित्रावर बोलणार होत्या त्याबद्दल त्यानी सांगितले.

*सर्वसाधारण पुरुषाच्या व स्त्रियांच्या* आत्मचरित्राचा त्यानी आढावा घेतला. थोड्या विनोद बुद्धीने त्या म्हणाल्या, 'पूर्वीच्या थोरामोठ्याच्या, पुढाऱ्याच्या, कारखानदार वगैरेंच्या आत्मचरित्रात 'माझ्या यशामधला मोठा वाटा माझी हसतमुख व आनदी स्वभावाच्या पत्नीचा आहे.' असे वाक्य हमखासपणे येत असे.'

श्यामला बोलण्याची अगदी सुरसुरी आली. पण अगदी पहिल्यापासूनच नको म्हणून तो चूप राहिला व मनाशी विचार करू लागला.

'ह्यात विनोदी काय आहे ?' खर म्हणजे हे सगळे करुणामय आहे. खर म्हणजे ह्या मोठ्या पुढाऱ्याच्या, कारखानदार, शास्त्रज्ञ, लेखक वगैरेंच्या यशात त्यांच्या बायकाचा वाटा खरच काही नसतो.

आजकाल किर्लोस्करासारखे वा खान्यांसारखे उद्योग चालवायचे म्हणजे काही सोपी गोष्ट आहे ? कामगार प्रश्न, निर्मिती, विक्री व्यवस्था, आयकर, एक ना दोन हजार भानगडी असतात. त्या त्या विभागाचे तज्ज्ञ असतात. मोठे शिक्षण घेतलेले व कित्येक वर्षांचा अनुभव असलेले असले तरी त्याची

ऱ्हेघा होते.

तर, ज्या बाईशी, योग्य हुडा मिळाला म्हणून, वा ती उच्च घराण्यातली आहे म्हणून, वा तिचे गोत्र व पत्रिका जमली आहे म्हणून, वा अगदी ती दुसऱ्या काही गुणाकरता आवडली आहे म्हणून प्रीतीविवाह झाला आहे. ती बाई ह्या कारखानदाराला त्याच्या कामात काय साथ देईल ?

तीच गोष्ट पुढाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात, लेखकाच्या वा शास्त्रज्ञाच्या कार्याबाबत, त्या पत्नीची काय मदत असणार आहे ? म्हणजे प्रत्यक्ष त्या कामात ?

आता घर साभाळणे, मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देणे, पाहुण्यारावळ्यांची व्यवस्था ठेवणे, पतीराजाबरोबर पार्टीजना, समारंभाना जाणे हेच त्या पत्नी-लोकाचे काम रहाते व ते त्या हसतमुखाने करत असतात. का नाही करणार ? घर वातानुकूल असते, मुलं कॉन्व्हेंटमध्ये शिकत असतात, हाताखाली नोकरचाकर असतात, स्वतःची अशी गाडी असते व अमक्यातमक्याची वायको म्हणून समाजात मानसन्मान असतो.

आता एखादा उद्योगपती आत्मचरित्र लिहितो. त्यात तो हम्खास आपल्या उद्योगधद्यातल्या यशाचा मोठा वाटा बायकोला देतो खरं म्हणजे तिचा त्यात काहीही वाटा नसतो पण तस लिहिण्याची फॅशन आहे म्हणून लिहितो बिचारा. पण आश्चर्याची व थोडी दुःखाची गोष्ट अशी की त्या बायका पण अस लिहिण्याला विरोध करत नाहीत. उलट त्या 'हसतमुखाने' समतीच देतात ! आता ह्याला काय म्हणावे ?

श्यामचे हे विचार सपेपर्यंत त्या प्राध्यापक बाईंचे भाषण पण सपले होते व पहिल्या कन्येने बोलायला सुरुवात केली होती. बोलण्याकरता तिने निवडले होते किंवा तिला निवडून दिले गेले होते, प्रा. ना. सी. फडक्याचे 'माझे जीवन–एक कादबरी' हे आत्मचरित्र ! जवळ जवळ १५–२० वर्षापूर्वी ते प्रसिद्ध झाले होते.

'अरे हे काय बोलण्यायोग्य आत्मचरित्र आहे ? ज्या माणसाचे सारे आयुष्य, त्याचे सारे वाङमय आपल्याला माहित आहे, त्याच्या आत्मचरित्रात स्त्रीचे स्थान काय असणार ?' श्याम अगदी न राहवून म्हणाला.

'कोणाचेही आत्मचरित्र घेतले असतेत तरी तुम्ही तसेच म्हटले असतेत' आशाने उत्तर दिले.

'मग कोणाचे घ्यावयाचे होते हो ?' राधाने पूरक प्रश्न विचारला.

'अग, नुकतेच एस. एम. जोशीचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले आहे. अशा समाजवादी व लख्ख विचाराच्या माणसाच्या आयुष्यात स्त्रीचे काय स्थान होते हे महत्त्वाचे नाही ?'

'तुम्ही चूप रहा हो !' राधाला उत्तर सुचेना म्हणून तिने हुकूम सोडला.

त्या बाईनी प्रथमच सागितले की आम्ही पाच जणी कोणकोणत्या आत्मचरित्रांवर बोलणार आहोत ह्याची आम्हाला येथे येईपर्यंत कल्पना नव्हती व मग फडक्यांबद्दल ती सागू लागली की, फडक्यानी मराठी वाङमयात आपले 'युग' निर्माण केले व पुढे जोडले की त्यांनी अफाट लिहिले आहे. म्हणजे खूप लिहिले आहे ह्या अर्थी.

'अग बाई, युग निर्माण करणारा अफाटच लिहिणार !' पण राधाचा चूप रहा हुकूम असल्यामुळे मोठ्याने बोलण्याचीही सोय नव्हती.

बाईंचा आवाज भरून आला होता. त्याना व्यासपीठावरून बोलण्याची सवय नव्हती की फडक्याचे चरित्र नुकतेच वाचून आल्या होत्या, नकळे.

आता दुसऱ्या बाई बोलायला लागल्या होत्या. त्या बोलत होत्या विठ्ठलराव घाटयांच्या आत्मचरित्राबद्दल. त्यांनी विठ्ठलराव घाटयाच्या वेळची सामाजिक परिस्थिती खोलवर जाऊन सागितली व त्यानी आपल्या जीवनात आलेल्या सगळ्या स्त्रियाना म्हणजे पत्नी, आई, बहीण ह्यांना एक अमूर्त स्वरूप दिल्याचे सागितले.

नतरच्या बाई बोलल्या ते दोन पक्षी व एक झाड ह्या विश्राम बेडेकराच्या आत्मचरित्रावर. साधारणपणे श्रोत्याना बधू–भगिनीनो म्हणून संबोधण्याची पद्धत आहे; पण ह्या बाईंनी वेगळेपणा हवा म्हणून श्रोत्याना 'मित्र हो' म्हणून सबोधले. हा उपक्रम काही वाईट नाही; पण त्यामुळे त्या बाईंचे जे पुरुष मित्र नव्हते त्याची व स्त्री-श्रोत्याची फार कुचबणा झाली.

त्या बाई 'दोन पक्षां'वर फार बिचकत बिचकत बोलल्या.

त्यानंतर स्वतः संचालन करणाऱ्या बाई 'अनुसया आणि मी' ह्या श्री. काळे ह्याच्या आत्मचरित्रावर बोलल्या अनुसयाबाई ह्या विदर्भातल्या मोठ्या नावाजलेल्या राजकारणी बाई. काळ्यानी त्यांना सर्व तऱ्हेने प्रोत्साहन दिले व स्वतः मागे राहून त्याच्या कामात मदत केली. वगैरे वगैरे

हे सगळे होईपर्यंत ही चौकडीच नव्हे तर बरीच मंडळी कटाळली. प्रत्येक जण त्या पुस्तकाचा गाभा सांगे, काही प्रसग सागे तोपर्यंत त्यांना दिलेली वेळ सपत असे. त्यामुळे मूळ व महत्त्वाच्या गोष्टीपर्यंत म्हणजे 'स्त्रियाबाबत त्याची दृष्टी'पर्यंत कोणी पोहोचतच नसे.

पाचवी गप्पाकार दलिताच्याहीपेक्षा दलित असलेल्या समाजातल्या एका तरुणाच्या आत्मचरित्रावर बोलू लागली. तिला आपण किती बोलू व किती नको असे झाले होते. तिने एकदम त्या लेखकाची आई कोण होती म्हणजे ठेवलेली बाई होती वगैरे सागायला सुरुवात केली व त्यामुळे त्या जातीच्या लोकाना कसे आणखीनच दलितत्व येते वगैरे सांगू लागली.

'खरं म्हणजे बाकी लेखक जीवनाचे शेवटी शेवटी आपले आत्मचरित्र लिहितात, पण ही दलित मंडळी पहिल्या प्रथम आत्मचरित्र लिहितात. ह्यामागे काही सामाजिक कारणे आहेत का ? असल्यास कोणती ? ह्याचा विचार नको का मांडायला? श्यामला आता मोठ्याने बोलण्याचा धीर आला.

'ते राहू दे; पण ज्याची आई ठेवलेली बाई आहे त्याचा 'स्त्रियाकडे बघण्याचा दृष्टिकोन' काय आहे, ते ह्या बाई सागतच नाहीत.' गोविंदाने आपले मत दिले.

आता व्याख्यानांचा राधा–आशाला पण कटाळा आल्यामुळे त्यानी 'चूप बसा' म्हणून सागितले नाही.

शेवटी आता गप्पा पुरेत असे सर्वांना वाटू लागले. त्यावेळी ते चौघेही उठले व स्टेशनच्या दिशेने जाऊ लागले.

'पण मग ह्याना गप्पा का म्हणतात बरं ?' आशाने बुनियादी प्रश्न विचारला.

'मग निदान एका बाईंनी तरी पाचही पुस्तकावर बोलायचे, म्हणजे निदान सुसूत्रता तरी आली असती. पाचजणी कशाला ?' राधाही एवढे उत्साहाने आलो, त्यामानाने काहीच समाधानकारक ऐकायला मिळाले नाही म्हणून नाराज झाली होती.

'अग मण मग ते भाषण झाले असते.' गोविंदा आपले मत देत म्हणाला. 'पाचजणी व्याख्यान देतात त्या गप्पा होतात.'

'नाही तर अस असेल,' आता श्याम थोडाच मागे रहाणार होता ? 'ज्या कार्यक्रमाला श्रोते निमूटपणे म्हणजे गप्पपणे सगळे ऐकून घेतात त्याला गप्पा म्हणत असतील.'

सगळ्यांनी होकारार्थी माना हलवल्या. □

## मुक्काम बडोदा

# जहाजाबरोबर स्वतःला बुडवून घेणारा कर्णधार जसपालसिंग

मुलाखत : अविनाश भगवंत धर्माधिकारी

बिचकत बिचकतच फोन फिरवला. तिकडून उचलल्यावर मात्र नीट विचारलं –' क्या मैं जसपालसिंगजी से बात कर सकता हूँ ' आणि वाट पहात थांबलो, की उत्तर येईल नही, आत्ता घरी नाहीत, तुम्ही कोण, कशाला, त्याना वेळ नाही, वगैरे सगळं कोणता तरी किरटा किंवा भरडा आवाज सागेल रिसिव्हर आपटल्याचा आवाज येईल. असं मनातून झळकून जातय तोवर उत्तर आल ' मैं बोल रहा हूँ, भरदार आवाज. एक क्षणभर पुढचे शब्दच विसरलो. ' आपको मुझसे कुछ काम है ?' उत्तरादाखल बडोद्यात आज दिवसभर वाजवत होतो ती टेप परत एकदा वाजवली. पुण्याहून...' माणूस 'तर्फे...मुलाखत हवीय वगैरे. ही टेप इतक्या वेळा वाजवावी लागते की शेवटी रेकॉर्डरचं ' हेड ' झिजून जायची वेळ येते. साडेपाच वाजता येण्याचं आमत्रण मिळाल.

¤

जसपालसिंग. मेंदूनं उपलब्ध असलेला सगळा डेटा सादर केला, तेव्हा रिक्षा अलकापुरीकडे धावू लागली होती. एक आय. पी. एस. अधिकारी. ऑक्टोबर १९८२ मध्ये बडोद्यात प्रचड हिंदु–मुस्लिम दंगली उसळल्या तेव्हा ते बडोद्याचे पोलीस कमिशनर होते. या दंगली त्यानी ज्या तऱ्हेने हाताळल्या, आवरल्या त्यामुळे ते प्रसिद्धीच्या झोतात आले. दंगलीच्या ऐन धुमाकुळातही हा पोलीस कमिशनर स्वत: नि:शस्त्र सर्व वस्त्यांतून फिरायचा. लोकाशी बोलायचा. त्यामुळे हिंदु आणि मुस्लिम दोघाकडूनही समान दुवा मिळवत त्यानी बडोदा शात केल. इथे कुठेतरी माशी शिकली असावी. कारण जसपालसिंग हिंदूना झुकतं माप देती अशी ' कुजबूज–मोहीम ' पसरली पाठोपाठ त्याच्या बदलीची ऑर्डर निघाली. कॉंग्रेसच्या काही मुस्लिम नेत्यानी ' आपण थेट दिल्लीवरून ही ऑर्डर काढून घेतल्याची' वक्तव्य केली. इथपर्यंत सगळ ठीक होत, यात काही अनपेक्षित नव्हतं. आजपर्यंत हे असच होत आलंय; पण बडोद्यात यापुढे जे घडल ते मात्र अनपेक्षित होतं. बदलीचा निषेध करणारी लोकाचीच चळवळ उभी राहिली. ' we want Juspal ' च्या घोषणा निनादल्या. या मागणीपायी बडोदा पुन्हा एकदा तग झालं. डॉ. नेनेंनी गुजरात सरकारविरूद्ध हायकोर्टात दावा लावला. अन काय आश्चर्य, बदलीची ऑर्डर अवैध ठरवण्यात आली. लोकांनी जल्लोष केला. जसपालसिंग यांनी सरकारी नोकरीचा राजिनामा दिला. सुरतेच्या प्रातिक अधिवेशनात १९८३ मध्य त्यानी भा. ज. प. मध्य प्रवेश करून आपल्या राजकीय कारकिर्दीच खातं खोललं. जसपालसिगनी भाजपच पसंत करणं पॅटर्न-मध्ये बसत होतं. त्यामुळे डिसे ८४ मधल्या लोकसभा निवडणुकीत भाजपचा बडोद्यातला उमेदवार होता, हा माजी पोलीस कमिशनर शीख–दीड लाख मतं मिळवूनही जसपालसिगना हार पत्करावी लागली.

राजकारण बाह्य क्षेत्रातून कर्तृत्ववान व्यक्तीची आवक हे या निवडणुकाचं वैशिष्ट्य होतच. राजीव गांधी स्वत: युवक आणि आतापर्यंत दीर्घकाळ राजकारणाबाहेर राहिलेले. त्यामुळे राजकारण हा ज्याचा ' व्यवसाय ' नाही, असे खूप नवे चेहरे या लोकसभा निवडणुकीन पाहिले. प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते, विधीज्ञ, राजदूत, अभिनेते वगैरे यात मुख्य पुढाकार अर्थातच कॉंग्रेसचा होता, असणं शक्य होत. जो पक्ष निवडून येणार नाही हे ठरलेलच आहे, तिकडे जाणार कोण ? त्यामुळे नटवरसिंग, आर. के. नारायण, अमिताभ आणि कंपनीच चीज झालं; पण बिहारमध्ये निवृत्त लष्करी अधिकारी एस. एन. सिन्हा आणि गुजराथमध्ये जसपालसिंग याना मात्र भाजपनं पुरस्कृत केलं. हा ट्रेंड नतरही, थेट महापालिका निवडणुकापर्यंत चालू राहिला. उदाहरणार्थ महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकासाठी पुलोद आघाडी बनत असताना शेतकरी सघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांनी दुसऱ्या ' शरद 'ना अशी कल्पना सुचवली होती की, पुलोदनं निवडक २५–३० साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, प्राध्यापक अशाना तिकिटे द्यावीत मराठी राजकारणाच्या गणितात ही बाब कुठे बसत नसावी कारण ही सूचना अमलात आली नाही; पण महापालिका निवडणुकाना मात्र अशा उमेदवाराची रेलचेल होती. या सर्व शृखलेतला जसपालसिंग हा एक महत्त्वाचा, चमकदार दुवा.

ठीक आहे, ते बडोद्याची सीट हरले. सगळ्याच विरोधी पक्षांचा धुव्वा उडाला होता. यात अनपेक्षित काही नाही; पण अनपेक्षितपणाच एक धक्कादायक वळण पुढे वाढून ठेवलेलं होत. विधानसभा निवडणुका आल्या. जसपालसिंगना भाजपनं तिकिट दिलं नाही. जसपालसिंग अपक्ष उमेदवार म्हणून उभे राहिले. बडोद्याच्या सयाजीगंज मतदारसघातून जसपाल आणि जनतापक्ष उमेदवार यानी समसमान, सुमारे सतरा हजार मतं मिळवली. निवडून आलेल्या कॉंग्रेस

उमेदवाराला वीस हजार मते होती, तर अधिकृत भाजप उमेदवाराला सर्वांत कमी—पक्षशिस्त मोडल्याच्या कारणावरून जसपालना पक्षातून काढून टाकण्यात आलं.

मग गुजराथमध्ये राखीव जागा विरोधी आंदोलन उभं राहिल. पोलिसी अत्याचारानी या आंदोलनाला दंडुक्यानी रंगवून काढल्यावर हा माजी पोलीस कमिशनर परत रस्त्यावर आला. यावेळीही हजारो माणसं त्याच्यामागे होती. पोलिसांच्या दडुकेशाहीचा निषेध जसपालसिंगच्या तोडून प्रभावी झाला.

## व्यक्तिमत्वाचे रंग

डोळ्यासमोरून झळकून जाणारी आणि उपलब्ध तुकडे जोडून तयार होणारी ही दास्तान –ए– जसपाल इनमीन दोन–अडीच वर्षांची. त्यातही किती रग भरलेत. एक शीख अधिकारी गुजरातच्या मातीतून वर येऊ पहातोय. या तथ्यामुळे एक वेगळाच अर्थ भरला जात होता. एकूण मिळून सामोरं येणारं व्यक्तिमत्त्व रगीन, उत्सुकता ताणणार तयार होत होतं. म्हणून मनात विचार केला की त्यांची नुसती प्रश्नोत्तररुपी औपचारिक मुलाखत घ्यायची नाही. जमतील तशा स्वैर गप्पा मारायच्या. त्यातून काही सुसगत आशयाचं वस्त्र विणता येतं का पाहू. नोकरशाहीतले अनुभव, हिंदु–मुस्लिम दंगली, पक्षीय राजकारण, पजाब प्रश्न अशा सर्व रस्त्यांवरून भटकायचा इरादा बाळगून, त्यानी सागितलेल्या बगल्यासमोर रिक्शातून उतरलो.

मग नेमकं आठवेना की या खुणेच्या बगल्याच्या डावीकडचा बंगला की उजवीकडचा. डावीकडच्या बंगल्याबाहेर गाड्या, वहानं आणि माणसं दिसत होती म्हणून अंदाजानच तिथं गेलो, तर कळलं की, नाही नाही, तो पलीकडचा बंगला जसपालसिंग याचा. सुनसान, शात. माणसांचा वावर असल्याची काही चिन्हे नाहीत. दारावर 'Beware of dog' ही पाटी नाही. बेल वाजवायला हात उचलला तर समोरच्या हॉलमध्ये डायनिंग टेबल आवरत असलेला माणूस दिसला त्यानं पटकन विचारलं 'अविनाश का' जसपालसिंग तुम्हीच का असं मला विचारावंसुद्धा लागलं नाही. नावानं हाक मारणाऱ्यांशी एकदम दोस्तीच झाल्यासारखी वाटते (या तत्रात सघ कार्यकर्ते तज्ज्ञ असतात पण जसपाल तर सघ स्वयसेवक नव्हे. की यामागेही सघाचा हात आहे!) निळी पॅन्ट आणि ग्रे कलरचा इन केलेला शर्ट घातलेला तगडा पंजाबी सरदार. केस, दाढी, मिशा शिस्तीत ट्रिम केलेल्या. आवाजात आणि व्यक्तिमत्वातही पंजाबी दमदारपणा. पॅसेजमध्ये बडोद्यातल्या नागरिकानी भेट दिलेलं एक मोठं भित्तीचित्र होतं. 'We want Jaspal, We Love Jaspal' अशा मोर्चाच ते वॉटरकलरमधील 'स्मृतिचित्र' होते. ते तिथे possessively शानमधे खड होतं. हा व्यक्तिमत्वाचा किंचित दिखाऊ भाग असावा, पण त्यात काय विशेष. कित्येक राजकारण्यांच्या घरी, त्याच्याच फोटोंचं एक स्थायी प्रदर्शन भरलेलं असतच की ते फोटो पहाणं सहनशक्तीची परीक्षाच असते. त्या मानानं जसपालसिंगमध्ये ज्याचा शो करावा अस देखणेपण भरपूर आहे. शिवाय ज्याच्या त्याच्या स्मृतीशी निगडीत काही दुर्मिळ क्षण असतात. याचं चित्र डोळ्यांसमोर ठेवत जगण्यात एक गमत असते. चरणसिंग नाही का दिल्लीतल्या अकबर रोडवरच्या निवासस्थानी, हॉलमध्ये लावलेल्या त्याच्या नेतृत्वाखाली झालेल्या प्रचड किसान रॅलीच्या प्रचंड तस्वीरीकडे पहात सध्या दिवस मोजत.

खुर्चीत बसल्यावर गप्पा मारण्याचा इरादा जाहीर केला. 'अर्थात, just talk like my dear friend' असं सागत मोकळेपणानं त्यानी खोलीभर हात फिरवले तेव्हा सूर जुळून आले. वऱ्हाड्यातून फोन उचलून त्यांनी शेजारी आणून ठेवला आणि पाय पसरत खुर्चीत आरामसे आसनस्थ झाले. 'आतापर्यंत आम्हाला तुमच्याविषयी आहे ती ऐकीव किंवा वाचीव माहिती. मग to start with, आम्हाला ऑक्टोबर १९८२ तल्या घडामोडीच एकदा तुमच्या नजरेतून दर्शन घडवता का?' मी विचारल.

'ऑक्टोबर ते डिसें. ८२' हे माझ्यासाठी एक अत्यंत कठीण क्रायसिस होतं. त्या सगळ्या काळात मला वीट आणणाऱ्या नोकरशाहीच एक अत्यंत तिरस्करणीय रूप दिसलं. पार सडलेली ब्युरोक्रटिक यंत्रणा दिसावी, अशी माझी ही पहिलीच वेळ नव्हती. गेली वर्षानुवर्षे मी हे पहात आलोय की, कार्यक्षमता आणि जनहित यापेक्षा इथल्या नोकरशाहीतले अधिकारी त्यांच्या राजकीय वरिष्ठांची मनधरणी करण जास्त महत्वाचं मानतात. आपल्याकडं हा ट्रेंड सुमारे ६९–७० किंवा त्यापूर्वीही, इंदिराजी पंतप्रधान झाल्यापासून, १९६६–६७ पासून मला जाणवू लागला. सडत भ्रष्ट होत जाणाऱ्या राजकीय यंत्रणेशी झुंज घेण्यापेक्षा, तडजोड करणंच नोकरशाहीनं पसत केलं. त्यातून नोकरशाही यत्रणा लोकाभिमुख रहाण्याऐवजी राजकारणी नेत्याच्या हातातल बाहुलं बनली. राजकारणी आणि हे नोकरशहा यांचे समान vested interest तयार झालेले दिसले. हे सगळं मला चीड आणणारं दृश्य होत'— भरदार आवाजाचा परिणाम खुलवेल असा भाषेचा ओघ, इंग्रजी शब्दाचा सहज वापर, हाताची मोजकीच हालचाल; पण बोलत असलेल्या प्रत्येक शब्दातली भावना चेहऱ्यावर ठळकपणे उमटत होती. मला वाटलं की, या पहिल्या प्रश्नात मी त्याच्या अत्यत सवेदनाशील जागेवर बोट ठेवलं असावं. याच रस्त्यावरून पुढ जायला काही हरकत नव्हती.

आयपीएस केडरमधल्या तुमच्या कारकिर्दीचं एक ट्रेलर दाखवता का? कारण वर्षानुवर्षं भ्रष्ट यत्रणा पहात असून ती यंत्रणा ठोकरायला १९८२ साल का मावळावं लागलं ते मला समजावून घ्यायचय.

'मी आयपीएस केडर १९५७ मधे जॉईन केले. पाच वर्षात—१९६० पर्यंतच माझा भ्रमनिरास झालेलाच होता १९६० मधे जेव्हा महाराष्ट्र आणि गुजराथ हे प्रात वेगळे झाले, तेव्हा हे कसं घडलं मला माहीत नाही, पण माझं असं इम्प्रेशन आहे की, एकत्रित मुंबई प्रांतातले कार्यक्षम पोलीस अधिकारी महाराष्ट्राच्या सर्व्हिसमधे गेले आणि गुजरातच्या वाटधाला कच्चे, दुय्यम दर्जाचे अधिकारी आले. तेव्हापासून ही यत्रणा क्रमशः कोसळत जातानाच दिसली. याचा दोष मी उच्च पदस्थ पोलीस अधिकाऱ्यानाच देईन. सामान्य कॉन्स्टेबलला पोलीस खात्याच्या शिथिलतेबद्दल जबाबदार धरता येणार नाही. एक साधा कॉन्स्टेबल नेहमी उच्च अधिकाऱ्यांच्या हुकुमाचा तावेदार असतो. अधिकाऱ्यानाच योग्य हुकुम देता येत नसले तर तो दोष शिपायाचा नाही. पोलीस आणि इतरसुद्धा खात्यातल्या अधिकाऱ्यांचं राजकारण्याशी साटलोटं प्रस्थापित होतं असं दिसल्यावर, माझा भ्रमनिरास झाला. १९६२ मधेच पहिल्यादा मी राजिनामा

दिला होता. पण चीनच्या आक्रमणामुळे आणीबाणीची परिस्थिती आली आहे, त्यामुळे राजिनामा स्वीकारता येत नाही असं मला सांगण्यात आलं. एकूण १९५७ ते ७२ अशा काळात मी गुजरातमध्ये होतो. त्यातून कदाचित या प्रांताशी माझं नातं जुळलं असावं. गुजरातची हवा सुरेख आहे, सुपीक जमीन, शांतताप्रिय आणि उद्योगी लोक असं सगळं विकासाला अत्यंत पोषक असताना मला असं दिसत होतं की, राजकीय नेतृत्वच या सर्वांचा घात करतंय, विकासाच्या शक्यता भ्रष्टवून ठेवतंय. या यंत्रणेशी तडजोड करणं मला शक्य नव्हतं. कारण मी केवळ 'नोकरी' खातर पोलीस खात्यात आलो नव्हतो. मला कामाचं समाधान–Job satisfaction मिळत नव्हतं. नाना तऱ्हाच्या राजकीय दबावांना तोंड द्यावं लागत होतं. नंतर १९७२ ते ७७ या काळात मात्र आधी Indo–Tibetan Border Force आणि नतर Border Security Force मध्ये माझी बदली झाली. इथे राजकीय दबावांपासून आम्ही दूर होतो. मला काहीतरी 'करत' असल्याचं समाधान मिळालं. १९७७ मध्ये माझी बदली परत गुजरातमध्येच झाली. दरम्यानच्या पाच वर्षात इथल्या राजकीय संस्कृतीचा परिपूर्ण ऱ्हास झाल्याचं मला दिसलं.'

### समज–गैरसमज

७७ मध्ये तुम्ही आलात तेव्हा गुजरातमध्ये जनता पक्षाचं राज्य चालू होतं. कॉंग्रेस आणि जनताच्या प्रशासनात काही फरक वाटला नाही का ? आमच्या समजुतीनुसार ७७ मध्ये एक परिवर्तनशील, आशादायी वातावरण देशभर होते. अन् ते देशभर पसरवणारी चळवळ नवनिर्माण आंदोलन– गुजराथमधूनच जन्म पावलं होतं. याबाबतीत तुमचा अनुभव ?

'छे, तसं काही नाही. all political people are same. इथे नव्या कल्पना, पुनर्विचार, सुधारणा यांना काही स्थानच नव्हतं. १९८० त जनता पक्षाच्या पराभवानंतर तर परिस्थिती जास्तच नासली. स्वातंत्र्यानंतरच्या काळात पोलिसी यंत्रणेचं काम काही वेगळ आहे, पोलीस जनतेचा मित्र व्हायला हवा, याचा कुठे विचारच दिसत नव्हता. तीच स्वातंत्र्यपूर्व दंडुकशाही पोलिसांनी पुढे चालवावी अशी अपेक्षा राज्यकर्ते बाळगत होते. मी लोकांमध्ये वावरायचो, समारंभात जायचो, हस्तांदोलन करायचो, तर त्यावेळचे गुजराथचे गृहमंत्री प्रबोध रावळ म्हटले : Police officer should not stake hands but show hands. ही तर कल्पना. मग पोलिसी अत्याचार उद्भवणं क्रमप्राप्त आहे.'

तुमच्या शब्दात, ऑक्टो ८२ तल्या हिंदु–मुस्लिम तणावाविषयी काही तपशील–

'हं, तेव्हा नुकतीच बडोद्याची सूत्रं माझ्याकडे आली होती. दंगली त्याआधीपासूनच चालू होत्या. आम्हाला असं दिसलं की, या प्रत्यक्षात जातीय–धार्मिक दंगलीच नव्हेत. त्या बुरख्याआडून ही गुन्हेगारी गँगस्ची युद्ध चालू आहेत. तिकडे राजकीय पुढाऱ्यांचा 'जागरूक कानाडोळा' आहे. मग मी ते निर्दय हातानं आवरलं.'

त्या सर्व प्रकरणात तुम्ही हिंदुंना झुकतं माप दिलंत असा अनेक जणांचा आरोप आहे.

क्षणभरच त्यांच्या कपाळावर एक सुक्ष्मशी आठी उमटून गेली. ती



जसपालसिंग–एकाकी लढत

□

विरल्यावर ते हसले, म्हटले 'तशी समजूत होण शक्य आहे. काय झालं पहा. त्यावर्षी बऱ्याच काळानं गणेशोत्सव आणि मोहरम एकत्र येत होते. मोहरमच्या ताजिया मिरवणुकीला काही तरी गडबड होणार अशा बातम्या आमच्यापर्यंत येत होत्या. म्हणून मी जास्तीच्या चार कंपन्यांची (चारशे पोलीस) मागणी केली. तेव्हा DGP आणि गृहमंत्री यांनी दबाव आणून ती मागणी फेटाळली. बडोद्यात दंगल उसळली, नवापुरा इथं फायरिंग झालं, अखेर लष्कर बोलवावं लागलं. त्याच्या थोडेच दिवस नंतर बडोद्यातली सुप्रसिद्ध 'नरसी बागपानची मिरवणूक' होती. गणेशोत्सव–मोहरममधल्या काही हिशोबांची देवघेव यावेळी होणार याचा अंदाज होता. म्हणून यावेळी मी थेट CM शी बोललो. मी त्यांना सांगितलं की मला जास्ती कुमक मिळणार नसेल तर to hell with you, माझा राजिनामा मान्य करा. मला कुमक मिळाली. अत्यंत कडेकोट बंदोबस्तात, गैरप्रकार न होता नरसी बागपानची मिरवणूक पार पडली. ही मिरवणूक मुस्लिम मोहल्ल्यातून पास होते. मी स्वानुभवानं तुम्हाला सांगू शकतो की, मिरवणुकीतले हिंदूच जास्त घाबरलेले होते, हिंसक प्रकार होणार असं वातावरण होतं. तसं काही न होता कडक बंदोबस्तात मिरवणूक पार पडल्यावर हिंदुंना वाटलं जसपालमुळे असं झालं. इकडे काही कॉंग्रेसी chaps नी मुसलमानांना चिथावणी दिली की पहा, तुमच्या मोहरमच्या वेळी मात्र बंदोबस्त नव्हता, आता होता. अशी विषपेरणी झाली. मला आठवतंय की हिंदु आणि मुस्लिम मोहल्ल्यामध्ये मी स्वतः जात होतो, लोकांना भेटत होतो. रात्ररात्र बंदोबस्तासहीत, धार्मिक सद्भावही वाढीला लागेल अशा प्रयत्नात जागत होतो. परिणामी या नरसी बागपानच्या पालखीचे मुस्लिम नेत्यांनीसुद्धा आपा-

पल्या मोहल्ल्यात हार घालून स्वागत केले, पण गुन्हेगारी जगाच्या राजकीय हितसंबंधांपायी या सद्भावाच्या वातावरणाला चूड लावण्यात आली.

एक लक्षात घ्या, माझ्यावर आरोप करणाऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे, मला जर हिंदुंना तथाकथित झुकतं माप द्यायचं असतं तर मी कमिशनरच्या पदाचा राजिनामा दिला नसता, किंवा निदान पार्टी सोडली नसती. तिथे राहूनच मला हवं ते करता आलं असत. पण तसं नाही. मला अन्यायाशी लढायचं होतं. राजकीय यंत्रणा गुन्हेगारी जगाशी हातमिळवणी करून सामान्य नागरिकाच्या जीवनात माती कालवते असं दिसल्यावर एक पोलीस अधिकारी म्हणून त्याविरुद्ध बंड करणं मला आवश्यक वाटलं. आता आजतर मी ना कमिशनर, ना कोणत्या पार्टीचा नेता. एकटाच फिरतो सर्वत्र. सध्या मला अनेक तऱ्हाच्या धमक्या येतात अन् मला लोकांचं प्रेम याशिवाय कोणतही संरक्षणाचं कवच नाही.'

सरकार दरबारला ठोकरून दिल्यावर तुम्ही राजकारणाचं क्षेत्र का निवडलत ?

सध्या राजकारणाचं रूप फार सर्व व्यापक होऊन बसलय. एक पोलीस अधिकारी म्हणून काम करतानाही माझ्या हे लक्षात येत होतं की, राजकारण टाकून आपल कर्तव्य बजावण अशक्य व्हावं एवढं ते सध्या गुंतून गेलंय. तिकडे बघण्याचा सुशिक्षित, सज्जन लोकाचा दृष्टिकोन मात्र सिनिक् आहे. They are in mood of resignation. साहजिक राजकारण भ्रष्ट, बरबटलेल्या लोकाच्या हातात जातं. हे सगळ जर बदलायचं असेल तर त्यापासून तोंड चुकवण्याऐवजी ठामपणे त्याच्याशी झुंज मांडायला हवी. म्हणून मी सक्रिय राजकारणात उतरायचं ठरवलं.

### भाजप-प्रवेश-सोडचिठ्ठी

मग BJP का ? भाजपमध्ये तुमचा प्रवेश आणि पक्षत्याग याची काय कथा आहे ?

सुरुवातीच्या पहिल्याच प्रश्नानंतर चेहरा जेवढा बोलला होता त्याहून जास्त अभिप्राय आता दिसला. स्पष्टपणे चेहऱ्यावर वेदना दिसली. हाताच्या तळव्यात एकदा चेहरा झाकून त्यांनी काही वेळ मौन पाळलं मला वाटलं आता ते हा प्रश्न टाळणार. ' ती एक फार मोठी कहाणी आहे. मला वेळ असता तर मी तुम्हाला सांगितली असती.' माझा अदाज बरोबर निघत होता. थोडा वेळ पुढचा प्रश्न न विचारता तसाच बसून राहिलो. मग सावकाशपणे त्यांनी सागायला सुरुवात केली, अगदी सावकाश, मधे काही शब्दांना आलेला वेग थाबलेला, त्यातल चैतन्य ओघळून गेलेल, फरफटत आल्यासारखे शब्द मागोमाग येत होते–

' १९८२ तलं क्रायसिस बदलीची ऑर्डर आणि त्याविरुद्ध लोकांचा उत्स्फूर्त उद्रेक यानंतर त्याचं श्रेय मिळवण्यासाठी अनेक राजकीय पक्षाची धावपळ सुरू झाली. त्यातच डॉ. नेनेंनी माझ्या परस्पर केस नोंदवून ती जिंकली. कोण जाणे, पण मलाही त्या दिवसांमध्ये भाजपच एक शुद्ध पक्ष वाटत होता. हे माहीत होत की मुसलमान आणि हरिजन याची मते भाजपला कधीच मिळणार नाहीत. पण काही मल्यांची चाड बाळगणाऱ्या लोकाचा हा पक्ष आहे असं मला वाटलं. जसपालच्या Pro-Hindu प्रतिमेचाही भाजपच्या नेत्याना उपयोग वाटला असावा. म्हणून भाजपनेही मी पक्षात याव असा आग्रह धरला. मी मान्य केलं. माझं पद आणि त्यासहीत येणाऱ्या सर्व सुखसोयींना सोडून मी पक्षात प्रवेश केला. वाजपेयी आणि अडवानी यांनी बडोद्याची सीट मला देण्याच सुरत अधिवेशनात जाहीर केले.

भाजपच प्रातिक अधिवेशन सुरतेत झाल होतं त्याचा सदर्भ नीट लक्षात होता. जसपालसिंगजींच्या प्रवेशाचं प्रचड स्वागत झाल होत. भाजपची इमेजसुद्धा जसपालसिंगमुळे प्रातभर वधारेल असे वाटले. इतके की जाहीर सभेत साक्षात अटलजी भाषणाला उभे राहिल्यावरही लोकानी जल्लोष केला. We Want Jaspal. अटलजीनीही उदारपणे त्यांना भाषणाला बोलावले. तितक्याच समजुतदारपणे जसपालजीनी चार शब्दात आपले बोलणे उरकले की, अटलजी ज्येष्ठ आहेत, त्याचे भाषण तुम्ही ऐकून घ्या, नंतर वेळ मिळाल्यास मी चार शब्द बोलेन. जसपाल एकदम लोकाच्या गळ्यातला ताईत बनला. पण ही लोकप्रियताच आड आली असावी.

लोकसभा निवडणुकीत बडोद्याचं [सीट मला देण्यात आलं पण मकरंदभाई देसाई गुजराथ भाजपचे प्रमुख ( निवडणुकीपूर्वी भाजपची ताकद गुजराथमधे खूप वाढत असल्याच्या बातम्या होत्या तेव्हा यांची ओळख गुजराथचे भावी मुख्यमंत्री अशी करून दिली] जायची. अर्थात तेव्हा अटलजी भारताचे भावी पतप्रधान होते ! ) मला कॉर्नर करू पहात होते. बडोद्यात पार्टीने मला काहीही सहकार्य दिले नाही. एकही महत्त्वाचा नेता, वक्ता माझ्या प्रचारासाठी बडोद्यात आला नाही. मी स्वतःच्या ताकदीवर लढलो. तशात निवडणुकीपूर्वी पधरा दिवस मकरदभाईंनी मला सांगितले की जनता पक्षाचा उमेदवार जुनेजा, याच्याकरता मी आपले नाव मागे घ्याव. उमेदवारांची यादी जाहीर झाली, त्यात मी नव्हतो. मग मी अडवानीजीकडे गेलो. त्यांनी माझी बाजू उचलून धरली. तिकिट मिळाले पण पार्टीने मला एकटे पाडले. मी हरलो. पण दीड लाख मते मिळवली. त्यात वाडी आणि रावपुरा या विधानसभा मतदारसघात मला आघाडी होती. मग विधानसभेच्या वेळी यातली एक सीट मला द्यायला हवी होती. पण मला त्या वेळी तिकिट नाकारण्यात आले. पार्टीने मला महारोग्यासारखे वागवले. थोडेच दिवस आधी पार्टीत आलेल्या विरेन शहाला तिकिट मिळाले, पण मला नाही. मला सांगण्यात आले की, पार्टीच्या काही जुन्या कार्यकर्त्यांना तिकिट देणं आवश्यक आहे मी म्हटले लोकसभेच्या वेळी नाही हे आठवले. आत्ताच एकदम हे आर्ग्युमेंट कुठून उपटले इतकेच काय पण; मकरदभाई सारख्याने Sikh traitor वगैरे शब्द उच्चारले जब की I am better Hindu than many of them. बडोद्यातून विधानसभेवर निवडून गेलेल्या एका चागल्या माणसाने पार्टीच्या बैठकीत जसपालला तिकिट मिळता कामा नये असे माडताना सांगितले की ' जसपाल गुजराथचा भूमिपुत्र नाही. ' मला कळेना पार्टीला झालेय तरी काय, अशीही कुणकुण कानावर होती की, भाजपला मुस्लिम मते मिळवल्याशिवाय सत्तेवर येता येणार नाही अन् मला पक्षाबाहेर काढल्याशिवाय मुस्लिम मते मिळवता येणार नाहीत. या समजुतीच्या वेदीवर माझा नाहक बळी चढवण्यात आला.

मग विधानसभा निवडणूक मी एकट्यानं लढवली. भारतीय

लोकशाहीतला भ्रष्टाचार निवडणुकीपासून सुरू होतो. म्हणून मी ठरवलं की, एकही पोस्टर छापणार नाही, बॅनर लावणार नाही मी लोकाच्या घरोघर जाऊन हात जोडून मत मागितली बस्स एवढ्या-वर मला क दोन ची मत मिळाली–सतरा हजार इथल्या भाजप उमेदवाराला ६।। हजार मत मिळाली.

अशी सगळी ही कहाणी. माझा पक्षावरचा विश्वासच उडाला. पक्षनिष्ठेची टाळी एक हातानं वाजू शकत नाही. Loyalty is two way traffic. भाजपला मी खूप काही देऊ शकत होतो विशेषत: युवकामध्ये, भाजपबद्दल मी खूपच हवा तयार करू शकलो असतो. आता ते सगळंच गेलं.

## राखीव जागा–राजकीय धंदा

गेलं. भाजपनं जसपालसिंगना गमावलं आणि गुजराथही गमावला. या दोन्हीचा काही परस्पर संबंध आहे की नाही कुणास ठाऊक; पण अनेक ठिकाणी जसपालजींनी जे सांगितलं, त्याचाच पुनरूच्चार करणारी माणसं भेटली. भाजपच्या कार्यकर्त्यांनीसुद्धा त्याच्याबद्दल चागलेच शब्द उच्चारले. वेगवेगळ्या पक्षातल्या लोकानी जसपालच्या प्रामाणिकपणा आणि हेतूची शुद्धता यावर विश्वास दर्शवला मुलाखतीच्या आधी आणि नतरही त्यानी दिलेल्या माहितीविषयी इतरत्र चौकशी केली. तेव्हा लक्षात आलं की, त्यानी सागितलं यात कुठेही तथ्यविषयक चूक किंवा अतिरेक नाही. त्यामुळे मुलाखतीला जाताना मनात काही प्रश्नाच्या जिग सॉ पझलचे ठोकळे होते. त्यात जुळणारे इतर तपशील आता मिळाले. बोलता बोलता जसपालजीच्या शब्दाच वेग वाढत गेला होता, खुर्चीत ते सरळ ताठ बसून छताकडे पहात, अस्वस्थपणे बोलत होते. त्याच्या रंगीन, विवादास्पद करियरच्या 'काल' चा जो भाग समजावून घ्यायचा होता, तो थोडाफार लक्षात आला. आता 'आज' कडे याव का म्हणून मी विचारलं आता परत राखीव जागाविरोधी आदोलनात भाजपचे नेते तुमच्याबरोबर दिसतात ना? दोन–चार दिवसापूर्वीच त्याना आणि भाजपच्या काही नेत्याना अटक करून सोडून दिल्याची बातमी होती

'Corcection तो मोर्चा राखीव जागाविरोधी नव्हता. पोलिसी अत्याचाराचा निषेध करणारा होता, अन् प्रश्न न विचारताच त्यानी पुढे बोलायला सुरुवात केली तेव्हा मला गप्पा चालू असल्याच समाधान लाभलं राखीव जागा विरोधी आदोलनात मी सहभागी नाही, अर्थात व्यक्तिश: माझ मत असं आहे की, सध्या राखीव जागांचा उपयोग व्होट-बॅकसाठी केला जातो. त्याचे फायदे खऱ्या मागासवर्गीयापर्यंत पोचत नाहीत जगजीवनरामसारखा माणूस तीस वर्षे मत्री आहे, आता त्याच्या मुलालाही 'मागासवर्गीय' म्हणून सवलती का द्याव्यात, आणि खर म्हणजे मागासवर्गीयाना समाजात बरोबरीच स्थान देण्याचा प्रश्न हा मूलत आर्थिक प्रश्न आहे आपल्या अर्थव्यवस्थेत सुमारे पन्नास हजार कोटी रुपयांइतका काळा पैसा खेळतो, इथे विषमता दूर होईल कशी; पण हे मूळ प्रश्न बाजूला सोडून दुय्यम प्रश्नावर लोकांना खेळवण्याचा राजकारण्याचा धदा आहे त्याच्या हेतूतच प्रामाणिकपणा नाही तत्वत: मात्र राखीव जागाची व्यवस्था कायमसाठी असूच शकत नाही, त्याला काहीतरी कालमर्यादा ठरवावी लागेल

जसपालजी, इथे मला एक पेच जाणवतोय. त्याविषयीचे प्रश्न गेल्या दोन-चार दिवसात आदोलनाच्या बाजून आणि विरूद्ध बोलणाऱ्यानाही विचारले; पण सध्याच्या वातावरणात त्याची उत्तरं आधीच ठरून गेलीत. त्यामुळे पेच जास्तच वाढतो. समाजातली विषमता दूर करण हा राखीव जागांचा हेतू होता ती कल्पना सुरू झाल्यास सुमारे चाळीस वर्षे होत आली अजून सामाजिक विषमता तर शिल्लकच आहे, हे कोणीच नाकारत नाही. तरीही राखीव जागाना विरोध वाढतच चाललेला दिसतो. मी म्हटलं

'खरं आहे. जातीच्या भिंती पाडणं हा हेतू डोळ्यासमोर ठेवून आपण जी कल्पना–राखीव जागाची–राबवायला सुरुवात केली तीच कल्पना आज जातीव्यवस्था अधिकाधिक पक्की करत चाललीय की, काय अशी शका यावी यात आपल्या समाजव्यवस्थेची गुतागुत दिसते. फार पूर्वी केव्हातरी जाती व्यवसायाधिष्ठित असाव्यात; पण क्रमश: त्या जन्माधिष्ठित बनत गेल्या. हे मान्य करायला हवं की, आपल्या हातातली सत्ताकेंद्र पक्की ठेवण्यासाठी सवर्णांनी मुख्यत: ब्राह्मणानी जन्माधिष्ठित विषमता पैदा केली. त्यातून निर्माण झालेल्या समाज-व्यवस्थेन समाजाच्या एका मोठ्या घटकाला दीर्घकाळ वचित ठेवलं. ती विषमता दूर करायला मूलत: राखीव जागा ही सकल्पना प्रारंभी योग्य होती. आता असं दिसतय की, त्यामुळेच जातीय सघर्ष उभा राहील त्याबरोबरच हाही पेच आहे की, एक यशस्वी राष्ट्र म्हणून आपल्याला उभं रहायच असेल तर गुणवत्ता, कार्यक्षमता यावर तडजोड असू शकत नाही. रोस्टर सिस्टिम म्हणजे अशा तडजोड आहे.'

जसपालजींनी फार मोजक्याच शब्दात जातीव्यवस्थेतून निर्माण होणारा पेच माडला होता समस्येचं रूप अनेकजण दाखवू शकतात; पण मग उपाय काय किंवा राखीव जागा अथवा रोस्टर सिस्टिमला आपल्यापाशी काही पर्यायी योजना आहे का? इथे मात्र अनेकजण बौद्धिकदृष्ट्या धडपडतात. इथेही जसपालजीच वैचारिक सचलन रिदममध्ये पुढ चालू राहिलं ते म्हणाले 'मुळातच प्रश्न गुतागुतीचा आहे त्यातही राजकारणामुळे त्यातली गुतागुत वाढतेच कारण काहीएक मूलभूत सामाजिक प्रश्नाच्या गाभ्याला हात घालायचा आहे, या भूमिकेतून आपल्याकडच राजकारण चालत नाही काहीतरी तात्पुरती तडजोड करून मताचा गठ्ठा मिळवला म्हणजे खूप झालं अशा भूमिकेतून राजकारणाचा खेळ चालतो नाहीतर एव्हाना चाळीस वर्षात या प्रश्नावर खूप काम होऊ शकलं असतं उदाहरणार्थ: शिक्षणप्रसाराला सर्वात केन्द्रवर्ती स्थान द्यायला हवं राखीव जागेचे फायदे एका पिढीला मिळतील, फायदे घेतलेल्याच्या पुढची पिढी समाजात बरोबरीनं, मेरिटवर मानली जायला हवी. मी पुन्हा आठवण करून देतो की. विषमतेचा प्रश्नसुद्धा मुळात आर्थिक प्रश्न आहे. आजही मागासवर्गीयाच शोषण शिल्लक आहे. तोवर राखीव जागा पूर्णपणे रद्द तर करता येणार नाहीत; पण त्याचबरोबर

**पक्षनिष्ठेची टाळी एका हातानं वाजत नाही. it is two way traffic !**

राखीव जागाच्या व्यवस्थेवर पुनर्विचार मात्र जरूर व्हायला हवा. राजीव गांधींनीही हे मान्य केलंय.'

## दलितस्तान-घातक

सामाजिक विषमतेच्या प्रश्नावर धर्मांतर हा मार्ग होऊ शकतो का?

'धर्मांतर? त्यानं काय होईल? आपण पाहिल ना की मूळ प्रश्न शोषणाचा, आर्थिक आहे. धर्मांतर केल्यानं तो श्रीमंत होतो का? त्याच्या व्यवसायाला प्रतिष्ठा प्राप्त होते का? किंवा त्याचं शोषण थांबतं का? छे, धर्मांतर हा उपाय होऊ शकत नाही.

सामाजिक समतेची लढाई मागल्या सव्वाशे वर्षात ज्या अनेक रस्त्यावरून वळत वळत आलीय, त्यातला एक रस्ता एका फार गंभीर कड्यावर येऊन पोचलाय. प्रथम समाजव्यवस्थेच्याअंतर्गत बंड, त्यातून काही साधत नाही म्हटल्यावर त्या व्यवस्थेचा-धर्माचा त्याग, पण त्यातही एतद्देशीय धर्माचा स्वीकार, त्यातूनही दिशा दिसत नाही, म्हटल्यावर पुन्हा धर्मांतर. पण यावेळी परकी धर्माचा, एतद्देशीय संस्कृतीशी वैर धरण्याच्या शतकानुशतकांचा इतिहास असणाऱ्या धर्माचा स्विकार. पण ही चालही जन-आंदोलनात रूपांतरित झाली नाही आता या रस्त्यावरचा पुढचा मुक्काम वर्गयुद्ध किंवा दलितस्तानची मागणी हा आहे मागच्या दोन-चार दिवसात हा शब्द इथे कानावर येऊ लागला होता एका पेचातून पुढचा पेच. राखीव जागा चालू राहिल्या तर नाईलाजानं शस्त्र हाती घ्यावं लागेल म्हणणाऱ्याचा एक आक्रमक मूडमधला गट आणि राखीव जागा रद्द झाल्या तर आम्ही शस्त्र हाती घेऊ म्हणणारा विरुद्ध गट. म्हणजे काही झाल तरी कोणी तरी शस्त्र हाती घेणारच. गुजराथमध्ये निर्माण होऊ घातलेल्या परिस्थितीची दिशा हीच की प्रत्येकाला यातली कोणती तरी एक बाजू स्विकारावी लागणार किंवा मधल्यामध्ये चिरडून जाव लागणार म्हणजेच गुजराथमध्ये एक सामाजिक ध्रुवीकरण येऊ घातलय. त्याचे साद पडसाद संपूर्ण भारतात उमटण शक्य आहे. असं काही काही जाणवत हो1, म्हणून मी विचारल- वर्गयुद्ध किंवा दलितस्तान या कल्पनाविषयी काय वाटतं?

'अलिकडेच हे शब्द उच्चारले जाऊ लागले. या कल्पना फार डेंजरस आहेत, मला अजिबात पसत नाहीत. राष्ट्रीय ऐक्याच्या बाबतीत तडजोड होऊच शकत नाही अन् या कल्पना चक्रमपणाच्या आहेत त्यांना भारतात कधीच विजय मिळणं शक्य नाही. पंजाबचेच उदाहरण पहा ना 'खलिस्तान'ची भाषा कधीच यशस्वी होणार नाही. काही काळापूर्वी अकाली दलाच्या भूमिका किती कठोर होत्या. आता आता त्या निवळू लागल्यात आणि घटनेच्या चौकटीतच पंजाबचा प्रश्न सोडवायची भाषा सुरू झालीय. दलितस्तान शब्दाच याहून वेगळं काही होणार नाही.'

खलिस्तानचा संदर्भ तुम्ही अगदी चपखल ठिकाणी वापरलात जसपालजी, मला त्या संदर्भातही तुमच्याशी चर्चा करायचीच होती. या शब्दाला पाच वर्षापूर्वी काय स्थान होतं तुम्हाला आठवत असेल ना. लोक दात काढून हसायचे आणि पाच वर्षात आता? या शब्दाला पंजाब प्रश्नाच्या संदर्भात पारिभाषिक स्थान प्राप्त झालय. हा शब्द घेऊन हाती बंदुक धरणाऱ्या शीख युवकांनी पंजाबच्या नरडीला बेयोनेट लावलच आहे ना.

'पण खलिस्तान ही viable entity होऊ शकत नाही. आपल्या राजकीय मागण्या पुढे टाकण्याचं हे एक साधन मात्र असेल. एवढं टोकाचं काही मागितल म्हणजे थोडे तरी पदरात पडेल असा हिशोब यामागे असावा. या मागणीला फूस देण्यात पाकिस्तानचा हात आहे अन् शिखाना ते माहितीय. शीख इतिहास असं दाखवतो की शिखाच आणि मुसलमानाच कधीही पटणार नाही. या दोन जमातीत दीर्घकाळच्या वैराचा इतिहास आहे'

पाकिस्तान बनण्यापूर्वी नेमके हेच शब्द वापरले जात होते. viable entity नाही, साम्राज्यवादी इंग्रजाचा डाव आहे, शतकानुशतक हिंदु-मुस्लिम एकत्र रहात आलेत, जिनाचा काही मागण्या पदरात पाडून घेण्यासाठीचा, मुस्लीम समाजाच नेतृत्व मिळवण्यासाठी राजकीय डाव आहे वगैरे....

'बरोबर, तरीसुद्धा दोन परिस्थितीमध्ये फरक आहे. मुळात शीख-पणाची निर्मिती हिंदु धर्माच्या रक्षणासाठी झाली आहे मी काय म्हणतोय तुमच्या लक्षात येतय ना. शीख अन् हिंदु हे वेगळे नव्हेतच ते एकच आहेत. मी नेहमी सागतो गुरु गोविंदसिंग was greatest Hindu ever born. इथे शिखांच्या एका सभेत मी हे बोललो तर काहीजणानी आरडाओरडा केला. पण I will shout it from the roof tops. मी हे कस विसरेन की माझी आई हिंदु आहे, माझे आजोबा हिंदु होते पंजाबमधल्या संघर्षाला इतकं गंभीर राष्ट्रविरोधी वळण मिळालं याचा दोष पुन्हा राजकीय पक्षाकडेच जातो. दोन्ही बाजूकडे कॉंग्रेस आणि अकाली दोन्ही, आपापल्या राजकीय डावपेचासाठी दोघांनीही भिंद्रावालेंचं भूत उभं केल ना.'

आता हे मान्य, पण या राजकारणान जो विचका निर्माण करून ठेवलाय, त्या परिस्थितीत आपण सध्या वावरतो परिणामत: शिखांमध्ये मोठ्या प्रमाणावर alienation ची., वेगळं पडल्याची भावना निर्माण झालीय ना. जवळ जवळ संपूर्ण नवी शीख पिढी विद्रोहाला अनुकूल आहे संपूर्ण देशाला विरुद्ध असा ethos जन्माला येऊ घातलाय तिथे सत भिंद्रावाले तर हुतात्मा आहेतच; पण थेट अकाली दल सुद्धा बेंतसिंगचा 'हुतात्मा' म्हणून गौरव करत.'

जसपालसिंग यांचं उत्तर गमतशीर होते. ते म्हटले, महात्मा गांधीजींचा खून करणारा नथुराम गोडसे त्यावेळी अनेक हिंदुना हीरो वाटलाच होता ना अजूनही त्याला मानणारे अनेक आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्यान काय देशाला विरुद्ध ethos निर्माण झाला का? हे खरं की शिखांबाबतची दुराव्याची भावना जास्त खोल आहे. आता बहुसंख्य शीख या भावनेतून एकत्र आलेत.

परत माझा प्रश्न 'उपाय, उपाय? आता काय केल जायला हवं?

'काही मागण्या मान्य करायात अन् तिनक्याच कणखरपणे सागाव खलिस्तानची भाषा बंद करा, पक्षीय राजकारण बाजूला ठेवून राष्ट्रीय राजकारणाचं युग सुरू व्हायला हवं. चंदीगढ पंजाबला तस अबोहर, फाजिलकाबाबत. भजनलालना सागावं 'महापंजाब'च्या कल्पनेची चावट बडबड बास करा, केंद्राची मौन संमती असल्याशिवाय अशा कल्पना बोलायचे डेअरिंग एकाही कॉंग्रेसी मुख्यमंत्र्यात

नाही. चदीगढ ऐवजी हरियाणाला दुसरी राजधानी उभी करून द्यावी. पंजाबमधील परिस्थिती पूर्ववत करण्याला अग्रक्रम मिळायला हवा समाजातर्गत दोन गटात मोठी दरी निर्माण झाली. ती बुजवायचा प्रयत्न मनापासून व्हायला हवा यात केंद्र सरकारचा पुढाकार दिसायला पाहिजे इंदिराजीच्या हत्येनतर दिल्लीत उसळलेल्या दगलींची जबाबदारी राजीव गाधींना नाकारता येणार नाही HKL भगत, जगदीश टाईटलसारखी माणस दगलखोराच नेतृत्व करत होती इनके हाथ तो खूनसे रगे है चौकशी होऊ द्यात. दोषी ठरणाऱ्याना फासावर लटकवल पाहिजे राष्ट्राच्या ऐक्याला घातक ठरणाऱ्याना रागेत फासावर चढवल पाहिजे.

आसामविषयी काय म्हणाल...?

## देशभर प्रतिकार

आसामची समस्या पजाबइतकीच महत्त्वाची आहे. तेवढाच महत्त्वाचा भर आसामची समस्या हातावेगळी करण्यावर हवा. तथापि आसाममधल्या परिस्थितीचा सूर पजाबमधल्याप्रमाणे नाही. परकी नागरिकाना हटवण्याचं हे आदोलन अजूनही शाततामय आहे.'

यापुढची लढाई कशी असेल असं तुमच्या डोळ्यांसमोर आहे हा एक माणूस, आत्ता तूर्त एकटाच. आपल्या ध्येयविचाराचा रस्ता नोकरशाहीतून सापडत नाही म्हटल्यावर सर्व फायद्यासकट ती नोकरी ठोकरली खूप आशा उरात बाळगून ज्या पक्षाशी गाठ बाधली तिथेही ठोकर बसली. आता पाठीशी ना सरकारी यत्रणा, ना एक पक्ष, उलट विरोधच खूप तरीसुद्धा त्या जखमा कुरवाळत जगत नाहीये. आपल्याशी गप्पा मारतोय तशा त्याच्या शब्दातल्या ठिणग्या जाणवतायत. आपण त्याना 'काल' आणि आज विषयी विचारलं या रस्त्यावरूनच पुढे पावल टाकायची तर 'उद्या' विषयी विचारायला हवं जसपालसिंग खुर्चीतच पूर्वीच्याच पोजमध्ये पण विचाराचा भाता धपापत होता त्यातून स्वच्छ आशावादी ठिणग्या तडकू लागल्या.

आपल्याला मुख्य लढाई स्वार्थी राजकारणी लोक आणि 'राष्ट्र' विरोधी याच्याशी करावी लागणार आहे. त्यासाठी देशभक्ताच एक नव बियाण तयार व्हायला हव. अशा राजनीतिज्ञाची एक नवी पिढी उदयाला यायला हवी की ज्याच राजकारण हे 'देश'कारण असेल, जे या मातीशी, इतिहासाशी, नीतीमूल्याशी आपल नातं सागतील. इथल्या ethos मधून जे उगवलेले असतील असे युवकच उद्याची लढाई लढू शकतील. मी त्याची वाट पहातोय. आज तरी अशा उदयाची चिन्ह कुठे दिसत नाहीयेत. याचा दोष मी आपल्या बुद्धिवादी वर्गाला देईन. ते मात्र रहातात, अन्याय सहन करतात. समाजासाठी सघर्षात उतरायच्या ऐवजी कुपणावरच बसून पाडित्य पढवतात या बुद्धीवादी वर्गानेच आताच्या सिस्टिमला देशाची मुळे कुरतडू दिलीत. त्यामुळे पुढच काम अवघड आहे हे खरच; पण कुठं तरी सुरुवात तर करायला हवी. समाजधारणा करणारी प्रत्येक सस्था आज उध्वस्त होत असलेली दिसते. प्रशासनाचे अवयव अर्धांगवायू झाल्यासारखे पडलेले असतात अन् सरकारी यत्रणा ऑक्सिजनवर आहे अशात राजीव गाधीसुद्धा देत असलेली आश्वासन पूर्ण करू शकणार नाहीत. त्याना या 'व्यवस्थे विरूद्ध लढाई छेडावी लागेल किंवा या 'श्री क्लीन' ना बौद्धिक अप्रामाणिकपणाचा गुन्हा स्वीकार करावा लागेल. राजकारणातला सुद्धा गुडागर्दीचा सजय गाधी प्रवाह रोखायला लागेल'

'ही लढाई तुम्ही एकटेच लढत रहाणार की काही संघटीत शक्ती पाठीशी उभी करायचा प्रयत्न करणार ?

'नीती मूल्याधिष्ठित राजकारण हा माझा मुख्य कार्यक्रम सत्तेच्या मागे जाणारं राजकारण मला करायचं नाही. त्यामुळे जिथे जिथे अन्याय दिसेल तिथे तिथे निषेध करण, निषेध करायला लोकाना प्रवृत्त करण आवश्यक आहे त्यासाठी आत्ता माझा 'सावधान' नावाचा तरुणाचा एक छोटासा ग्रुप काम करतो नागरिकाना सावधान करायच हे या ग्रुपच काम. सपूर्ण जगाचा इतिहास आपल्याला असं दाखवतो की, अन्यायाचा निषेध करतकरतच जगाचा विकास झाला आहे आपल्या देशातल्या सडलेल्या व्यवस्थेचा निषेध करायला प्रतिकार करायला लोकानी शिकायलाच हव.'

तुम्ही हे तर मान्य कराल की असा प्रतिकार बडोद्यापुरता मर्यादित राहून चालणार नाही, तो देशभर पसरायला हवा कारण आपल्या देशातला कोणता एक प्रश्न दुसऱ्या प्रश्नापासून पूर्ण सुटा करता येणार नाही, इतकी परिस्थिती एकमेकात गुतलेली आहे आता प्रश्नाचं स्वरूप जर सर्व व्यापक असेल, तर त्याची उतरं शोधण्याच्या प्रयत्नात छेडला जाणारा लढासुद्धा देशव्यापी असावा लागेल. नुसते छोटे छोटे स्थानिक किल्ले बाधून आपापले मोर्चे सामाळणं परवडणार नाही, ती फक्त बचावाची लढाई होईल अन् यथावकाश हे किल्लेही 'व्यवस्थे' च्या पुरापुढे ढासळतील. मग तुमचा हा लढा बडोद्यावरून अखिल भारतीय स्वरूपात रूपातरित होण्याची योजना तुमच्या डोळ्यासमोर आहे !

मुलाखत मिळविण्यासाठी फोन करताना जेवढा बिचकत होतो त्याहून जास्त बिचकत बिचकतच मी हा प्रश्न विचारला, कारण ही सगळी माडणी हा 'लहान तोडी मोठा घास' होतोय की काय अशी रुखरुख सतत माझ्या मनात होती, पण जसपालजी तर मान डोलवत होते म्हणून भीड चेपवून विचारलेच--लढा देशभर कसा पसरेल?

'पसरेल वणव्यासारखा पसरेल लोकामध्ये कमालीची अस्वस्थता, नैराश्य आहे. स्वातंत्र्यानतर विकासाचे, समृद्धीचे दिवस दिसतील या आशेचा भ्रमनिरास झालेल्या लोकाचे थवेच्या थवे आहेत. त्यातून ठिकठिकाणी चळवळी उभ्या रहातील ठिकठिकाणी पेटलेल्या अशा चळवळीमधून राष्ट्रीय उद्रेक आकार घेईल'

आपण मगाशी इतिहासाचा सदर्भ घेत होतो जनतेच्या उत्स्फूर्त उद्रेकाची चर्चा निघाली की, अनेक जण सागतात की, भारतात तसा इतिहास नाही. भारताच्या इतिहास परंपरेत, ethos मध्ये अशा राष्ट्रीय उद्रेकाची काही शक्यता तुम्हाला वाटते का ?

'निश्चित वाटते. मी या बाबतीत अत्यत आशावादी आहे, ethos

**लढा वणव्यासारखा पसरेल. लोकांमधे कमालीची अस्वस्थता आहे.**

नाही वगैरे बोलण्यानंच बुद्धीभ्रंश होतो आणि चळवळ उभी रहाणार असली तरी रोखली जाते. अन् मला तुम्ही विचाराल, तर असं आंदोलन उभं रहाणार नसलं तरी मी प्रयत्न सोडणार नाहीये. कोणत्या समस्यांशी माझा सामना आहे हे मला माहितीय. मला वास्तविक काही कमी नाही मग मी पाऊल मागे का घ्यावं ? बाळाला झोपवायला अंगाईगीत गातात ना, तसा हा गुंगी आणणारा बुद्धीभ्रंशच आपल्या समाजाला झपाटून राहिला आहे. प्रत्येक क्षेत्रात भरून राहिलेल्या भ्रष्ट व्यवस्थेनं लोकांची झगडायची इच्छाच मारून टाकल्यासारखं झालंय. त्यामुळे जो तो फक्त स्वतःच्या करियरचा विचार करतो, मुख्यत: मध्यमवर्ग अशा प्रवृत्तीचा झालाय. सध्या तर केवळ अस्तित्वासाठीच मध्यमवर्गाची धडपड चालू आहे पण आपण हे विसरता कामा नये की, क्रांतीला नेतृत्व पुरवतो तोही मध्यमवर्गच. भारतात अशी परिवर्तनोन्मुख चळवळ झाली नाही तर आपला देश गुंडांच्या ताब्यात जाणार आहे. हे टाळायचं असेल तर माझ्या शक्तीनुसार मला झुंजत रहायलाच हवं. सत्तेशिवाय माझा संघर्ष चालू शकतो, कारण राजकारण हा माझा पोटाचा व्यवसाय नाही. अजूनही मी माझा रोजगार कमावून खातो. मी काम चालू ठेवणारच आहे. नव्या शक्तीचा उदय पहायला मी झगडत रहाणारच आहे.'

¤

बाबा आमटेंच्या 'मी अजून जहाज सोडलेले नाही' ची जातकुळी सांगणारे शब्द उच्चारत जसपालसिंग खुर्चीत बसून होते. पूर्ण विषम परिस्थितीतला एक सामना खेळू म्हणत होते. याचं भान ठेवत होते की यात अपयश येणंही शक्य आहे पण–

'जहाजाबरोबर स्वतःला बुडवून घेणारे
कर्णधार जेथे असतात
तेथेच बुडता देश वाचवणाऱ्या
नाविकांच्या पिढ्या जन्म घेतात'

अशा नाविकांच्या पिढ्या जन्म घेतील अशी उमेद बाळगणारा, त्याच्या जन्मासाठी मनाला पणाला लावणार हा कर्णधार. मला भेटलेला एक पोलीस कमिशनर. हा कर्णधार कच्चा की पक्का ते इतिहासच सांगेल; पण वयाच्या बावन्नाव्या वर्षी मागचे सर्व पाश तोडून झेप घ्यायलाही फार गटस् हवेत. ते यांच्यात दिसले.

मुख्य म्हणजे तुमच्या माझ्या सारखाच एक माणूस. कोणत्या तरी एका दिवशी जन्माला आला. तो दिवस ८ डिसेंबर १९३३ चा होता. ठिकाण पंजाबमधलं कपूरथळा. वडील कपूरथळ्याच्या महाराजांचे डॉक्टर होते. वडिलांना दहा भाऊ, त्यातले हे एकटेच शिकलेले. जसपालला सहा भाऊ. एक रेल्वेत, एक सिव्हिल सर्जन, ब्रिगेडियर, कर्नल आणि लेफ्टनंट जनरल. योद्ध्यांचंच कुटुंब. हा वारसा वडलांकडून आलेला. स्वातंत्र्याच्या लढ्यात वडलांनी साक्षात महाराजाविरूद्धच मोर्चा काढला. नोकरी गमवावी लागली. त्या अवस्थेत सहा मुलांचं कुटुंब पोसायचं होतं. पण वडलांनी तडजोड स्वीकारली नाही. जसपालना पाठीचा कणा ताठ ठेवायचा वारसा वडलांनी दिला. अन्यथा कपूरथरळ्याला बी. ए. आणि जालंदरला एल्एल्बी केल्यावर सिव्हिल सर्व्हिसेसमध्ये शिरलेल्या याही एका तरुणाचा ध्येयवाद मोडून पडायला वेळ लागला नसता. लाचलुचपत, भ्रष्टाचार, राजकीय दबाव, victimization या सर्वाला जसपाल पुरून उरला नसता. अनेकजण त्यांना वेडा–मूर्ख म्हणतात. तेव्हा जसपालसिंग विचारत असतात. 'माझ्यासारखे वेडे आणखी किती आहेत ? अरे, या जगण्यातही धन्यता आहे. मला सांगा मी काय गमावलंय ? पण जसपालजी, ज्यांची 'कमावण्या' ची व्याख्या पोटापलिकडे जात नाही त्यांना तुमची भाषा कशी कळणार ? न कळो. पण तुम्ही तिथे बडोद्यात लढाई चालू ठेवा. तुम्ही तिथे आहात या जाणीवेनही कदाचित जहाज न सोडण्याची आमची उमेद जागी होईल, नाविकांच्या नव्या पिढ्या खवळलेल्या समुद्राचं आव्हान पेलायला सज्ज होतील. ❑

---


डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला 'माणूस' केले. मनुष्यात 'ईश्वरी' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.

म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

# चार्ल्स डार्विन

**व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती**

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार
विवेचनासह प्रकाशित झालेली
पहिली आवृत्ती.

**किंमत : रुपये बत्तीस**

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी
त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ३०.

# शब्दांचं अंगण

आशा कर्दळे

## प्रवासवर्णनं

मनमुराद भटकणं आणि त्या भ्रमंतीच्या रम्य आठवणी सांगणं हा मनुष्यस्वभावच आहे. प्रवासवर्णनं या स्वभावातूनच निर्माण होतात. देशाटन केल्यानं ज्ञान आणि अनुभव निश्चितच समृद्ध होतात. 'पूर्वरंग'च्या लहानशा प्रस्तावनेत पुलंनी समर्थांचं एक वचन उद्धृत केलंय. 'सृष्टीमध्ये बहुलोक, परिभ्रमणे कळे कौतुक' आता तर अनेक साधनांनी जगातली अंतरंच मिटवून टाकली आहेत, आणि प्रवास करताना तर सर्व जगात इथून तिथून सारखी माणसं. अगदी आपल्यासारखी ही आणखी जवळिकीची भावना निर्माण होते.

मराठीत आत्मचरित्रांचा मानदंड जसा 'स्मृतिचित्रे', तसा प्रवासवर्णनाचा मानदंड वाईकर भटजींचं 'माझा प्रवास'. त्यानंतर मराठीतल्या प्रवासवर्णनाच्या दालनात आपापले डेकोरेटिव्ह पीसेस आणून ठेवले पु. ल. देशपांडे, अनंत काणेकर, गंगाधर गाडगीळ, रा. भि. जोशी, रमेश मंत्री यांनी आणि इतर अनेकांनी. पुलंची पूर्वरंग, अपूर्वाई ही पुस्तकं म्हणजे परदेशातल्या फेरफटक्याचा निखळ आनंद. कारण अगदी पूर्वतयारीपासून अनुभव घेणारं मन हे पुलंचं समृद्ध मन होतं. त्यामुळे जागोजाग विनोदाची कारंजी थुईथुई उसळली. गंगाधर गाडगीळ यांचं 'गोपुरांच्या प्रदेशात' सुभग दक्षिणेतला मनोहारी प्रवास घडवून गेलं.

प्रवासवर्णन हा सदा जिवंत वाटणारा असा वाङ्मय प्रकार आहे. कारण स्थळं तीच असली, तरी बघणारी व्यक्ती वेगवेगळी असते. प्रवासवर्णनात नुसतंच स्थलवर्णन असतं तर लोकांनी ते वाचलं नसतं. त्यांना केवळ माहिती नको असते. कारण माहिती पर्यटन खात्यानं काढलेल्या सचित्र पुस्तिकांमध्ये भरपूर असते. प्रवासवर्णनातून वाचकाला अपेक्षित असतो स्थलांचं व्यक्तिमत्त्व आणि लेखकांचं व्यक्तिमत्त्व यांच्या सुंदर मिलाफातून आकारलेला तितकाच सकस अनुभव. व्यक्ती बदलते म्हणून तर स्थळाला रोचक संदर्भ प्राप्त होतो. तसं नसतं तर एकदा एखाद्या लेखकानं जपानला भेट देऊन प्रवासवर्णन लिहिल्यावर दुसऱ्या कोणी पुन्हा लिहिलंच नसतं. जपानचं किंबहुना कोणत्याही स्थळाचं सौंदर्य, बघणाऱ्याच्या नजरेत आहे म्हणून तर पुलंनी केलेलं जपानचं वर्णन, गंगाधर गाडगीळांचं, रमेश मंत्र्यांचं जपान वर्णन आपण सारख्याच आवडीनं वाचतो. दरवेळी ते वेगळंच आणि नवंच वाटतं कारण त्याचा कर्ता बदललेला असतो. प्रवासवर्णन हा वाङ्मय प्रकार एका अर्थानं तसा विकसितही होत नाही. म्हणजे कथा, कादंबरी, नाटक यांचं स्वरूप कालौघात जसं बदललं, तसं त्याचं बदलू शकणार नाही. पण आडव्या पातळीवर ते खूप विस्तारेल. एकाच स्थलाकडे बघणारे अनेक दृष्टिकोन त्यात येऊ शकतील.

### विलोभनीय जपान

अलिकडे रमेश मंत्री यांनी चांगली प्रवासवर्णनं लिहिली आहेत 'तरंगणारे शहर' हे त्यांचं मेनका प्रकाशननं प्रसिद्ध केलेलं पुस्तक व्हेनिस, अथेन्स, होनोलुलू, बर्लिन, डलास, फ्लॉरेन्स, ब्रुसेल्स, रोम, लॉस एंजेलिस, हाँगकाँग, शिकॅगो, बँकॉक, टोकियो या साऱ्या विशिष्ट व्यक्तिमत्त्व असलेल्या शहरांची सफर घडवून आणतं रमेश मंत्री म्हणतात, 'तरंगणारं शहर म्हटलं की इटलीतील व्हेनिस आठवतं. कालव्यांचं हे शहर म्हणजे शब्दशः तरंगणारं शहर. पण तसं पाहिलं तर जगातली सारी शहरं तरंगणारीच असतात. पण असं तरंगताना ती आपल्या खालच्या मातीशी, पाण्याशी इमान राखून असतात. त्यांची मुळं तिथंच खोलवर रुजलेली असतात.' अशा जगभरातल्या तरंगणाऱ्या शहरांची त्यांनी ओळख करून दिली आहे. प्रत्येक शहरांचं मर्म त्यांनी अचूक ओळखलं आहे. या शहरांना एकदा तरी भेट द्यावी अशी ओढ वाटायला लावणारी ही वर्णनं आहेत. व्हेनिस हे शहर खरोखर अद्भुत. जिथं एकही मोटार नाही, वाहतूक नियंत्रण करणारा पोलीस नाही. हे शहर पाहून पृथ्वीवरच्या स्वर्गाची झलक मिळते. रोमचा वैभवशाली इतिहास, सांस्कृतिक स्फूर्तिकेन्द्र फ्लॉरेन्स, शिल्प–संगीताचं माहेरघर नेपल्स ही सगळी शहरं प्राचीन इतिहासाची श्रीमंत लेणी मिरवत आज उभी आहेत. अथेन्सनं जगाला दिलेल्या देणग्या केवळ अपूर्व आहेत. सॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल, प्लेटो हे तत्त्वज्ञ, होमर, सोफोक्लिस हे महाकवी हे अथेन्सचेच. ही ग्रीस देशाची राजधानी. जगात पहिली लोकशाही इथं स्थापन झाली. फ्लॉरेन्स या शहरानं जगाला महाकवी डांटे आणि प्रख्यात खगोलशास्त्रज्ञ–गणिती गॅलिलियो दिला.

यापूर्वीची श्री. रमेश मंत्री यांची सूर्यपुत्रांचा देश जपान ( उत्कर्ष प्रकाशन ) आणि दिशांतर ( श्रीविद्या प्रकाशन ) ही दोन्ही प्रवासवर्णनं अत्यंत वाचनीय आहेत. 'दिशांतर' आणि 'तरंगणारे शहर' यांची प्रकृती मिळतीजुळती. आपल्या खुमखुशीत शैलीद्वारे त्यांनी दिशांतरमध्ये जपानपासून अमेरिकेपर्यंतचा एक पट्टा आपल्यासमोर सादर केला आहे. ते वर्णनीय स्थळांची केवळ जंत्री न देता तिथली, माणसं, त्यांचे स्वभाव, वातावरण यांची नेमकी वैशिष्ट्यं सांगतात. जपान हा कुतूहल चाळवणारा आणि भेटीत ते पराकोटीला नेणारा देश. 'सूर्यपुत्रांचा देश जपान' या पुस्तकात जपानचा इतक्या विविध अंगांनी परिचय करून दिला आहे की, एक परिपूर्ण कोश अथवा या प्रवासवर्णनाचं वर्णन करावं लागेल. जपान या शब्दाची व्युत्पत्ती सांगताना ते म्हणतात, निप=पोन असा हा शब्द तयार झाला असून त्याचा अर्थ उगवता सूर्य. या देशात राजकीय स्थैर्य आहे; पण महागाई कमालीची. टोकियो हे जगातलं सर्वांत महाग शहर. जपानमध्ये बरीचशी कामं यंत्रमानवच करतात. तिथं लिखाणावर उत्तम गुजराण होऊ शकते. जपान हा आधुनिक जगातला चमत्कार आहे. या देशाची ओळख नाट्यसृष्टी, राजकारण, वृत्तपत्रसृष्टी, जाहिराती, भाषा, क्रीडा, व्यवस्थापन, शिक्षण, शेती, महिला अशा अक्षरशः अनेक बाजूंनी ते

करून देतात तेव्हा प्रश्न पडतो, आता जपानविषयी अधिक जाणण्याचं काही उरलंय का? जपानच एक लोभस वैशिष्ट्य. जपान हा सणांचा आणि उत्सवाचा देश! जपानमध्ये किती सण असावेत? तीनशे पंचावन्न! वर्षभर जवळ जवळ सण असतातच! सणाला मात्सुरी म्हणतात.

श्रीविद्या प्रकाशनचं श्री. सुभाष भेंडे यांनी लिहिलेलं 'गड्या आपुला गाव बरा' या पुस्तकाचा वेगळ्या संदर्भात उल्लेख करावा लागेल. अमेरिका या देशाविषयी इतक्या जणांनी इतकं लिहिलंय की आणखी काही शिल्लक राहिलंय असं वाटत नाही. म्हणूनच रूढार्थानं ते प्रवासवर्णन नाही; पण प्रवासकथा आहेत. गंगाधर गाडगीळांनी अशाच प्रवासकथा (प्रवासातल्या अनुभवांना कथाचं रूप दिलेलं) लिहिल्या होत्या. श्री. भेंडे म्हणतात, अमेरिका पाहिल्यानंतरची इम्प्रेशन्स या लेखामध्ये आहेत. प्रत्येक लेखाचा घाट वेगळा आहे अनुभवाच्या प्रकृतीनुसार आकारही वेगळा. अमेरिकेला निघताना विमानसेवेसंबंधी त्याना जे अनुभव आले, त्यावर त्यांनी मजेदार कॉमेन्ट्स केल्या आहेत. त्याना विमानापेक्षा आपली बार्शीलाइट रेल्वे लाइनच बरी वाटते. अमेरिकन विमानकंपनी भारतापेक्षा काही खास बरी नाही असं त्यांचं मत तयार होतं. मात्र जे चांगलं आहे तेही ते कबूल करतात. सार्वजनिक ठिकाणी माणसाचं जगणं सुखाचं व्हावं म्हणून अमेरिकेत अनेक सोयी आहेत. अमेरिकेच्या अर्थशास्त्राविषयी ते म्हणतात, मास प्रॉडक्शनमुळे वस्तू स्वस्त पण मानवी श्रम महाग. त्यामुळे वस्तू दुरुस्त वगैरे करण्याच्या भानगडीत कोणी पडतच नाही. केवळ निसर्ग समृद्ध असला की देश समृद्ध होत नाही माणस परिश्रम करणारी, घाम गाळणारी हवीत. आपल्या देशात हेच नेमकं नाही. अमेरिकेत कुत्र-मांजर म्हणून तरी जन्म घ्यावा इतकी समृद्धी कारमध्ये इतक्या सोयी असतात की कार हे अमेरिकन माणसाचं दुसरं घरच असतं. मात्र शेवटी लेखक म्हणतो, अमेरिकेत कायम रहायला मात्र त्याला आवडणार नाही. कारण तिथली सुखच नंतर दुखायला लागतात. भारतातून आपले कार्यक्रम अमेरिकेत सादर करू इच्छिणारी अनेक मंडळी अमेरिकेतल्या भारतीय कुटुंबांना कशी डोकेदुखी होऊन बसते याचं मजेदार वर्णन श्री. मंत्री करतात. रात्री अपरात्री अशा भारतीयांचे फोन येतात, तेवढं कार्यक्रमाचं जमवाच म्हणून; पण असे कार्यक्रम खऱ्या अर्थानं परकीय रंगभूमीवर जातात का? ते अमेरिकेतले काय किंवा इतर कुठल्याही देशातले फक्त भारतीयच बघतात.

## काश्मिर–गुजरात

जन्माला येऊन एकदा तरी परदेशची वारी करावी अशी प्रत्येकाची सुप्त इच्छा असते; पण आपल्याच देशात कमी पाहण्यासारखं आहे का? वैचित्र्यानी नटलेला आणि उभा आडवा अफाट पसरलेला आपला देश! तो सगळा बघायचा म्हटला तरी आयुष्य पुरणार नाही. स्वदेशाच दर्शन घडवणारी (अर्थात सगळ्या देशाचं एकदम नव्हे, तर एकेका भागाच) काही चांगली प्रवासवर्णनं वाचायला मिळतात. त्यात प्रा. सौ. मेधा काळे यांची पाचही प्रवासवर्णनं उल्लेखनीय. 'बद्रीनाथ – पशुपतीनाथ' हे शालीमार प्रकाशनने प्रकाशित केलेलं त्यांच पाचवं पुस्तक त्याआधी 'शालीमारची साद', 'कोणार्क ते कन्याकुमारी' वगैरे चार प्रवासवर्णनं वाचकांना आवडली. ही सरळ साधी प्रवासवर्णनं. सामान्य पर्यटकांना जशी हवी तशी 'बद्रीनाथ–पशुपतीनाथ' या पुस्तकात हिमालयातल्या निसर्गसुंदर, गढवाल, कुमाऊ, नेपाळ, दार्जिलिंगपर्यंतच्या दीर्घ प्रवासावर आधारित प्रवासवर्णन आहे आणि ते रसिक पर्यटकाच्या अपेक्षा पूर्ण करील, अशी लेखिकेला अपेक्षा आहे सर्वसाधारण पर्यटकांना माहिती देणे आणि पर्यटनस्थळाचं सौंदर्य उकलून दाखवणं हा या पुस्तकामागचा उद्देश आहे त्यामुळे इतर तपशील आणि स्वतंत्र संदर्भाची अपेक्षा करायला नको मात्र पर्यटक प्रवासाला निघताना इतर गरजेच्या वस्तूमध्ये या पुस्तकाचाही आवर्जून समावेश करतात, हा अनुभव आहे पुस्तकाच्या सोबतीनं प्रवास करण्याची आवड लोकामध्ये निर्माण होत आहे ग्वाल्हेर, आग्रा, नैनिताल, लखनौ, नेपाळ, काटमांडू, वाचनगंगा, दार्जिलिंग आणि कलकत्ता असा उत्तर भारताचा एक पट्टा या पुस्तकातून आपल्याला भेटायला येतो.

श्री. शांतिलाल भंडारी हे एवढ्यात उदयाला आलेले प्रवास लेखक. त्यांची दोन प्रवासवर्णनं थोड्याच अंतरानं आलीत. पहिलं, 'सी यू अगेन' हे काश्मिरचं प्रवासवर्णन. श्री. भंडारी हे केवळ गाइडच्या भूमिकेत वावरत नाहीत, तर गप्पा करणारा सोबती–सवंगडी पण होतात त्यांच्या प्रवासात एखादी पर्यटक बस निघाली असते स्थळ बघायला. आपल्या निवेदनात ते या समूहाला कधी विसरत नाहीत. काश्मिरचं स्वर्गीय सौंदर्य देखण्या शैलीत वर्णन करण्यात जास्त न रमता ते त्या त्या ठिकाणची चौफेर माहिती देतात. काश्मिर हा प्राचीन काळी जलप्रदेश असावा, महाप्रचंड सरोवर असावं, कश्यपमुनींच्या अद्वितीय कर्तृत्वामुळे 'कश्यपमार' किंवा काश्मिर हे नाव मिळालं असावं अशी पौराणिक, ऐतिहासिक माहिती ते अधिक देतात. निशात आणि शालीमार या काश्मिरच्या लावण्यखनी बागा. त्याहीवेळी निशात बागेची रचना नूरजहाँचा भाऊ आसफ खाँ यानं केली, दाललेक परिसरात सम्राट अकबरानं बाराशे चिनार वृक्ष लावले व ते आज ३७० वर्षांचे प्राचीन आहेत हे सांगून आपली जिज्ञासा ते पूर्ण करतात.

श्री. भंडारी यांच, दुसरं नवं प्रवासवर्णन 'साबरमती ते साबरमती' सीमा पब्लिकेशन्सन ते प्रकाशित केलं आहे या प्रवासवर्णनात त्यांनी गुर्जरभूमीच, विशेषत: कच्छ विभागाचं जे दर्शन घडवलं आहे, ते अतिशय विलोभनीय आहे. गुजरातची भूमी, माणसं, त्यांचा स्वभाव, समाज, लोकरीती, इतिहास, पौराणिक संदर्भ, भाषा यांचे प्रत्ययकारी आणि जिवंत संदर्भ टिकटिकाणी विखुरले आहेत. गुर्जरभूमी ही तीर्थांची भूमी! कच्छ, सौराष्ट्र, काटेवाड आणि गुजरात अशा चार विभागानी मिळून बनलेल्या महागुजरात राज्यात असंख्य जैन तीर्थ आहेत. एक मात्र खरं की, 'सी यू अगेन' काय किंवा हे प्रवासवर्णन काय, निर्जीव स्थळाच्या केवळ वर्णनात्मक पातळीवर थांबत नाही, तर त्या त्या वर्ण्य स्थळाला जिवंत व्यक्ती मानून त्याचा मागोवा घेते. मंदिराचं बांधकाम, स्थापत्य रचना या बाह्य गोष्टींचा परिचय करून देण्याबरोबर श्री. भंडारी दगडामागचा मानवी संदर्भ शोधतात. ज्या ठिकाणी अधिक संशोधनाची गरज आहे, तिथं तशी आवर्जून

नोंद करतात. श्री. भंडारी यांनी गुर्जरभूमीतून घडवून आणलेला प्रवास मनोहारी वाटतो तो त्यांचे संदर्भ स्वतंत्र आणि स्वतःचे आहेत म्हणून.

'काळ्या पाण्याची निळाई' हे निरंजन प्रकाशनचं, वासंती घैसास यांचं प्रवासवर्णन अंदमान निकोबार बेटांवर आपल्याला घेऊन जातं. भारताच्या पूर्वेकडे थायलंड आणि भारताच्या दरम्यान विखुरलेली ही बेटं. सावरकरांच्या 'काळेपाणी' नं आणि त्यांच्या जन्मठेपेनं अंदमानला तेजोवलय कधीचंच प्राप्त करून दिलेलं. त्या पुण्यभूचं दर्शन एकदा तरी घ्यावं असं कोणाला वाटणार नाही? जपानची बेटं पाहून पुलंना 'रत्नजडित कंठा कोणीतरी समुद्रात फेकून द्यावा, तशी ती पाचूची बेटं' वाटली होती. हेही काळ्या पाण्यावर चमकणारे शुभ्र हिरे आहेत. उत्तर अंदमान, मध्य आणि दक्षिण अंदमान, लहान अंदमान, कार निकोबार आणि ग्रेट निकोबार अशी ही बेटांची मालिका आहे. अनेक राजबंद्यांच्या वास्तव्यानं पुनीत झालेलं आणि सौंदर्याचं वरदान लाभलेलं हे मुक्तितीर्थ आहे असं लेखिकेला वाटतं. सावरकरांना ज्या अंधार कोठडीत ठेवलं होतं, ती सेल्यूलर जेलमधली छोटी खोली, त्यांनी चालवलेला कोलू घाणा या सर्वांची छायाचित्रांसह ओळख करून दिली आहे बेटांवर बरीच वस्ती आदिवासींची. जारवा ही जात तिथं राहते. अद्यापही सुधारणांचा वारा न लागलेल्या या जमातीबद्दल अत्यंत रोचक माहिती हे पुस्तक देतं. 'जिरका टांग' या नावाचा संरक्षित प्रदेश या बेटांवर आहे. तिथं आदिवासींच्या धनुष्यबाणाला एखादा प्रवासी बळी पडला तरी आदिवासींना तो गुन्हा माफ आहे. सर्वसामान्य पर्यटकांची सोय बघूनच हे प्रवासवर्णन लिहिलं आहे. त्यामुळे उतरण्यायोग्य अशी हॉटेल्स, रेस्ट हाऊसेस, निरनिराळ्या बेटांवर जाण्यासाठी असणाऱ्या बोटींच्या किंवा इतर वाहनांच्या सोयी, त्यांच्या वेळा, तिथं मिळणारे खाद्यपदार्थ या सर्वांची नोंद लेखिकेनं केली आहे. संदर्भांच्या आणि अनुभवांच्या आविष्कारांच्या फारसं तपशिलात न शिरता लिहिलेलं हे प्रवासवर्णन प्रत्यक्ष दर्शनाची नांदी म्हणून पुरेसं आहे.

अगदी साचेबंद प्रवासवर्णनं नाहीत; पण त्याच अनुभवांच्या अंगानं जाणारे ललितवृत्तांत लिहितात व्यंकटेश माडगूळकर आणि माधव गडकरी. दोघांचा प्रांत अगदी भिन्न. माडगूळकरांची पुस्तकं आपल्याला दाट जंगलात घेऊन जातात तर गडकऱ्यांची पुस्तकं आपली सामाजिक आणि राजकीय जाण जागृत करत चीन आणि रशियाच्या दौऱ्यावर घेऊन जातात.

आता तर कोणीही कुठेही जाऊन आलं तरी लगेच एक पुस्तक तयार होतं. वाचकांनाही दुधाची तहान ताकावर भागवण्यासाठी ते वाचावंसं वाटतं. व्यक्तिगणिक आत्मचरित्र होऊ शकेल म्हणतात, तसं व्यक्तिगणिक प्रवासवर्णनं होणं अशक्य नाही. □

---

पुस्तके

# 'मी–एस्. एम्.' एक वादग्रस्त आत्मचरित्र

वि. शं. पारगावकर

साथी एस्. एम्. जोशी यांचे आत्मचरित्र वाचून संपविले आणि भारताच्या एका मोठ्या कालखंडाला जाग आल्यासारखे वाटले. सत्तर–ऐंशी वर्षांचा एक कालखंड. पारतंत्र्याचा काल आणि स्वातंत्र्यानंतरचा अगदी आजवरचा काळ. त्यातही स्वातंत्र्यपूर्व काळ हा एक झंझावाताचा काळ होता. अगदी स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा काळ हा एक देश बांधणीचा काळ होता. एस्. एम्. जोशी या दोन्हींचेही साक्षीदार आहेत. एकीकडे ते साक्षीदार आहेत आणि दुसरीकडे कृतीवीर आहेत.

आपल्याकडे राजकीय इतिहास तर फारसा लिहिला गेलेलाच नाही; परंतु राजकीय व्यक्तींची चरित्रे आणि आत्मचरित्रेही विपुल प्रमाणात लिहिली गेलेली नाहीत. त्या दृष्टीने आपण अजून अंधारातच चाचपडत आहोत असे म्हटले पाहिजे. भारताच्या या स्वातंत्र्यलढ्यात जे मोठमोठाले कृतीवीर आणि नेते होऊन गेले त्यांची आत्मचरित्रे तर नाहीतच जमा आहेत आणि चरित्रे देखील त्या त्या चरित्र लेखकांच्या छायेखालीच वाढलेली दिसतात. कारण या लेखन प्रकारासाठी चरित्र लेखकाच्या ठिकाणी जे गुण असावे लागतात त्यांचा येथे प्रामुख्याने अभावच दिसतो.

अगदी अलिकडे मात्र काही आत्मचरित्रांची निर्मिती झालेली दिसते. ही एक माझ्या दृष्टीने अगदी महत्त्वाची गोष्ट आहे. नेहरूंनी तर १९३५ नंतर पुढे आपले आत्मचरित्र लिहिलेच नाही. महात्मा गांधींनीही तेच केले. यशवंतराव चव्हाणांनी आपल्या आत्मचरित्राचा एक खंड जेमतेम पूर्ण केला आणि ते काळाच्या पडद्याआड झाले.

त्या दृष्टीने एस्. एम्. जोशी यांचे हे आत्मचरित्र 'अप टू डेट' आहे असे म्हणावे लागेल. आत्मचरित्र म्हणजे प्रामुख्याने त्या व्यक्तीच्या जीवनाचा इतिहास आणि आपल्या जीवनामधून ती व्यक्ती जो इतिहास घडवीत असते त्या घटनांचाही इतिहास असे दुहेरी स्वरुप आत्मचरित्र या साहित्य प्रकाराचे असते. व्यक्तीच्या जीवनाचा विकास ज्या स्वाभाविक टप्प्यांमधून झालेला असतो त्याच कालानुक्रमे तो आत्मचरित्रात आला

पाहिजे. असे झाले म्हणजे जीवनविकास आणि सभोवतालची परिस्थिती याचे चित्र अधिक स्पष्ट होते बिंब आणि वातावरणात पडणारे त्याचे प्रतिबिंब यामध्ये निर्माण होणारे नाते अतूट राहते आणि त्यामुळे अशा प्रकारच्या आत्मचरित्रपट साहित्याला जे एक रूप यावे लागते त्या रूपाचे प्रत्ययकारी दर्शनही वाचकाला सहजपणे घडते.

परंतु कित्येक महत्वपूर्ण आत्मचरित्रपर ग्रंथांमध्ये असे दर्शन घडताना दिसत नाही. अशी आत्मचरित्रे अनेक अर्थांनी दोषपूर्ण असतात असे म्हणावे लागते. जीवन धाग्याला चिकटलेला काळाचा लंबक असा मागे पुढे हेलकावत गेल्यामुळे चरित्रातील सदर्भाचा पोत विस्कळीत होतो आणि परिणामाच्या दृष्टीने अशी आत्मचरित्रे अपेशी ठरतात

आपले आत्मचरित्र लिहिणारी व्यक्ती ही अनेक दृष्टींनी समाजात महत्त्वाचे स्थान मिळवून बसलेली असते ती व्यक्ती कित्येक महत्त्वपूर्ण घटनाची निर्मातीदेखील असते आणि या घटनाना सास्कृतिक, सामाजिक अथवा राजकीय महत्त्वही प्राप्त झालेले असते. इथे एका इतिहासाचीच निर्मिती झालेली असते. अशा वेळी या साहित्यामधील काळाचा लवक जर असंबद्धपणे मागे पुढे फिरू लागला तर वाचकाच्या मनात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे चरित्रनायकावर विकासाचे रूप फार काटेकोरपणे साभाळण्याची जबाबदारी असते.

एस्. एम्. जोशी याच्या लेखनात त्यानी असे रूप साभाळण्याकडे लक्ष दिल्याचे दिसत नाही.

## चरित्रातले मन

आत्मचरित्रकाराच्या मनाचा चंद्र विचारांच्या, प्रयोगाच्या, तत्त्वज्ञानात्मक टीपाच्या ढगामधून जाताना कित्येकदा मध्येच लुप्त होतो, तर अनेकवेळा त्या चंद्रबिंबावर त्या त्या विचाराच्या, अथवा भाष्याच्या गडद सावल्या पडतात. त्यामुळे त्याच्या मनाचे चंद्रबिंब झाकळून गेलेले दिसते, मलीन झालेले दिसते किंवा आपल्या खऱ्या तेजापासून वंचित झालेले दिसते. आपल्या चरित्रग्रथात एस. एम जोशी याच्या मनाचे कित्येक वेळा असे दिसते.

परंतु एस. एम. यांच्या जीवनात जो इतिहास घडविलेला आहे आणि जो इतिहास त्यांनी घडविलेला आहे, त्या इतिहासाला कालची आणि आजची पिढी साक्षी असल्यामुळे असे विस्कळीत दुवे सहजपणे तिच्याकडून साधले जातात आणि त्याच्या जीवनाची सगती लावता येते.

मात्र एक विचारधारा, आणि जिचा उगम एस. एम. याच्या व्यक्तिमत्वामधून झालेला आहे, त्या विचारधारेचे विश्लेषण एस. एम. फार समर्थपणे करतात. त्यामुळे कालप्रवाहाचा सलग बध जरी मध्ये मध्ये विस्कळीत झालेला असला अथवा मागेपुढे झाला असला तरी एस. एम. याचे प्रवाही आणि पारदर्शक मन या सर्व तांत्रिक त्रुटीवर मात करताना दिसते.

एक तळमळीचा कार्यकर्ता, एक राजकारणी मन असलेली व्यक्ती, समाजाविषयी आणि त्यामधील व्यक्तीविषयी अहर्निश तळमळ बाळगणारा एक पुरुष म्हणून त्याच्या जीवनाचे अवलोकन करताना एस. एमविषयी ज्याना कृतज्ञता वाटलेली नाही अशी भारतीय व्यक्ती शोधून सापडणार नाही. आपले जीवन हे सदैव आपल्यासाठीच आहे, असे विचार एस. एम जोशी यांच्या मनाला कधीही शिवलेले नाहीत त्याच्या लहानपणापासून आजपर्यंतचा जर त्याच्या जीवनाचा आलेख काढला तर त्या आलेखामध्ये त्याच्या स्वत.साठी त्यानी थोडीही जागा राखून ठेवली असल्याचे दिसत नाही. त्याचे जे जीवन आहे तं खऱ्या अर्थाने समर्पित जीवन आहे; पण आपले जीवन समर्पित आहे याचा थोडादेखील दर्प त्याच्या मनाला शिवलेला नाही !

या त्याच्या व्यक्तिमत्वाची अनेक उदाहरणे देता येतील. सर्वात मोठे आणि महत्त्वाचे उदाहरण म्हणजे त्याचे कौटुंबिक जीवन. त्याच्या कौटुंबिक जीवनाविषयीचे उल्लेख त्याच्या आत्मचरित्रात अगदी त्रोटकपणे येतात, इतकेच नव्हे तर त्यामध्येदेखील विलक्षण कोरडेपणा जाणवतो. किंबहुना मनुष्यजातीचे आणि समाजाचे राजकारण आणि समाजकारण करणारा हा नेता साऱ्या राजकारणाकडेच आणि समाजकारणाकडे अगदी अलिप्तपणे पाहताना दिसतो. आपल्या कुटुंबात घडलेल्या काही मृत्युकडे, तसेच सहकाऱ्यांच्या, समकालिनांच्या आणि काही महान नेत्याच्या मृत्युकडेदेखील पाहण्याची त्याची दृष्टी अगदी अलिप्त वाटते इतकेच नव्हे तर ६४ दिवसाच्या अन्न सत्याग्रहानतर जतींद्रनाथाचे तुरुगात झालेले निधन, याचा परिणाम जसा समकालीन राजकीय नेत्यावर झालेला दिसतो, तेवढा परिणाम एस. एम. याच्या मनावर झालेला दिसत नाही. ( पान ३८ ).

विशेषतः त्यांच्या या मनाच्या अलिप्तपणाचा विचार करता एक गोष्ट प्रामुख्याने जाणवते ती अशी की, एस. एम. याच्या एकूण व्यक्तिमत्वाचे विश्लेषण करता असे लक्षात येते की, खऱ्या अर्थाने त्याचे व्यक्तिमत्व जे घडलेले दिसते त्याचा उगम साने गुरुजी, नाथ पै आणि जयप्रकाश नारायण याच्या व्यक्तिमत्वातील मिश्रणाने झालेला दिसतो जयप्रकाश नारायण याच्याविषयी राजकीय मतभेद कितीही असोत, त्याचे महान मानवतावादी मन आणि त्याचे विलोभनीय दर्शन घडल्याशिवाय राहात नाही. नाथ पै याची काही जाहीर भाषणे आणि लोकसभेमधील पल्लेदार आणि प्रभावी वक्तृत्व पाहिले, त्यामधून मानवजातीविषयी वेळोवेळी प्रगट झालेला जिव्हाळा पाहिला तर याची प्रचिती सहज येते साने गुरुजीच्या विशाल मानवतावादी मनाची ग्वाही देण्याचे तर कारणच नाही.

परंतु या पार्श्वभूमीवर एस. एम याचे त्याच्या आत्मचरित्रामधून व्यक्त झालेले मन अभ्यास करण्यासारखे आहे. म्हणूनच त्याच्या नेतृत्वाला भारताच्या तळागाळातून प्रतिसाद मिळालेला दिसत नाही. याचे कारणदेखील हेच असावे असे वाटते. कोणत्याही, नेतृत्व अंगी असलेल्या व्यक्तीचे मन त्याचे एक टोक सतत लोकसमुदायाच्या हृदयाला भिडलेले असावे लागते. जनमानसामध्ये चैतन्य निर्माण करणे, त्याला कार्यप्रवृत्त करणे आणि त्याला सारखे झपाटलेपण देत रहाणे हे नेत्याचे ध्येय आणि कार्य असावे लागते; परतु एस. एम. जोशी याच्या बाबतीत असे घडलेले दिसत नाही त्याच्या आत्मचरित्रामधून तरी ते स्वत च कार्यकर्ते वाटतात आणि लोकसग्राहक देखील ते स्वत.च वाटतात. याची कारणे काय असावीत याचा विचार केला तर कारणेच कारणे मनापुढे उभी राहतात !

## असे प्रसंग कमीच !

एस्. एम्. याच्या राजकीय नेतृत्वाचा विचार केला तर ते स्वयंप्रकाशी असल्याचे दिसत नाही. इंडियन नॅशनल काँग्रेसमध्ये ते जेव्हा होते, तेव्हा तेथेही त्याचे स्थान महत्त्वपूर्ण नव्हते. किंबहुना त्या वेळी ते विद्यार्थीदशेतच होते असे म्हणावे लागेल. शिवाय काँग्रेसचा इतिहास आणि दबदबा फार मोठा होता. काँग्रेसच्या कार्याची दिशा आणि देशाच्या कानाकोपऱ्यात काँग्रेस उठवीत असलेला आवाज हा जनतेचा आवाज होऊ लागलेला होता. त्या आवाजाशी एस्. एम्. आणि त्यांच्या म्हणून असणाऱ्या सहकाऱ्यांचे कुठेच नाते जुळले नाही. त्याच्या तारुण्याच्या काळात 'समाजवाद' हा एक आकर्षक शब्द होता. भांडवलशाही राष्ट्रांनी लादलेली गुलामगिरी आणि भांडवलशाहीमुळे निर्माण झालेली आर्थिक विषमता याखाली भरडत जाणाऱ्या सामान्य माणसाच्या जीवनाचा तोल सांभाळायचा असेल तर त्यासाठी 'समाजवादी' रचना अत्यंत आवश्यक होती. याविषयी मतभेद होण्याचे काहीच कारण नव्हते. पुढे काँग्रेसमधून फुटून निघालेल्या एका गटाला 'समाजवादी' विचारसरणीचा जसा मोह पडलेला होता तसाच काँग्रेसमध्ये राहून कार्य करू इच्छिणाऱ्या नेहरूंसारख्या नेत्यालाही या परवलीच्या शब्दाने आकर्षित केलेले होते. आजही आपण पुरेशा डाव्या विचारसरणीच्या राजकारणाचा अंगिकार केलेला नसला, तरी जगातील डाव्या विचारसरणीची राष्ट्रे आपल्याला जास्त जवळची वाटतात आणि आपला देश अलिप्ततावादी असून देखील याच विचारसरणीच्या देशाकडे अधिक झुकलेला आहे असा आपल्यावर आरोप केला जातो आणि त्या आरोपामध्ये तथ्यांशही आहे याचे कारण काय ? या प्रश्नाचा विचार भारतीय नेतृत्वाने आणि प्रत्येक राजकीय कार्यकर्त्याने करावयाचा आहे.

हा एक अत्यंत गुंतागुंतीचा परंतु भारतीय राजकारणाला आवश्यक असलेला, डाव्या विचारसरणीचा आणि तरीही अलिप्ततावादी विचार,स्वातंत्र्यपूर्व काळात केव्हा सुरू झाला? राजकारणी या दृष्टीने समाजवादी विचारसरणीचा विचार आणि अंगिकार एस्. एम्. यांनी केलेला दिसतो, तसा राष्ट्राला अलिप्ततावादी तत्त्वज्ञान देण्याच्या विचारासंबंधी एस्. एम्. आपल्या आत्मचरित्रात काही बोलत नाहीत.

हे जसे आहे, तसेच आणखीही एक गोष्ट जाणवल्याशिवाय राहत नाही. ती म्हणजे देशाच्या फाळणीच्या संदर्भात पाकिस्तानच्या निर्मितीच्या संदर्भात (पान १७०) एस्. एम् केवळ एक कोरडे ऐतिहासिक निवेदन करतात. उलट स्वातंत्र्यप्राप्तीच्या क्षणाचा ते जो उल्लेख त्याच १७० पानावर करतात, त्यामध्ये स्वत.चे आत्मचरित्र लिहिणाऱ्या व्यक्तीचे मन दिसत नाही. मात्र या प्रकरणाचा शेवट मात्र ते अत्यंत संयमित मनाने करीत असले तरी तिथे मात्र त्यांचे सानेगुरुजीचे मन व्यक्त झाल्याशिवाय राहात नाही ! ते म्हणतात, '...तो पहिला स्वातंत्र्यदिन–छत्रजवदनाचा समारंभ जनसागराच्या वेढ्यात राहून बघत असता माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले.' आणि पुढच्या वाक्यात ते एक अप्रतिम प्रतिमा उभी करतात. 'न्यू इंग्लिश स्कुलमधून गायकवाडवाड्यात जाऊन पहिल्याने लोकमान्यांना पाहिले, तेव्हा जसे बालमन आणि शरीर ही दोन्ही थरारली होती, तशीच काहीशी मनाची अवस्था याही वेळी झाली.' या ४२७ पानात अशी काही तुरळक वाक्ये वाचली की वाचकाचे मनदेखील एस्. एम् सारखेच थरारते पण असे प्रसंग फारच कमी म्हणूनच एस् एम्. याचे हे काही खरेखुरे आत्मचरित्र नाही असे मनाला सारखे जाणवत राहते. आपल्या मनोगतामध्ये एस् एम्. लिहितात, 'हे सारे लिहिण्याचा हेतू इतकाच की, हे पुस्तक म्हणजे माझे खऱ्या अर्थाने आत्मचरित्र आहे असे नाही जीवनामध्ये जे काही घडले त्याचे निवेदन आहे मी स्वतः बसून ते लिहिलेले नाही. मी माझे जीवन कसा जगलो, जीवनात वेळोवेळी ज्या ज्या समस्या निर्माण झाल्या,त्यांना तोंड कसे दिले, त्याच्या माझ्या जीवनावर कोणत्या प्रतिक्रिया झाल्या हे या पुस्तकावरून कळेल.' परंतु हे त्याचे मनोगत देखील त्यांच्या आत्मचरित्र निवेदनाच्या विरोधीच जाते. कारण कोणतीही व्यक्ती जेव्हा स्वत.विषयी काही सांगण्याचा प्रयत्न करते, तेव्हा तिच्या बुद्धीपेक्षा तिचे मनच विशेष कार्यरत असते; असावे लागते. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, व्यक्तीच्या आत्मचरित्रात बौद्धिक किंवा वैचारिक विलास असताच कामा नये. ते जरूर असतात. परंतु त्यांचे देखील उगमस्थान मनच असावे लागते. कारण आत्मचरित्र वाचण्याची उत्कंठा जेव्हा वाचकाच्या मनात निर्माण होते, तेव्हा त्याला प्रथम कुतुहल हेच असते की त्या त्या आत्मचरित्रातील व्यक्ती कशी आहे ? तिच्या जन्मापासून ते तिने लेखणी खाली ठेवीपर्यंत तिचा मानसिक, बौद्धिक, सांस्कृतिक विकास कसा कसा झालेला आहे, प्रत्येक घटनेभोवती तिचे मन कसकसे फिरले आहे, किंवा एखादी घटना निर्माण करताना तिच्या मनाने कोणते दिव्य केले आहे, वेळोवेळी तिने आपल्या मनाचा तोल कसा सांभाळला आहे किंवा कोणकोणत्या प्रसंगात तिचा तोल सुटलेला आहे. तिच्या जीवनात कोणकोणत्या व्यक्ती आल्या, त्यामधून कोणते संघर्ष निर्माण झाले–कोणते संगीत निर्माण झाले,मनुष्य स्वभावाचे हजारो नमुने पाहायला मिळाले, विचारमंथन कसे होत गेले आणि अशा मंथनामधून मुत्सद्देगिरीने कसा जन्म घेतला, असे अनंत प्रश्न असतात. आणि अशा प्रश्नामधूनच व्यक्तीचे मन आकारीत होत जाते. त्या मनाचा वेध घेणे, त्याची ओळख करून घेणे, तिच्या सुखात आपण हर्षभरित होणे आणि तिच्या दु खात खिन्न होणे, तिच्या गूढात डोकावून पाहणे आणि तिच्यातील महत्त्वाकांक्षेने रोमांचित होणे हे सारे आत्मचरित्राचे विषय आहेत.

## समाजवादी 'मी'

एस्. एम्. जोशी याचे आत्मचरित्र वाचक जेव्हा वाचायला घेतो तेव्हा त्याला समाजवादाचा इतिहास त्यामधून वाचावयाचा नसतो, किंवा समाजवादाच्या तत्त्वज्ञानाचा त्याला अभ्यास करावयाचा नसतो. त्याला उत्सुकता असते ती ही की समाजवादाचे इंजेक्शन टोचून घेतलेल्या एम. एम. मध्ये समाजवादाचा ज्वर कसा भिनला आहे. परंतु हे सारे या आत्मचरित्रातून काही अनुभवाला येत नाही येथे सारे जाणवते ते रूक्ष निवेदन. त्यामधून वाचकाला चैतन्याचा अनुभव मिळत नाही. एस. एम. नावाचा 'मी' तिथे दिसतो तो अत्यंत सावध भूमिका घेतलेला. सर्वांत असून कशातही नसलेला. ज्या एका मोठ्या राजकीय कालखंडाचा साक्षीभूत झालेला हा मी इतका

कोरडा ठणठणीत झालेला कसा? असा प्रश्न वाचकाला ठायी ठायी पडल्याशिवाय राहात नाही. स्वातंत्र्यासाठी अहोरात्र होम-कुंड पेटविलेल्या असंख्य हुतात्म्यांच्या पाय-वाटांवरून जाताना या 'मी'चे मन कुठेच थरारत नाही. देशाचे अखंडत्व भंग पावत असताना जालियनवाला बागेत भीषण हत्याकांड घडत असताना, बंगालची फाळणी होत असताना, काश्मिरचा लचका तुटला जात असताना, चीनच्या आक्रमणाने देशाच्या आत्म्याचा थरकाप उडालेला असताना, पाकिस्तानच्या द्वेषपूर्ण भूमिकेमुळे या देशातील मुस्लिमांच्या प्रश्नांना नेहमीच आव्हान मिळत असताना, अमेरिकेच्या पक्षपाती धोरणामुळे या देशाचा राजकीय तोल नेहमीच डळमळीत अवस्थेत असताना या समाजवादी 'मी'च्या मनावर कधीच ओरखाडे का उमटू शकले नाहीत? का विरोधी पक्षातील मंडळींनी अशा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नाकडे नेहमीच त्रयस्थाच्या भूमिकेतून पाहावयाचे असते?

कॉंग्रेसच्या ग्रहगोलापासून फुटून निघालेल्या या समाजवादी ताऱ्याचा प्रभाव आणि प्रकाश भारतीय राजकारणावर मुळीच पडलेला दिसत नाही. मग मनात असे येते की, समाजवादाची दीक्षा घेऊन देशाला समतेच्या मार्गावर आणण्यासाठीच का खरोखर हे समाजवादी लोक बाहेर पडले? तशा त्यांच्या पाऊलखुणा देशाच्या राजकारणावर कुठेच उमटलेल्या दिसत नाहीत असा निष्कर्ष मोठ्या खेदाने काढावा लागतो आणि या निष्कर्षाची बीजे एस. एम. यांच्या या आत्मचरित्रातच सापडतात. या निष्कर्षाला पुष्टी देण्यासाठी त्यांच्याच पुस्तकातील काही वाक्ये उधृत करावीशी वाटतात. 'डॉ. लोहिया यांचे लक्ष विधायक कार्यक्रमापेक्षा समझोते करून निवडून येण्यावर जास्त लागले.' (पान ३१६) 'पण काय गमत पहा. पुण्यात नानासाहेबांना त्या आवाहनात वेगळाच अर्थ दिसला, त्यांचे पुण्या-मुंबईच्या वर्तमानपत्रातून एक पत्रक प्रसिद्ध झाले. एसेमना ससोपात बहुमताचा पाठिंबा नाही, म्हणून दोन्ही पक्षाचे विलीनीकरण करून एसेम आपले बहुमत करू बघत आहेत.' (पान ३१४) डॉ. लोहिया अद्यापी रीतसर पक्षाचे सदस्यही झालेले नसताना ते सं. सो पा. चे धोरण ठरवायला लागले.' (पान ३०३) 'पक्षाच्या 'जनता' या मुखपत्रात डॉ. लोहियांनी जयप्रकाशांना नेहरूनंतर पंतप्रधान व्हायचे होते असा हेत्वारोप केला.' (पान २९१)

अशी उदाहरणे द्यावीत तेवढी थोडीच आहेत.

सत्तेसाठी, खुर्चीसाठी आणि नेतृत्वासाठी या समाजवादी लोकांचा झगडा अहर्निश चालू होता. त्यामुळे प्रश्न असा निर्माण होतो की, या लोकांना समाजवाद जनकल्याणासाठी आणावयाचा होता का स्वत:च्या खुर्चीसाठी आणि सत्तेसाठी? त्यामुळे एसेम यांचे हे आत्मचरित्र म्हणजे विरोधी पक्षाच्या राजकीय विचारांचा इतिहास असे म्हणावे लागेल. फक्त एसेम यांच्या दृष्टिकोनामधून या राजकीय इतिहासाचे लेखन झालेले आहे. कोणत्याही आत्मचरित्राला याचे वावडे असावे असे नाही. तोही एक साहित्याचा प्रकार होऊ शकतो. अशी आत्मचरित्रे पाश्चात्य वाङ्मयात बरीच आहेत. परंतु येथे प्रश्न असा निर्माण होतो की, एसेम जेव्हा आपल्या या आत्मचरित्राला 'मी-एस. एम. असे नाव देतात तेव्हा त्यामध्ये 'मी' ला प्राधान्य यायला हवे याबद्दल दुमत होऊ नये. या 'मी' ला जसे देशातल्या निरनिराळ्या घटनांनी घडविलेले असते तसेच 'मी' च्या कुटुंबीय मंडळींनीदेखील घडविलेले असते. त्या दृष्टीने एसेम यांच्या चरित्रात त्यांच्या कुटुंबियांच्या मनाचे साद-पडसाद उमटत नाहीत. ही एक प्रकारची निवडच एसेम ह्यांनी केलेली आहे असे म्हणावे लागते. म्हणजे या 'मी' चा परिपोष एक विशिष्ट दृष्टिकोन डोळ्यापुढे ठेवून त्यांनी केलेला आहे. म्हणजेच या आत्मचरित्राला एक विशिष्ट प्रकारचे रूप देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. चर्चेचा प्रश्न अथवा टीकेचा प्रश्न त्यामुळे इथेच उद्‌भवतो.

अशा प्रकारच्या निवडीचा विचार त्यांच्या डोक्यात असल्यामुळे या निवडीमागील सत्य आणि हेतूंचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते. तसेच अशा निवडीमुळे जी साहित्यकृती तयार होते, तिच्या रूपाविषयी प्रस्थापित निकषावरून चर्चा करण्याचा प्रश्नही उद्‌भवतो. अलिकडे काही प्रस्थापित टीकाकाराकडे निकषहीन समीक्षा करण्याची प्रवृत्ती बळावत चाललेली आहे. एक तर आत्मचरित्राला आत्मचरित्रच म्हटले पाहिजे. त्याला इतिहास म्हणून कसे चालेल? १९८४ सालात निदान दोन तरी लक्षणीय आत्मचरित्रे प्रसिद्ध झालेली आहेत. त्यामध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या आत्मचरित्राचा पहिला खंड आणि विश्राम बेडेकर यांचे 'एक झाड दोन पक्षी'. यशवंतरावांचे आत्मचरित्र तर राजकीय आहे. त्याच्या तुलनेने पाहता 'मी एस. एम.' या आत्मचरित्राचा दर्जा टिकणारा नाही. त्यामध्ये अनेक प्रकारच्या त्रुटी आहेत. अशुद्धे तर फारच आहेत. शिवाय महत्त्वाच्या तारखांमध्येदेखील चुका आहेत. एवढा प्रतिष्ठित म्हणून मानल्या जाणाऱ्या ग्रंथात निदान या गोष्टी तरी टाळावयास हव्या होत्या. एसेम एक तळमळीचे कार्यकर्ते जरूर आहेत. परंतु एक लेखक आणि वाचक म्हणून त्यांचे स्थान काय आहे हे त्यांच्या या आत्मचरित्रावरून सहज शोधता येण्यासारखे आहे ◻

मी- एस. एम.
कॉंटिनेन्टल प्रकाशन,
किंमत : साठ रुपये

---

# अर्वाचीन मराठी

---

प्रादेशिक भाषेचा माध्यम म्हणून मोठ्या प्रमाणावर वापर व्हावा आणि त्यासाठी लागणारे साहित्य उपलब्ध व्हावे म्हणून नागपूरला महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाची स्थापना झाली आहे. त्याच्या विद्यमाने भाषाविज्ञान व व्याकरण या विषयांतर्गत हे पुस्तक प्रसिद्ध झालेले आहे. लिंग्विस्टिक्स किंवा भाषाविज्ञान हे विषय संशोधनात्मक पद्धतीने हाताळण्याचा प्रयत्न मराठीमध्ये तुरळकच आहे. मोरो केशव दामल्यांनी लिहिलेले शास्त्रीय मराठी व्याकरण सर्वंकष असले तरी तेव्हापासून आजवर भाषाविज्ञानाचा जो विकास झाला त्याची बूज राखताना त्यावर संस्करण करणे भागच पडेल. 'अर्वाचीन मराठी' या ग्रंथात विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने पारंपरिक

व्याकरणापासून नव्या भाषा–शास्त्रीय दृष्टी-पर्यंतच्या विचाराच्या दिशा दाखवल्या आहेत. भाषेचे शास्त्र हे एकाचवेळी विज्ञानही आहे, आणि कलाही आहे याची जाणीव करून देण्याचा हा प्रयत्न आहे. पहिल्या प्रकरणात ध्वनी कसा निर्माण होतो याचे म्हणजे शरीराच्या ध्वनियंत्रणेचे कार्य व स्वरूप सांगितले आहे. ध्वनीचे मुख्य प्रकार म्हणजे स्वर आणि व्यंजन यांचा अभ्यास दुसऱ्या प्रकरणात आहे. अशाप्रकारे अनेक ध्वनी निर्माण करता येत असले तरी प्रत्येक भाषा आपल्या महत्त्वाच्या ध्वनींची निवड करत असते. यांना स्वनिम म्हणतात. त्याचा विचार तिसऱ्या व चौथ्या प्रकरणात आहे. पुढे यथावकाश मराठीमधले स्वरस्वनिम, व्यंजनस्वनिम, द्विस्वर आणि पराखंडकीय स्वनिम, यांचा अभ्यास आहे. दुसऱ्या विभागात पदरचना, समास, शब्दांचे विकार, क्रियापद या एका विकारांगाचा तपशिलवार विचार आहे. तिसऱ्या विभागात वाक्यविन्यास, वाक्यरचनांचे प्रकार, सुसंवाद, घटकनिश्चिती, रचनान्तरण सूत्रे व चौथ्या विभागात अर्थविन्यास हे विषय हाताळले आहेत. प्रत्येक प्रकरणाच्या अखेरीस स्वाध्याय आहेत व परिभाषिक शब्दांची सूची अखेरीस जोडलेली आहे फारफार वर्षांपूर्वी मी भाषाशास्त्र शिकले (!!) तेव्हा मराठीत एकही शास्त्रीय पुस्तक उपलब्ध नव्हते. कालेलकरांचे भाषाविज्ञानविषयक विचार महत्त्वाचे होते, यात दुमतच नाही; पण भाषाशास्त्राची प्राथमिक चौकट विद्यार्थ्याला माहीत असणे त्यांनी गृहीत धरले होते. त्यामुळे त्यासाठी इंग्रजी पुस्तकांचाच आधार घ्यावा लागायचा व दमछाक व्हायची. त्यादृष्टीने क्रमिक पुस्तकवजा लेखनाचा हा प्रयत्न स्तुत्य आहे. पारिभाषिक शब्द मात्र आजही कितपत वापरले जातात याची शंका वाटते. इथून पुढल्या अभ्यासकांना आग्रहपूर्वक ते रूळवावे लागतील. ◻

अर्वाचीन मराठी
लेखक : प्रा. रमेश धोंडगे
महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ
नागपूर
यासाठी कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पृष्ठे २२९, मूल्य ३० रु.

## दलित कविता : एक दर्शन

१९६० पासून १९८३ पर्यंत दलित कवितेत शब्दरूप घेतलेल्या वृत्ती, प्रवृत्ती, स्थित्यंतरे यांचा आलेख काढण्याच्या दृष्टीने हे पुस्तक लिहिले गेले आहे. अर्थात हा संपूर्ण इतिहास नाही. त्यामुळे सर्व दलित कविता संग्रहांची जंत्री किंवा दलित कवींची हजेरी यात नाही. पण केशवसुतांनंतर ठळकपणे विद्रोहाचा सूर ज्यांनी उमटवला त्यांची दखल सविस्तरपणे घेतलेली आहे. डॉ. भालचंद्र फडके यांनी चिकित्सक प्रस्तावना लिहून दलित कवितेच्या अभ्यासाचे स्वरूप आणि दिशा दाखवून दिलेली आहे. दलित कवितेतील दलित म्हणजे कोण, त्यांचे दुःख कोणते, परिवर्तनाचे तत्त्वज्ञान कोणते, त्यासाठी आंबेडकर, बुद्ध व फुले यांच्या विचाराची बांधिलकी त्यांना कशी वाटते, तिचा आक्रोश आणि आविष्कार कसा आहे याविषयी डॉ. फडके यांनी अगदी मूलभूत विचार मांडले असल्यामुळे प्रस्तावनेनंतरचे पुस्तक हा प्रस्तावनेचा कल्पनाविस्तारच वाटतो. पहिल्या प्रकरणामध्ये दलित कवितेमधले वेगवेगळे ठळक प्रवाह भरपूर अवतरणांसह दाखवले आहेत. धर्म–परंपरा–दैववाद यांच्यापोटी दलितांची झालेली कुचंबणा या सर्वाविरुद्ध मनात दाटलेलो चीड, विद्रोह व त्याची प्रकृती, तिच्यात बंडखोरी किती व साहित्यिक मूल्ये किती, दलित कवितेची क्रांतिसन्मुखता, जळजळीत भाषा, त्यांच्यापुढे असणारी स्वप्ने, ती व्यक्त करणाऱ्या काही लाडक्या प्रतिमा अशा अनेक अंगांनी दया पवार, वामन निंबाळकर, त्र्यंबक सपकाळे, नामदेव ढसाळ, दत्ता भगत, शंकरराव खरात केशव मेश्राम, प्रल्हाद चेंदवणकर, विलास राशिनकर इत्यादींच्या कवितांचे संदर्भ तपासले आहेत, व एकूणच दलित कविता हे समीक्षकांपुढे कसे आव्हान आहे हे मांडले आहे. नारायण सुर्वेविषयी एक स्वतंत्र प्रकरण आहे. त्यांच्या कवितेचा कणखरपणा, जीवन जगण्याची जिद्द, संवादमयता, माणसातलं माणूसपण जपण्याची तळमळ, प्रामाणिकपणा, आशावाद दाखवून देतानाच केशवसुतानतर नव्या जगाचं स्पष्ट चित्रण खऱ्या अर्थानं सुर्वेच करततात. म्हणून ते कष्टकरी समाजाच्या जाणिवांचे पहिले उद्गाते ठरतात हेही साधार सिद्ध केलेलं आहे. मध्यमवर्गाच्या हतबलतेचं चित्रण करणारे मर्ढेकर जसे युगप्रवर्तक तसेच सुर्वेही नवे युग कवितेच्या दारी आणतात. ‘गोलपिठा’कार ढसाळ, ‘कोंडवाडा’कार पवार, अर्जुन डांगळे (छावणी हलते आहे), प्रल्हाद चेंदवणकर (ऑडिट), यशवंत मनोहर (उत्थान गुंफा) यासारख्यांनी सामाजिक विचारांची धारा आपापल्या बाजूने कशी मांडली याची नोंद दुसऱ्या प्रकरणात आहे. विद्रोही कविता (संपादक केशव मेश्राम) व क्रांतिधारा (अभिनव साहित्य मंडळ, उस्मानाबादद्वारा प्रकाशित) यासारख्या एकत्रित स्वरूपात आलेल्या विविध कवींच्या कवितांचा परिणाम कसा होतो हे पुढे तपासले आहे. निष्कर्ष काढताना दलित कवितेने मराठी कवितेचे अनुभवक्षेत्र कसे विस्तारले यावर भर दिला आहे. पारंपारिक कवितेचं मूल्यमापन करण्याची दृष्टी इथे वापरून चालणार नाही. उलट मराठी कवितेवर आलेला साचलेपणाचा तवंग या कवितेनं खरडून काढला, मराठी भाषा समृद्ध केली, नुसताच संताप–नकार–आक्रोश नव्हे तर मूल्यगर्भ आशय मांडून नव्या सामाजिक जाणिवा जोरकसपणे प्रकट केल्या व महाराष्ट्र सारस्वतात जुन्या दुःखांना नवा आविष्कार दिला असे श्रेय अखेरीस दिलेले आहे. दलित कवितेचा नव्यानं विचार करायला लावण्याची क्षमता या पुस्तकात आहे.

– मंगला गोडबोले

दलित कविता : एक दर्शन
डॉ. सौ ललिता कुंभोजकर
प्रतिमा प्रकाशन पुणे
पृष्ठे १३३ किंमत ३५ रुपये

# ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

लीला पाटील

## Peter is dead, The lab works

एक वर्षाचे दिवस किती ? तीनशे पासष्ट–तीनशे पासष्ट दिवसांपैकी किती दिवस शाळा चालतात ? फारशा तपशिलात विचार न करता उत्तर दिले जाते–वर्षभर; पण बारकाव्यात शिरले की लक्षात येते शाळा वर्षभर कधीच चालत नाहीत. शाळा चालतात अंदाजे दोनशे पंधरा–वीस दिवस.

याशिवाय शालेय परीक्षा व चाचण्या घेण्यात दहा–बारा दिवस जातात. क्रीडास्पर्धा, ड्रॉईंग परीक्षा, शालांत परीक्षा यासारख्या कारणांमुळे शालेय व्यवहार बराच थंडावतो व त्यामुळे त्या दिवसात शाळा उघडी असली, घंटा होत असल्या तरी अध्ययन–अध्यापन प्रक्रिया फारशी घडत नाही. हे सारे तपशील शोधायचे कारण असे की, लहान–सहान कारण घडले तरी किंवा या ना त्या निमित्ताने शाळा–कॉलेज बंद करायची एक प्रथाच रूढ होऊ पहात आहे. जन्म–मरणाचे चक्र नित्य चालू असणारच. संस्थाचालक, संस्थेशी संबंधित शिक्षक, लिपीक, कर्मचारी, गावातील प्रतिष्ठित, संस्थेचे देणगीदार असे कोणी ना कोणी मृत्युवश होत असते. अशा प्रत्यक प्रसंगी शिक्षण व्यवहार बहुधा बंद ठेवला जातो. कित्येकदा तर अशा मृत्यूची बातमी समजली की विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक, लिपीक व कर्मचारी समजतात की आज सुट्टी असणार, त्यांच्यापैकी कित्येक जण शाळेत न येण्याचा निर्णय स्वतःच करतात. शालेय व्यवहार चालू ठेवायचा म्हटले तरी विद्यार्थी, शिक्षक, लिपिक, शिपाई यांच्या संख्येअभावी कामकाज होऊ शकत नाही. दुसऱ्या दिवशी गैरहजर लोकांना जाब विचारण्याचे धैर्य किंवा तो जाब विचारून कटुता स्वीकारण्याची तयारी फारशा मुख्याध्यापकांजवळ असत नाही. त्यातून एखाद्या मुख्याध्यापकाने प्रश्न केलाच तर ‘आम्हाला वाटले की नेहमीप्रमाणे सुट्टी असणार’ असे उत्तर मिळते. एक प्रसंग सांगते. कै. नरहर कुरूंदकर हे एका शाळेच्या मुख्याध्यापकांचे श्रद्धास्थान होते. कुरूंदकर वारल्याची बातमी शिक्षकांनी रेडिओवरून ऐकली. शाळेत मुख्याध्यापक पाऊल ठेवतात तो त्यांच्या लक्षात आले की, सुपरवायझर व शिक्षक यांनी शोकप्रस्तावाची जय्यत तयारी केली आहे. कार्यालयातील त्यांच्या मेजावर शोक–प्रस्ताव ठेवलेला होता. सुपरवायझरनी विचारले, ‘ठराव ठीक आहे; पण कोणी मृत्यू पावले की शाळा बंद करायची प्रथा थांबायला हवी. आज आपण शाळेच्या वेळातील पहिले सत्र कुरूंदकरांसाठी वापरू आणि नंतरच्या वेळात नेहमीचा अभ्यास घेऊ. ठरावात आपण मारे लिहितो की कुरूंदकरांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात पोकळी निर्माण झाली आहे; परंतु विद्यार्थ्यांना कुरूंदकर हे नावही परिचित नसते. तेव्हा आजचा अर्धा दिवस कुरूंदकर समजून सांगण्याचा दिवस.’ मुख्याध्यापकांचे हे वक्तव्य ऐकताच शिक्षकवर्गाचा कुरूंदकरांबद्दलचा निम्मा शोक संपला ! मुख्याध्यापकांचे हे आक्रित शिक्षकांना फारसे पसंत पडले नाही. विद्यार्थ्यांना मात्र कुरूंदकर व त्यांचे काम याविषयी बरीच माहिती मिळाली. नुकतेच घडलेले आणखीही दोन प्रसंग पाहू. भारताच्या लाडक्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची निर्घृण व अमानुष हत्या नुकतीच घडली. महाविद्यालयांची दिवाळीची सुट्टी त्यावेळी सुरू असल्याने आदेशानुसार फक्त कार्यालये बंद राहिली. १९ नोव्हेंबर हा कॉलेजच्या दुसऱ्या सत्राचा पहिला दिवस होता. ११ दिवसांचा शोककाळ संपलेला होता; परंतू अनेक महाविद्यालयांनी त्या दिवशी शोक–प्रस्ताव मांडून सुट्टीही घेतली. महाराष्ट्राचे खंदे नेते श्री. यशवंतरावजी चव्हाण यांचे नुकतेच निधन झाले. निधनाची वार्ता रेडिओवरून सकाळीच सगळ्यांना समजली. विद्यार्थी, प्राध्यापक, लिपिक, कर्मचारी यांच्यापैकी काहीजण नेहमीप्रमाणे संस्थेत आले; परंतु शासनाने सुट्टी जाहीर केली असता शोक–प्रस्ताव कसा मांडायचा ? म्हणून त्या दिवशी ती महाविद्यालये बंदच राहिली. दुसरे दिवशी सर्वांच्या उपस्थितीत शोक–प्रस्ताव मांडला आणि मग अशा प्रस्तावाची सभा झाल्यावर कामकाज करणे कसेसेच वाटते म्हणून दुसरे दिवशीही ती महाविद्यालये बंदच राहिली !




‘जीवनासाठी व्यक्तिला तयार करणे’ हे शिक्षणाचे एक ध्येय मानले जाते. मृत्यू हा जीवनाचाच एक भाग नाही का ? मृत्युचा विचार इतका अशुभ का मानायचा ? मृत्युलाही सामाजिक परिमाण असू शकते हे विद्यार्थ्यांपर्यंत का पोचवायचे नाही ? मृत

पावलेल्या व्यक्तीचे सुस्थितीत असलेले अनेक अवयव इतरांना सक्षम बनविण्यासाठी उपयोगी पडू शकतात हा विचार शिक्षणातून का नाही पोचवायचा ? माझ्या ओळखीच्या एका तरुणाच्या डोळ्यात शेतातील सड जाऊन तो निकामी झाला. तो तरुण विव्हल स्वरात मला म्हणाला होता ' मॅडम माझ्या मृत्युनंतर माझे डोळे अंधांना दृष्टी मिळण्यासाठी वापरले जावेत असे मी लिहून ठेवले होते, संबंधितांना तसे सांगितले होते. आता माझा एकच डोळा उपयोगी येणार. ' त्याच्या स्वरातली कातरता त्याच्या भावनेची साक्ष पटवीत होती. मृत्यू हा अटळ आहे आणि म्हणून जगत असता आपले जगणे अधिकाधिक कृतार्थ करण्याचा प्रयत्न करायला हवा, आपल्या आयुष्यात इतरांना अधिकाधिक सामील करून घ्यावयास हवे असा विवेक येण्यासाठी मृत्युचा शैक्षणिक उपयोग नाही का होऊ शकणार ? Life in all its manifestations is the subject matter of education, असे अमेरिकन शिक्षणतज्ज्ञ जॉन ड्युईने म्हटले आहे. नाण्याला जशा दोन बाजू असतात तशी मृत्यू ही जीवनाचीच दुसरी बाजू आहे. जीवन सानंद स्वीकारताना मृत्युही सानंद स्वीकारता आला पाहिजे.

अमेरिकेतील एका महाविद्यालयातील एक प्रयोगशाळा सहाय्यक मरण पावला. दुसरा एक सहाय्यक महाविद्यालयात आल्यावर त्याला ती वार्ता समजली. त्याने आपले सामान आवरले आणि तो प्रयोगशाळेच्या बाहेर पडू लागला. 'कोठे चाललास तू ?' प्रयोगशाळा प्रमुखांनी त्याला प्रश्न केला. तो म्हणाला, ' Peter is dead. ' प्रमुखांनी तत्काळ पुस्ती जोडली. ' Peter is dead; the lab works. ' प्रमुखांच्या उत्तरात but हा सुद्धा शब्द नाही. पीटरचा मृत्यू आणि प्रयोगशाळेतील नित्य कामकाज यांचा अनुबंध जोडायला जणु ते तयार नाहीत. प्रयोगशाळेत काम करता करता दिवसभर कितीदा तरी पिटरची आठवण येणारच. 'पीटरसारखा तत्पर, चाणाक्ष सहाय्यक असला की, काम कसे सुकर होते. ' ' आज पीटरची गजबज नाही. ' पीटर आज चहा प्यायला हाक मारणार नाही. ' अशी वाक्ये त्या दिवशीच नव्हेत तर पुढेही ऐकू येणार असतात. मग पीटरच्या मृत्युनिमित्त प्रयोगशाळा बंद कशासाठी करायची ? पीटरची आठवण काढीत काम करणे बरे. King is dead. Long live the king. या वाक्याचा मतितार्थमुद्धा असाच आहे. राजा निवर्तला तरी राज्य चालूच राहते. राज्ययंत्रणा खिळखिळी होऊ देणे राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने परवडण्यासारखे नसते. कविवर्य तांब्यांनी ' जन पळभर म्हणतील हाय हाय ! मी जाता राहील कार्य काय ?' या काव्य पंक्तित व्यक्तिजीवनापेक्षा जीवनव्यवहार अधिक महत्त्वाचा असेच सुचविले आहे. दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी इंग्लंडमध्ये बॉंबवर्षाव चालू असताही शिक्षणव्यवहार थांबला नव्हता. मरण, युद्ध, लढे, संप, संघर्ष ही सारी जीवनाचीच अंगे असल्याने शिक्षणाचा आशय त्यापासून अलग करणे युक्त नव्हे. म्हणूनच शिक्षणसंस्थांनी आपला व्यवहार बंद करण्याची निमित्ते न शोधता त्या निमित्ताचा उपयोग करून शिक्षण अधिक सकस, अधिक व्यापक, अधिक जीवनस्पर्शी कसे करता येईल. याचाच विचार करायला हवा. म्हणायला हवे. Peter is dead. The lab works. □



शोभा भागवत

# मुलं आणि श्रम

मे महिना. शाळेला सुट्टी. अभ्यासाला सुट्टी. त्यामुळे साहजिकच मुलांची आनंदाची कल्पना म्हणजे उशीरा उठणे, दिवसभर खेळणे, पत्ते, कॅरम, ल्यूडो, पट, व्यापार किंवा काहीही वाचणे, खाणे. नाटक बघणे. चांगले सिनेमे पाहणे. संध्याकाळी फिरायला जाणे. एखाद्या छंदवर्गाला जाणे.

पुण्यात मुलांसाठी चांगलं काम करणारी अनेक लोकं आहेत. ती सुटीत शिबिरं घेतात. मुंबईच्या पालकांना तर पुण्याच्या मुलांचा फारच हेवा वाटतो. मुलंही हौसेनं शिबिरांना येतात.

शिबिरांमध्ये काही श्रमसंस्कार होतात. काही नव्या गोष्टी शिकायला मिळतात. एकत्र राहण्याचा अनुभव आणि आनंद मिळतो. आठ दहा दिवस मजेत जातात.

एक आजोबा सांगत होते. माझ्या नाती सुट्टीसाठी माझ्याकडे आल्यात. मी त्यांना म्हटलं. आंघोळ गार पाण्यानी करायची. स्वतःचे कपडे स्वतः धुवायचे. घरातली कामं आळीपाळीनी करायची. खेळायचं पण भरपूर. संध्याकाळी फिरायला जायचं. सकाळी पोहायला जायचं आणि मुली खुष आहेत. सगळं स्वतः करतात.

त्या मुलींच्यावर आजोबा करत असलेले श्रमसंस्कार फार महत्त्वाचे आहेत. घरातली कामं करायला शिकणे, नियमितपणे ती करणं याला फार मोठा अर्थ आहे. बिचारी पोरं वर्षभर अभ्यासात बुडली की त्यांना मान वर करायला सवड नसते. सुट्टीत बिचाऱ्यांना कशाला काम ? करू देत आराम, खेळू देत. असं आपल्याला पालकांना वाटत असतं. पण डोळसपणे मुलांच्या सुट्टीतल्या दिनक्रमाकडे पाहिलं की मुलं खरेच योग्य प्रकारे जगतायत का ? असा प्रश्न पडतो. सुटी म्हणजे सगळी बेबंदशाही ! हौस, मौज, चैन आराम ? की नवं काही चांगलं शिकायची संधी ? सहजपणे ?

एरवीच्या शाळेच्या गडबडीत ज्या गोष्टी करायला जमत नाही, त्यांची सवय लावून घेण्याची संधी सुट्टीत असते

कामांची एक गंमत असते. रोज आपण आपले दोन कपडे धुवायला लागलो अंघोळीनंतर की एखाद्या दिवशी दहा धुवावे लागले तरी त्याचा फारसा ताण पडत नाही. श्रम होत नाही. चडफड होत नाही. संस्कार हा असा असतो. तो खोलवर जाऊन घट्ट पकडून बसतो. त्यामुळेच त्याला बळ असतं.

मोलकरणी मिळणं न मिळणं, त्यांनी वेळेवर येणं न येणं, समय साधून दांडी मारणं या सगळ्या प्रकारांचा आपल्याला ताण होतो. आपला संताप होतो, पण याला उपाय काय ? स्वतःची ताकद वाढवली,

ह्या श्रमाची मनात तयारी ठेवली तर मोलकरीण आली नाही तरी शांतपणे कामे उरकता येतात. संताप होत नाही. गैरसोय होते ती वेळ गेल्यामुळे होते. कष्ट पडल्यामुळे नाही.

मुलांनाही या कष्टांची सवय लावायला हवी. ते बळ यायला हवं असेल तर रोज नियमितपणे काही कामे करायची सवय लावली पाहिजे.

काम करणे म्हणजे मुलांना आणि पालकांनाही कमीपणाचं वाटतं.

'आमचा जन्म घरातल्या कामासाठी नाही' अशी मुलग्यांची आणि अलिकडे मुलींचीही समजूत वाढते आहे. शरीर—श्रम कमी व्हावेत म्हणून नवी नवी यंत्रं येताहेत. श्रम करण्यात आनंद आहे. दुःख नाही हे आपल्या लक्षातच येत नाही.

श्रमाबद्दल विनोबाजींनी एका ठिकाणी फार चांगल लिहिलंय. ते म्हणतात 'व्यायामाचे शास्त्र' ही कल्पना या लोकांनी हिंसक बनवून ठेवले आहे. तीन मिनिटात एकदम व्यायाम झाला पाहिजे. थोड्या वेळात एकदम व्यायाम करण्याची जी पद्धत आहे तीमुळे स्नायू बनतात. मज्जातंतू (नर्व्हज्) बनत नाहीत. आणि अमरवेल जशी झाडाला खाऊन टाकते, तसेच स्नायू आरोग्याला खाऊन टाकतात. नसा आरोग्याला वाढवतात. हळूहळू आणि दररोज जो व्यायाय मिळतो त्यामुळे मज्जातंतू बनतात आणि पचनेन्द्रिये मजबूत होतात...'

'शरीरवृद्धीबरोबरच मनोवृद्धी होते. मुलांचा मानसिक विकास करायचा असेल' त्यांना शिक्षण द्यायचे असेल तर शारीरिक श्रम करवून घेऊन त्यांची भूक जागृत केली पाहिजे...'

भूक जागृत करण्याबद्दल एका शिबिरात अनुभव आला होता. मुलं सगळी सुखवस्तु घरातली. एक दिवस रात्रीच्या जेवणाला भाकऱ्या केल्या. कुणी फारशा खाल्ल्या नाहीत. भाकऱ्या उरल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी मुलांना पर्वतीला नेलं. पळत पळत पर्वती चढायची, तसंच उतरून यायचं आणि आल्यावर सारस बागेत जमायचं असं ठरलं होतं. सगळी मुलं सारसबागेत जमली. कालच्या भाकऱ्यांचा फोडणीचा चिवडा केला होता. मुलांनी तो आवडीनं फस्त केला. काय छान लागतोय् म्हणत होती.

घरातही एरवी जेव्हा 'खारे बाबा, नको ग बाई' चालतं तेव्हा मुलाला खरी भूक लागलीय का, तेवढे श्रम तो करतोय् का हे पाहणं महत्त्वाचं आहे.

आज सुखवस्तू घरांमध्ये मुलांना 'श्रम' नाहीतच. कष्ट नाहीतच. खेळाच्या, व्यायामाच्या निमित्तानं होईल तेवढीच हालचाल. नाहीतर सारं आयतं तयार मिळणं हा त्यांचा हक्कच बनतो !

घराची साफसफाई, कपडे धुणं, भांडी घासणं, केर काढणं, जमीन पुसणं, खरेदी करणं, स्वैपाक करणं, दुरुस्त्या करणं, सुतारकाम करून एखादी वस्तू तयार करणं हे तर घरच्या घरी करता येईलच. त्याशिवाय सुट्टीत आपल्या ओळखीच्या, मैत्रीतल्या कुणाकडे काहीजाऊन मदत करणं, एखाद्या छोट्या ऑफिसमध्ये, दुकानात आवडीचं काम करणं हेही करता येईल.

मज्जातंतू तयार होणं हे माणूस शहाणा होण्याच्या दृष्टीनी फारच गरजेचं आहे. श्रम माणसाला काटक, चिवट बनवतात, शरीर तयार करतातच पण मनालाही धीर धरायला शिकवतात, बळ देतात, कल्पकतेला आवाहन करतात, शांतपणा शिकवतात, पैशांची किंमत समजावून देतात, दुसऱ्या श्रमणाऱ्याचा विचार करायला शिकवतात. हे सगळं आज आपल्या मुलांना समजतं आहे का ? त्यांचे मज्जातंतू तयार होण्याचं काम घडतं आहे का ? की निव्वळ स्नायूच बनतायत ? आनंदासाठीच केलेले श्रम हा आज मुलांच्या दिनक्रमाचा भाग आहे का ? □

## रंगभूमी

# वाडा चिरेबंदी

## अभिरूचीसंपन्न आणि परिपक्व प्रयोगनिर्मिती

वि. भा. देशपांडे

'वाडा चिरेबंदी' हे महेश एलकुंचवार यांचे नवे नाटक. महेश हा प्रायोगिक नाटककार म्हणून गेली काही वर्षे आपल्याला परिचित आहे. विशेषतः 'होळी', 'रक्तपुष्प' सारख्या आशयघन एकांकिका आणि 'गार्बो', 'पार्टी' सारखी नाटके अनेकांच्या स्मरणात आहेत. पण गेल्या कित्येक वर्षांत त्याने नवे नाटक लिहिलेले नाही, निदान प्रयोगरूपाने समोर आलेले नाही.

नाट्यलेखनाच्या दीर्घ विश्रांतीनंतर महेशचे आलेले नाटक त्याच्या नेहमीच्या वळणापेक्षा वेगळे आहे, हे प्रथम दर्शनीच जाणवते. ज्यांनी त्याची प्रायोगिक रंगभूमीवरची नाटके पाहिली असतील त्यांना त्यातली गूढता, अनाकलनीयता निश्चितच जाणवली असेल. पण या नव्या नाटकाचा बाज तसा नाही. प्रायोगिक रंगभूमीच्या प्रवासापासून काही पावले पुढे आलेला आणि व्यावसायिक रंगभूमीला सामोरा जाणारा, बहुसंख्य प्रेक्षकांना आकलनाच्या स्तरावर नेणारा असा हा नाट्यबाज आहे. असे असूनही आपले लेखनसत्त्व सोडणारा नाही. ते अशा अर्थाने की, यापूर्वीच्या लेखनात जी माणसांच्या नातेसंबंधांची, मनोदर्शनाची, शोधनाची दिशा होती तीच याही नव्या नाटकात आहे.

'वाडा चिरेबंदी' मध्ये माणसांच्या नातेसंबंधांची उकल करण्याचा प्रयत्न एका अविभक्त कुटुंबाच्या संदर्भातला आहे.

वऱ्हाडातील एका छोटया गावच्या घरणगावकर देशपांडे याच्या कुटुंबाची ही कथा आहे. चार पिढयातील माणसे या ठिकाणी आहेत. ज्येष्ठ अशी दादी आजी आहे. वयपरत्वे तिचे शरीर फक्त श्वास घेते आहे. श्रवण आणि दृष्टी दोन्ही सवेदना बधीर आहेत. घरात असेल त्या ठिकाणी अंग टाकते आहे तिला एकाच व्यक्तीच्या सदर्भातली जाण आहे. ती म्हणजे आपल्या मुलाची व्यकटेशाची. तो आता गेलेला आहे। पण तिला त्याचे ज्ञान नाही. त्यामुळे ती सतत 'व्यंकटेशा-व्यंकटेशा' असा मुलाच्या नावाचा आर्त जप करीत असते. तिच्या हाकेतील आर्तता भव्य वाड्यात नि:शब्द वातावरणात, भयाण काळोखात अधिकच गडद वाटते. गेलेल्या माणसाचे अस्तित्व टिकवणारी वाटते. म्हणूनच ते शब्द अर्थपूर्णही वाटतात दुसऱ्या पिढीतली व्यक्तिरेखा आहे आईची. नवरा नुकताच गेल्याने आलेले विधवापण घेऊन अतिशय सहनशीलतेने ते सारे ती सोशीत आहे. गतकाळ आणि भविष्काळ याचे विचित्र मिश्रण तिच्या अस्तित्वात आहे. गतकाळात भोगलेले वैभव आणि पती गेल्यानतर भविष्यात मुलाच्या राज्यात आपले काय होईल याची काळजी अशा अवस्थेत ती आक्रदत नाही, आक्रस्ताळी होत नाही, तर संयमाने, शातपणे आतल्या आत दु:ख गिळून वर्तमान स्वीकारीत आहे तिसऱ्या पिढीत मुले आणि सुना आहेत. भास्कर, सुधीर आणि चदू ही तीन मुले. पहिल्या दोघाची लग्ने झालेली भास्कर थोरला, तोच घरादाराचे, शेतीचे व्यवहार पाहतो. मधला सुधीर लग्न करून मुबईला बिऱ्हाड करून आहे. काही खास कारणाने तो इकडे गावी येतो. मुबईत येऊनही त्याला गावाची, वाड्याची ओढ आतून आहे तिसरा चदू फारसा न शिकलेला, लग्न न झालेला आणि घरातल्या साऱ्या कामासाठीच जन्म घेतलेला या तीन भावांना एक बहीण आहे, प्रभा नावाची दिसायला बेताची, खूप शिकावं, लग्न करावे अशी इच्छा असणारी, पण वय वाढतच राहिले आणि ठरवल्यापैकी काहीच घडले नाही त्या सगळ्याचा दीर्घ सताप मनी घेऊन तो सतत व्यक्त करणारी अशी ती आहे. चौथ्या पिढीत रंजू आणि पराग ही किशोर वयातली भास्करची मुले. वयाच्या किशोर--पौगडावस्थेत जसे चित्रपटाच्या नकली दुनियेचे वेड असते तसे रजूला आहे. ती त्याच नादात वावरते आणि चित्रपटाच्या ओढीने शिकवणीच्या मास्तरबरोबर चार दिवस पळूनही जाते परागला घराचे, गावाचे आलेले नैराश्य आणि नको त्या वयात वाईट सगत लागून दारू पिण्याची चटक लागते. सुधीरच्या मुलाचा अनेकदा उल्लेख आहे पण तो प्रत्यक्ष रंगमचावर नाही.

## दिग्दर्शन–अभिनय

अशी ही चार पिढ्यातील माणसे चिरेबदी वाड्याशी वर्षानुवर्षे सबधित आहेत. यांच्या घराचा कर्ता पुरुष तात्याजी मरतो आणि या वाड्याचे चिरेबदीपण उध्वस्त व्हायला लागते. महेशचे हे नाटक घटनाप्रधान नाही, चाकोरीतली गोष्ट सागणारे नाही त्यामुळे नेहमीच्या सवयीने ज्याना नाटकात काही घडावेसे वाटते त्याचे प्रमाण अल्प आहे. घटिताचे परिणाम शोधणे, त्यातले ताण कशाने निर्माण झाले याचा शोध घेऊन माणसाची अतरगे तपासून पाहणे ही या नाटकाची दिशा आहे. घरातला कर्ता पुरुष गेल्यावर त्याच्या क्रियाकर्माचा, दिवसवाराचा खर्च कोणी करायचा, असलेल्या इस्टेटीची वाटणी कशी करायची याच्याच विवचनेत माणसे अडकून पडतात. रक्तसंबंधाची नाती असणारी माणसे आतून किती कोरडी, स्वार्थी, तटस्थ कशी होतात ते इथे पाहण्यासारखे आहे हे ताणतणाव वाड्याची शान तर घालवतातच; पण सर्व नातेसबध विस्कटून माणूसपणाचीही माती करतात. तसे कोणाच्याच हाती काही येत नसते ! हे नाटक लिहिताना नाटककाराने दाखवलेली किंवा जाणतेपणाने राखलेली अलिप्तता, तटस्थता अतिशय मोलाची आहे. एका अर्थी अविभक्त कुटुबाच्या पद्धतीवरचे ते सखोल भाष्य आहे. पण ते करण्याचा पवित्रा महेशने घेतलेला नाही किंवा विशिष्ट बाजू घेऊन त्याचे समर्थन अथवा गोडवेही गायले नाहीत लेखनातला हा सयम महत्वाचा ठरतो. नाटकाची गुणवत्ता वाढवतो. (खरे तर या नाटकाच्या संहितेवर स्वतंत्रपणे लिहायला हवे.)

अशा वेगळ्या प्रकारच्या नाट्यलेखनाला प्रयोगरूप देण्यासाठी तशाच नाट्यदृष्टीचा, नाट्यप्रतिभेचा दिग्दर्शक हवा. या नाटकाच्या दिग्दर्शिका विजया मेहता आहेत असे म्हटल्यानंतर अनेक खुलासेही होतील आणि अपेक्षाही निर्माण होतील. नाट्यसहितेची जाणीव ठेवून प्रयोगनिर्मिती करणारी जी काही दुर्मिळ दिग्दर्शकाची नावे आपल्याकडे आहेत त्यामध्ये विजयाबाई अग्रेसर आहेत. नाट्यगत व्यक्तिरेखासाठी कलाकाराची यथायोग्यपणे केलेली निवड, त्यांच्या रगभूषेचा, वेशभूषेचा केलेला तपशीलवार विचार, पात्राच्या रंगमचीय हालचाली आणि केलेल्या विरचना, शब्दसवादाच्या लकबी इत्यादीमधून जो नाट्यप्रयोगबंध निर्माण होतो तो आपल्याला खिळवून ठेवणारा असतो. विजयाबाईंच्या दिग्दर्शन गुणवत्तेबद्दल नव्याने लिहिण्याचे कारण नाही. प्रायोगिक आणि अलिकडे व्यावसायिक रंगभूमीवर त्याच्या उत्तम दिग्दर्शनाचे नमुने आपल्या डोळ्यासमोर आहेत. योगायोग म्हणजे महेशची पहिल्या लेखन वाटचालीतली 'होळी' ही आशयसंपन्न एकांकिका विजयाबाईंनीच प्रायोगिक रंगमचावर आणून सर्वांपर्यंत पोहोचवली होती. आता महेशचे व्यावसायिक नाटकही त्याच करीत आहेत. 'एक परिपक्व दिग्दर्शन आणि प्रयोगदर्शन' असे या नाटकाच्या संदर्भात आनदाने म्हणता येईल. दिग्दर्शनात त्याना साह्यकर्ती आहे प्रतिभा कुलकर्णी.

विजयाबाईंच्या दिग्दर्शनाइतकीच आनददायी गोष्ट म्हणजे त्याचा अभिनय. त्यानी या नाटकात आईची केलेली भूमिका दीर्घस्मरणीय आहे. मित शब्दात व्यक्त झालेली ही भूमिका त्यानी आपल्या भावदर्शी चेहऱ्याने सजीव केली. त्याचा मुद्राभाव अनेक शब्दाचे काम करीत होता त्याचे सथ चालणे, पाहणे आणि निश्चयीपणाने निर्णय घेणे त्या घरातल्या वातावरणाला अर्थ प्राप्त करून देत होते. अच्युत पोतदारने भास्करची म्हणजे थोरल्या मुलाची भूमिका केली होती. त्याची देहयष्टी भूमिकेला यथायोग्य तर होतीच पण त्याने केलेला आवाजाचा सयत वापर अधिक परिणाम साधणारा होता. त्यातून घरातले कर्तेपण, नव्याने आलेली जबाबदारी, त्यातला स्वार्थ इत्यादी अनेक गोष्टी व्यक्त झाल्या. उदय म्हैसकरची सुधीर ही भूमिका त्याने उत्तमपणाने व्यक्त केली. मुंबईतल्या राहणीत येणाऱ्या अडचणी सोसून तिचा केलेला स्वीकार आणि त्याच वेळी आपला वाडा, माणसे याची असलेली भावनिक ओढ, त्याला छेद देणाऱ्या व्यावहारिक गोष्टी याचे ताण त्याने प्रभावीपणाने व्यक्त केले. हयवदनमध्ये त्याने आपल्या अभिनयाचे गुण व्यक्त केले होतेच. हे नाटक पाहात असताना असे जाणवले की, त्याला पुढच्या नव्या नाटकात याहीपेक्षा मोठी भूमिका मिळायला हवी. कारण त्याची नाट्यसमज आणि आविष्कारपद्धती अधिक गुणवत्तेची आहे अशीच लक्षवेधी गुणवत्ता असलेल्या कलावती या नाटकात एकत्रित

आलेल्या दिसतात. त्या म्हणजे सुपर्णा सावरकर, गिरीजा काटदरे, स्वरूप खोपकर आणि अरुणा जोगळेकर. सुपर्णाला वडिलांकडून ( जयंत सावरकर ) आणि आईच्या वडिलांकडून ( मामा पेंडसे ) असा दुहेरी अभिनयाचा वारसा लाभलेला आहे. किशोर वय संपता संपता ज्या स्वप्नील जगाची विशेषतः चित्रपटविश्वाची ओढ अनेकांना असते ते 'गोड वेडसरपण' तिने इतक्या तपशिलात सहजतेने व्यक्त केले की अनेकदा गाण्याच्या बैठकीतली दाद दिली गेली. गिरीजालाही अभिनयाचा वारसा आपल्या आईवडिलांकडून (भालचंद्र आणि मालती पेंढारकर) लाभला. तिने उभी केलेली वहिनी भारदस्त वाटली. तिचे उभे राहणे, नऊवारीतले दिसणे, मुद्राभाव आणि विशेषतः तिने वापरलेला स्वर इत्यादी गोष्टी नाटकाचा परिणाम अधिक जिवंत करायला मदत करीत होत्या. स्वरूप खोपकर 'ही श्रीची इच्छा' नाटक वगळता हौशी-प्रायोगिक रंगमंचावरची सराईत कलावती आहे. आता ती नाट्यव्यवसायात खऱ्या अर्थाने आली. तिच्या चेहऱ्याचा गोडवा, बोलकेपणा, अभिनयातली सहजता आणि भूमिकेची समज इ. अंजलीच्या म्हणजे धाकट्या सुनेच्या भूमिकेत परिणामकारकपणाने व्यक्त झाली. अरुणा जोगळेकरने उभी केलेली प्रभा चांगली होती. प्रमोद पवारने चंदूच्या भूमिकेतील अनेक बारकावे उत्तमपणाने व्यक्त केले. घरातल्या कामाचे ओझे मुकाट्याने वाहणारा, सोशिक आणि सर्वांना हवा असणारा चंदू त्याने उभा केला. दादी झालेली सुलभा कोरान्ने आणि परांगची भूमिका करणारा शिरीष जोशी दोघेही छोट्या भूमिकांत यथायोग्य होते रघुवीर तळाशीकरचे नेपथ्य आणि दिलीप कोल्हटकरची प्रकाशयोजना चिरेबंदी वाड्याची वास्तू यथार्थपणे आपल्या डोळ्यासमोर उभी करीत होते. हे दोघेहीजण कल्पक आहे याचा प्रत्यय येत होता.

महेशचे नाटक व्यवसायासाठी घेण्याचे धाडस कलावैभवने ( मोहन तोडवळकर ) केले ही आनंदाची गोष्ट आहे. हे धाडस 'अर्थदायी' किती होईल याचे मी भविष्य सांगत नाही; पण 'अर्थपूर्ण' झाले आहे एवढे मात्र निश्चित. अशी नाटकेच रंगभूमीची अभिरुची निर्माण करतात, दिशा देतात म्हणून यांचे महत्त्व. आपण आवर्जून पाहण्याचे प्रयोजनही तेच ! □

# स्वरमुक्त मी

नवीन संगीत नाटकाची निर्मिती थंडावली असे विधान आम्ही करीत असताना एका नवीन संगीत नाटकाने लक्ष वेधून घेतले. श्री. मा. रा. गाडगीळ लिखित 'स्वरमुक्त मी' या संगीत नाटकाचा प्रयोग भरत नाट्य मंदिरात रविवारी २८ एप्रिलला दुपारी ४ वाजता पहाण्याचा योग आला. प्रयोग खुद्द भरत नाट्य मंदिरानेच सादर केलेला असल्यामुळे तो त्याच्या आतापर्यंतच्या गौरवशाली परंपरेस साजेसा असाच झाला. उत्कृष्ट नेपथ्य, भव्य सेटस्, मनोहारी प्रकाश योजना या सर्व तंत्रांचा उत्कृष्ट मिलाफ झाल्यामुळे एक नेटका प्रयोग पाहिल्याचे समाधानात आणि अभिजात शास्त्रोक्त संगीतात आकंठ न्हाऊन नाट्यरसिक घरी गेले.

एका संगीत तपस्व्याच्या जीवनावरील ही नाट्यकथा अत्यंत सुसूत्र बांधणीमुळे लक्ष्यवेधी झाली आहे. घटनांची व पात्रांची भाउगर्दी नसल्यामुळे ती सुटसुटीत झाली आहे. त्यामुळे त्यातील संदर्भ जोडताना प्रेक्षकांना प्रयास पडत नाहीत. नाट्यकथेत हिंदी सिनेमाप्रमाणे योगायोग आहेत; पण ते अतर्क्य, अवास्तव नाहीत. दोन शिष्यांच्या प्रेमसंबंधामुळे निर्माण झालेली गुंतागुंत काहीशा योगायोगानेच सुटते. गुरुजींपुढे वाहिलेली शपथ व त्यांची प्रतिष्ठा जपण्याचे उद्देशाने त्यांची शिष्या गुणवती आपल्या उदात्त प्रेमाचा त्याग करते. प्रसिद्धी व वेगळे क्षेत्र मिळण्याचे उद्देशाने संगीत नाट्यक्षेत्रातील केलेला प्रवेश आयुष्यात वेगळ्याच समस्या निर्माण करतो प्रसिद्धी तर बाजूलाच राहिली; पण शीलरक्षणाचाच प्रश्न उपस्थित होतो. केवळ व्यवसाय म्हणून नाट्यक्षेत्रात वावरणाऱ्या तथाकथित ठेकेदाराचे पितळ लेखकाने प्रभावीपणे उघड केले आहे

नाट्यसंगीतातील क्लिष्टतेतून सुगमतेकडे जाण्याचा प्रयत्न मो. ग. रांगणेकरांच्या 'कुलवधू'पासून मा कृष्णरावांनी सुरू केला. ही परंपरा पं. राम मराठे, जितेंद्र अभिषेकी इत्यादी संगीतकारांनी मदारमाला, सुवर्णतुला, कट्यार काळजात घुसली इ. नाटकाद्वारे चालू ठेवली रंजकतेत व माधुर्यात अजिबात कमीपणा न ठेवता नाट्यपदे सुटसुटीत व कमी वेळ चालणारी असे वैशिष्ट्य अलीकडील नाट्यसंगीताचे बाबतीत सांगता येईल. या नाटकास सौ. जयमाला शिलेदारांचे संगीत होते. गायकाच्या जीवनावर व त्याच्या शिष्यांवरच नाट्यकथा असल्याने संगीतास भरपूर वाव होता. जयमालाबाईंनी याचा पुरेपूर फायदा घेऊन अत्यंत दर्जेदार, अभिजात शास्त्रोक्त संगीताची जणू भरपूर मेजवानीच रसिकास दिली आहे. स्वामीजी— प. पद्माकर कुलकर्णी, विद्याधर — शरद करमरकर आणि गुणवती—सौ सुचेता ठोबरे या तीन गायक कलाकाराद्वारे प्रेक्षकांना हे नाटक एक संगीतिका, OPERA असावे अशा थाटात व विपुल प्रमाणात संगीताची लयलूट करून दिली नाही. कोणत्याही पदात, क्लिष्टता, अनावश्यक तानबाजी आणि कालापव्यय नसल्याने ते कंटाळवाणे होत नाही व ते लवकर संपविण्यासाठी प्रेक्षकांना टाळ्यांचा अवलंब करावा लागत नाही.

हे नाटक संगीतप्रधान असले तरी त्यातील गद्यभागसुद्धा तेवढाच प्रभावी आहे. उगीच तत्त्वज्ञानाचे, उपदेशाचे अवडंबर न माजवता लेखकाने साध्याच पण प्रवाही भाषेत आपले म्हणणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचविले आहे. गद्य व पद्य दोन्ही घटकात समतोल राखल्यामुळे ते दोन्ही घटक कथानकाच्या गतिशीलतेस पोषकच ठरतात. तीन अंकात कथानकाच्या मांडणीचे, समसमान तीन टप्पे लोकांपुढे ठेऊन नाट्यलेखकाने ती कौशल्याने पूर्णत्वास नेली आहे. दिग्दर्शकाला मात्र या नाटकात वाव नाही. तरी पण पात्रांचे रंगभूमीवरील प्रवेश व विंगेत जाणे याबाबत दिग्दर्शक त्रिभुवन यांनी आपल्या अस्तित्वाची चुणूक दाखविली आहे.

नाटकातील सर्वच व्यक्तिरेखा अगदी रेखीव व भारदस्त असून कथानकातील त्यांच्या स्थानाशी सर्वस्वी सुसंगत अशा आहेत. त्यांचे एकमेकांशी नाते हे कथानकाच्या गतिमानतेस पोषक असे आहे. त्यांची वेशभूषा व केशभूषा ही दोन्हीही त्यांची व्यक्तिरेखा सुसंगतीची द्योतक आहेत. वातावरणनिर्मिती हे या नाटकाचे आणखी एक वैशिष्ट्य सांगता येईल. तीनपैकी दोन अंकात श्री शंकराच्या मंदिराचे दृष्य असल्याने प्रथमपासूनच प्रेक्षक भक्तीमय मंगल, प्रसन्न वातावरणात रमतो. भव्य मंदिर, त्यात देवाचे अस्तित्व, समोर स्वामीजींची बैठक, त्यावर त्यांची संगीतसाधना आणि शिष्यांना ज्ञानदान या सर्वच गोष्टी प्रसन्न वातावरणनिर्मितीस सहाय्यक आहेत. सर्वश्री पद्माकर कुलकर्णी व शरद करमरकर यांचे आवाज पहाडी असल्याने ऐकू येण्याचा प्रश्नच नव्हता; पण सुचेता ठोबरेंची पदे व संवाद दोन्हीही ऐकू येत नव्हते. त्यांचा आवाज चांगला आहे; पण तो प्रेक्षकांपर्यंत नीटपणे पोहोचू शकत नाही. त्यामुळे रसहानी होते.

—नीलकंठ वासुदेव देशपांडे

## बालरंगभूमी : पृष्ठ ६ वरून

पूर्ण विचार केल्यानंतर हे व्यावसायीकरण आहे की नाही, हे ठरवाव लागेल.'

'बालरंगभूमीवरही व्यावसायीकरण होतय.' सुधा करमरकर हाच मुद्दा पुढं नेत म्हणाल्या, 'व्यावसायीकरणाच्या कचाट्यातून बालरंगभूमीही सुटलेली नाही. पण हे व्यावसायीकरण नाटकाचे विषय, पुनरुज्जीवन नेपथ्याची रेलचेल यात नसून बालरंगभूमीचं अर्थकारण, थिएटर मिळविण्यासाठीची धडपड यासाठी निर्माण केलेलं रॅकेट आणि या रॅकेटशी करावा लागणारा सामना यात होतय.'

एकेकाळी बालरंगभूमी ही संपूर्णपणे जादूई करामतीत गुरफटलेली होती. या प्रकारच्या नाटकामध्ये चमत्कृतीना भरपूर वाव असल्यानं बालप्रेक्षकाकडून तर ही नाटकं चुटकीसरशी उचलली गेलीच. पण लहान मुलाचा प्रत्येक क्षण न् क्षण नाटकाशी बांधलेला राहात असे. त्यामुळं बालरंगभूमीनं तांत्रिकदृष्ट्या आश्चर्यकारक प्रगती केली. या नाटकातली सफाई, परफेक्शन वाखाणण्याजोगं. भव्य दिव्य डोळे दिपवून टाकणारे सेटस्, भरजरी, उंची वेषभूषा, वेगानं घडणारे आणि खुर्चीला खिळवून टाकणारे चमत्कार... बालबुद्धीला पटकन आकर्षण वाटावं अशीच ही नाटकं. त्यामुळं तांत्रिक प्रगती, सफाई या बाबतीत बालनाटक प्रौढ रंगभूमीच्या अंमळ पुढच गेली आहेत, असही म्हणायला हरकत नाही. पण यापायी बालरंगभूमीच ऐतिहासिक, पौराणिक वैज्ञानिक वगैरे वेगळ्या विषयाकडे मात्र दुर्लक्षच झालं. ऐतिहासिक आणि सामाजिक बालनाटक, तुरळक का होईना पण आलेली दिसतात. पण वैज्ञानिक बालरंगभूमी मात्र उपेक्षितच आहे. या विषयाकडे वळण्याचा 'लिटल थिएटर' किंवा 'बालनाट्य' नं कधी प्रयत्न केला होता का? का प्रयत्नच केला नाही? प्रयत्न केलाच नसेल तर का केला नाही? त्यात काय अडचणी होत्या? का प्रयत्न केला होता, पण अंगाशी आला म्हणून नाद सोडला? असा प्रयत्न अयशस्वी झालाच असेल, तर त्यामागची कारण शोधायचा प्रयत्न केला का? शैक्षणिक दृष्टिकोनातून बालरंगभूमीचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न केला होता का?

सुधा करमरकर म्हणतात, 'लिट्ल थिएटर' नं मागं 'राजा शिवछत्रपती' नावाचं नाटक केलं होतं. नाटक चागलं चाललं होतं. पण ऐतिहासिक नाटकांच्या बाबतीतही महत्त्वाची अडचण म्हणजे या ऐतिहासिक भूमिका. ज्या व्यक्तिरेखांच्या चौकटी आपल्या मनात ठसलेल्या आहेत, त्या साकार करायला तितक्या योग्य व्यक्ती मिळण अवघड आहे. आज प्रौढ रंगभूमीला सुद्धा जिथं या गोष्टींची चणचण भासते तिथ बालरगभूमीच काय होत असेल? शिवाय या नाटकामधलं पोशाखीपण, भव्य नेपथ्य यामुळही ऐतिहासिक नाटक म्हणजे बालरगभूमीच्या बाबतीत तरी नाकापेक्षा मोती जड अशी अवस्था आहे. याशिवाय मुलाना 'राजा शिवछत्रपती' आणि 'अल्लाऊद्दीन आणि जादूचा दिवा' या दोन नाटकांपैकी एकाची निवड करायला सांगितल तर ती निश्चित 'अल्लाउद्दीन आणि जादूचा दिवा' हे नाटक निवडतील. 'राजा शिवछत्रपती' चित्रपट चालला होता. कारण एक तर या चित्रपटाला सरकारचं पाठबळ होतं. शाळाशाळातून हा चित्रपट दाखवला गेला होता. अस काही धोरण बालरगभूमीच्या बाबतीत आहे का? त्यामुळं बालरंगभूमीला आपोआपच मर्यादा पडतात.

### डोळसपणा हवा

पौराणिक विषय म्हणजे आपल्याकडं मुबलक प्रमाणावर उपलब्ध असलेलं संत वाङमय किंवा रामायण—महाभारत याच्यासारखं साहित्य. पण मुळात इथंच माझं मत अगदी विरुद्ध आहे. कारण संताची चरित्र घेतली तर प्रत्येक संताच चरित्र हे चमत्कृतीनं भरलेलं आहे आणि या चमत्कृतीच समर्थन करणं अशक्य आहे. आताची पिढी ही बुद्धीनिष्ठ, विज्ञाननिष्ठ आहे. केवळ तुम्ही आम्ही सागतो म्हणून विश्वास ठेवण्यातली नाही. त्यामुळं या सतांच्या चरित्राबद्दल/जीवनपद्धतीबद्दल मुलाच्या मनात निर्माण होणाऱ्या शंकाचं आपण नीरसन करू शकत नाही. मग मुलाना दाखवायच तरी कशाला? त्यामुळं मला असं वाटत की, मुलांना असं काही दाखवण म्हणजे त्याचा बुद्धीभेद करण्यासारखं आहे म्हणून 'लिट्ल थिएटर' न हा विषय टाळलाच आहे. वैज्ञानिक विषयांकडेही 'लिट्ल थिएटर' आतापर्यंत वळलेलं नाही. कारण एकच या नाटकांना कितपत पाठिंबा मिळेल या शकेनं. पूर्वी नानासाहेब शिरगोपीकरानी 'परीक्षेपूर्वीच्या सात रात्री' चे प्रयोग करून बालरंगभूमीचा शैक्षणिक दृष्टिकोनातून उपयोग करून घेतला होता. त्यांना जर हे प्रयोग पुन्हा करावयाचे असतील तर मदत करायची माझी तयारी आहे.'

'नानासाहेब शिरगोपिकराची 'परिक्षेपूर्वीच्या सात रात्री' ही कल्पना निश्चितच चांगली आहे' मतकरी म्हणतात, 'पण मुलांना आपल्याला नक्की काय द्यायचं आहे, ते आधी निश्चित करायला हवंय त्यामुळं माझ्या मते मुलांना अशा प्रकारचं शिक्षण देण्यासाठी बालरगभूमीचा उपयोग करून घेण्यापेक्षा त्यांना आयुष्याकडे अधिक डोळसपणे बघायला शिकवायला हवं. सामाजिक जाणीवा आतापासून त्याच्या मनात निर्माण करायला हव्यात. जगाविषयीच्या भ्रामक, फसव्या कल्पना निर्माण न करता खऱ्याखुऱ्या जगाची, सत्य परिस्थितीची कल्पना द्यायला हवी. या गोष्टींची मुलांना अधिक गरज आहे, आणि या गोष्टी बालरंगभूमीच्या माध्यमातून त्याच्यापर्यंत पोचवण अधिक सुलभ होऊ शकतं. याचा अर्थ असा नाही की, शरीररचना, अवयवांचं कार्य वगैरे समजावून द्यायची मुलांना गरज नाही. निश्चित आहे. पण हा नाटकाचा विषय नाही आणि एकंदरीतच या विषयाची मागणी पाहता हा फिल्मचा विषय वाटतो. कारण रगभूमीच्या मर्यादा साभाळताना या विषयाला कितपत न्याय मिळू शकेल, त्याची शका वाटते. मी स्वतः ही नाटक पाहिलेली नाहीत. पण नानासाहेब शिरगोपीकरानी मुलाखतीत जे सागितलं किंवा इतरांकडून जे ऐकलं, त्यावरून मला ते फारच अवजड वाटत. crude वाटतं. मी मगाशी जो उल्लेख केला की, बालरंगभूमी ही इलॅस्टिक असली पाहिजे, तो इथं या बाबतीत सफल होणार नाही. शिवाय अशा प्रकारचं शिक्षण द्यायला शाळा पुरेशा आहेत. त्यामुळं बालरंगभूमीनं अशा प्रकारच कार्य हाती घेण्याची गरज आहे, असं मला तरी वाटत नाही.

### कुमारांचं काय?

दुसरा मुद्दा वैज्ञानिक बालनाटकाचा. वैज्ञानिक बालनाटक सादर करण ही इतकी साधी गोष्ट नाही. यामध्ये विषयांपेक्षाही तांत्रिक अडचणी जास्त येतात. कारण

# राजहंस प्रकाशन सूची

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत रुपये |
|---|---|---|---|
| १ | टॉलस्टॉय–एक माणूस (आवृत्ती संपली) | सुमती देवस्थळे | ५५/ |
| २ | योद्धा शेतकरी | विजय परुळकर | ३६/ |
| ३ | आंबेडकर भारत | बाबुराव बागुल | २०/ |
| ४ | लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २०/ |
| ५ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा (आ. सं.) | अशोक परळीकर | १२/ |
| ६ | सांगत्ये ऐका | हंसा वाडकर | १४/ |
| ७ | शतपावली | रवींद्र पिंगे | १६/ |
| ८ | डॉ. आयडा स्कडर | सौ. वीणा गवाणकर | २२/ |
| ९ | एक होता कार्व्हर | सौ. वीणा गवाणकर | ३०/ |
| १० | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | २५/ |
| ११ | बलसागर | श्री. ग. माजगावकर | ३०/ |
| १२ | निर्माणपर्व | श्री. ग. माजगावकर | ४०/ |
| १३ | टच् | अशोक प्रभाकर डांगे | १०/ |
| १४ | सबला | माधव शिरवळकर | १२/ |
| १५ | रूपवती भार्या शत्रुः ! | अॅड. माधव कानिटकर | २५/ |
| १६ | R डॉक्युमेंट | अशोक जैन | १०/ |
| १७ | काही दिवस श्यामचे – काही राधाचे | फिरोझ रानडे | २५/ |
| १८ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | १४०/ |
| १९ | मला निसटलंच पाहिजे ! | श्रीकांत लागू | २०/ |
| २० | पूर्णिया | अनिल अवचट | १२/ |
| २१ | लेक वालेसा | डॉ. श्रीकांत सुंदरगी | २२/ |
| २२ | आपली मुलं | शोभा भागवत | २०/ |
| २३ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | २२/ |
| २४ | विज्ञानेश्वरी | डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर | २०/ |
| २५ | तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय | डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर | २०/ |
| २६ | तीर्थरूप आक्का | शारदाबाई आपटे | ५/ |
| २७ | गुजरातेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | १५/ |
| २८ | अब्राहम लिंकन–फाळणी टाळणारा महापुरुष | वि. ग. कानिटकर | १५०/ |
| २९ | निलगिरीची शेती | विनायक पाटील | १५/ |
| ३० | सहा साहसे | दा. सी. देसाई | १६/ |
| ३१ | मानसकन्या | प्रा. मनोहर राईलकर | २०/ |
| ३२ | पूर्णत्वाचे प्रवासी | प्रा. शरद कुलकर्णी | ५०/ |
| ३३ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | १२/ |
| ३४ | कुंपण आणि आकाश | मंगला गोडबोले | २०/ |
| ३५ | चार्ल्स डार्विन व्यक्ती, कृती आणि उत्क्रांती | भा. रा. बापट | ३२/ |

**। राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ । पुणे-३० ।**

विज्ञानकथांची मुख्य मागणी असते ती तांत्रिक नेपथ्याची, सेटस् कन्व्हिन्सिंग पाहिजेत. पूर्ण काळोख (पीच ब्लॅक) रंगभूमीवर करता आला पाहिजे. परदेशात विज्ञानकथा होत असतील. कारण त्याच्याकडे कितीतरी तांत्रिक सोयी उपलब्ध आहेत प्रगत विज्ञानाचा उपयोग करून घेतला जातो आहे स्टेज केवढी मोठी मोठी आहेत. पण आपल्याकडे अशी स्टेज नाहीत. आपल्या स्टेजची उंची कमी पडते. पूर्ण काळोख होत नाही. प्रोजेक्टर वापरू शकत नाही. अंतर कमी आहे... एक ना दोन अनेक अडचणी डोळ्यासमोर आहेत. साहजिकच विज्ञानकथा सादर करण्यास पूरक असं वातावरण नाहीय. तरीही या तांत्रिक करामतीवर मात करून विज्ञाननाट्य सादर करायचं ठरवलंय. बघू या योजनेचं काय होत ते!'

बालरंगभूमीवर होणाऱ्या आरोपांची मालिका इथवरच संपत नाही. आणखी एक आरोप म्हणजे बालरंगभूमीनं केलेली कुमारवयीन प्रेक्षकाची उपेक्षा. आपल्याकडं बालरंगभूमीचं वय हे सात ते बारा वयापर्यंतच मर्यादित झालय. परदेशात जशी कुमारवयीन प्रेक्षकवर्गाची जाणीवपूर्वक दखल घेतली जाते, आणि त्यांच्या या वयातील वाढत्या बुद्धीची भूक भागवण्यासाठी उपयुक्त अशा योजना, कार्यक्रम हाती घेतले जातात, त्या पार्श्वभूमीवर आपल्याकडचा कुमारवयीन प्रेक्षकवर्ग फारच उपेक्षित आहे आणि हा कुमारवयीन प्रेक्षकवर्ग चित्रपट, नाटक, साहित्य अशा सगळ्याच ठिकाणी उपेक्षित आहे. परिणामी तो वयाच्या पुढं धावण्याचा प्रयत्न करतोय. यावर टीका होते आहे त्यामुळं या प्रेक्षकवर्गानं काय बघू नये याबद्दल भले मोठे उपदेश केले जात आहेत, पण काय बघावं यासाठी काही ठोस हाती ठेवलं जात नाहीय. तेव्हा बालवयापासून मुलांशी संबधित असलेल्या बालरंगभूमीनं कुमारवयीन प्रेक्षकवर्गासाठी काही करावं अशी अपेक्षा धरली तर ती चुकीची ठरू नये. करमरकर आणि मतकरी यानाही ते मान्य आहे. पण यात बालरंगभूमीच थोडीशी अडचणीत आहे त्याच्या मते, 'ही मुलं अशा अडनिड्या वयोगटात असतात की, धड ती लहान मुलांच्यात जमा होत नाहीत की धड प्रौढात मोडत नाहीत. त्यांना स्वत:ला बाल म्हणवून घ्यायला आवडत नाही. त्यामुळं बालनाटकांना जाणं वगैरे गोष्टी ते कटाक्षानं टाळतात. त्यामुळं कुमारवयीन मुलांसाठी फारसे प्रयत्न झाले नाहीत.' 'बालनाट्य' तर्फे 'दी गोल्डन गँग' आणि 'लिटल थिएटर'चं नुकतंच आलेलं 'काही वर्षं हरवली आहेत' ही नाटकं मात्र कुमारवयीन प्रेक्षक वर्ग डोळ्यासमोर ठेवून सादर केली गेली.

## नाट्यगृहाबाहेर......

प्रयोगांसाठी थिएटर मिळण हा एक प्रौढ आणि बालरंगभूमीवरील अक्षरश: डोकेदुखीचा विषय. त्यातल्या त्यात बालरंगभूमीचा तर जास्तच. कारण एक तर बालनाट्यांच्या निर्मितीत झालेली वाढ आणि बालनाट्यांचा ठराविक मोसम म्हणजे दिवाळी आणि उन्हाळी सुट्या. साहजिकच या मोसमात बालनाट्यामध्ये खरी स्पर्धा असते. तसेच बालनाटकासाठी थिएटरच्या भाड्यात सवलतही मिळत नाही. म्हणजे एके काळी सवलत मिळत असे; पण तीही आता मिळत नाही. त्यामुळं बालनाटकांच्या निर्मितीचा खर्च, नाट्यगृहाचं भाडं वगैरे तारेवरच्या कसरतीतून पार पडण्यासाठी बालनाटकाच्या तिकिटाचा दर पाच रुपयाच्या खाली ठेवणं परवडतच नाही. त्यामुळच बालरंगभूमीच्या मर्यादा अजून वाढल्या. कारण अलीअलीकडं पालक आपल्या मुलाना बालनाटक आवर्जून दाखवत असल्यानं बालरंगभूमीला प्रेक्षकाची वाण नाहीय; पण बालनाटकाच्या तिकिटाच्या दरामुळं ही नाटकं मध्यमवर्ग किंवा उच्च मध्यमवर्ग यांच्यापुरतीच मर्यादित झालेली दिसतात.

'बालरंगभूमीच्या या मर्यादा कमी करण्यासाठी दोन-तीन उपाय होते. एक म्हणजे शाळाशाळातून प्रयोग करणं.' सुधा करमरकर म्हणाल्या, 'पण त्यात अडचण होती ती आमच्या नेपथ्याची. कारण शाळातील रंगमंच अपुरे पडतात. नाटक नीट उभं करता येत नाही. आता यावर तोडगा म्हणून आमच्या काही नाटकांमध्ये बदल घडवून ती शाळातून सादर करण्याच्या दृष्टीनं योग्य अशी करून घेतली आहेत आणि शाळाशाळातून आतापर्यंत अनेक प्रयोगही आम्ही सादर केले आहेत. दुसरा उपाय म्हणजे प्रत्येक नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी सुमारे १५०-२०० जागा आम्ही अनाथाश्रम, रिमांड होम्स अशा मुलांसाठी राखून ठेवतो. बालरंगभूमीचं एकंदरीत अर्थकारण लक्षात घेता हे बऱ्याच वेळा आम्हाला डोईजड होतं; पण तरीही आम्ही ते करतो. झोपडपट्टीत वगैरे नाटक करण्याची कल्पना व्यक्तिश: मला मंजूर नाही. कारण या सर्व प्रकारात मुलं खऱ्या अर्थानं आनंद घेऊ शकत नाहीत किंवा मुलं आनंद घेऊ शकत नाहीत, म्हणण्यापेक्षा माझ्याकडून मुलाना जसा आणि ज्या प्रकारचा आनंद द्यायचा आहे, तो देता येत नाही असं म्हणता येईल.'

'मला असं वाटतं की, कुठल्या प्रकारचा आनंद अधिक महत्त्वाचा म्हणजे नाटक बघण्याचा का नाट्यगृहात बसण्याचा हे आधी ठरवायला पाहिजे.' रत्नाकर मतकरी म्हणतात, 'त्या दृष्टिकोनातूनच झोपडपट्टीतल्या मुलांना नाटकाला घेऊन येण्याऐवजी आम्ही नाटकच या मुलाच्यात नेलं. ही गोष्ट या मुलाच्या आणि आमच्या दोघाच्याही दृष्टीनं जास्त सोयीची आहे. या नाटकात आम्ही कमीत कमी नेपथ्य वापरलं. कारण नेपथ्य भव्य दिव्य केलं की, बालनाटकं नाटगृहाच्या बाहेर करण्यात अडचण निर्माण होते. नेपथ्य नाटकात जरूर असावं; पण तेच इतकं भव्य दिव्य असू नये की, नेपथ्य हाच नाटकाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू होऊ नये की, त्यात अतिवास्तवताही येऊ नये. 'निम्माशिम्मा राक्षस'मध्येही नदी येते असा एक प्रसंग होता. आम्ही रंगमंचावरच निळा पडदा पसरला, तेव्हा तो मुलगा (नाटकातला) म्हणतो, 'या नदीत मासे कुठं आहेत?' मग कुणी तरी येतो आणि निळ्या पडद्यावर मासे चिकटवून जातो. 'बुटबैंगण'मध्ये काठ्यांचा वापर करून नेपथ्य तयार केलं आहे. 'बुटबैंगण'-मधल्या काठ्यांचं नेपथ्य, 'अचाट गावची अफाट मावशी'मधलं 'चक्की' घर 'अलबत्या गलबत्या'तला फिरता रंगमंच असे प्रत्येक प्रयोगात सेटवाईज बदल करण्याचा आम्ही कायम प्रयत्न केला आहे. आज प्रायोगिक रंगभूमीवर नवे नवे म्हणून होत असलेले कित्येक प्रयोग आम्ही पूर्वीच केलेले आहेत. 'बुटबैंगण' हे झोपडपट्टीत नेऊन केलेलं नाटक असाच एक प्रयोग आहे आणि आतापर्यंतचा प्रतिसाद पाहता हा प्रयोग यशस्वी झाला आहे असं म्हणायला काहीच हरकत नाही. त्यामुळं बालरंगभूमीही नाट्यगृहाची चौकट सोडून बाहेर पडलीय. सर्व थरातल्या मुलापर्यंत पोचलीय. बालरंगभूमीच्या व्यापकत्वाचीच ही खूण आहे.' □

चित्रपट

## आवर्जून पहाण्यासारखा

# ' अनकही '

आपल्या भविष्यात काय आहे हे जाणून घ्यायची उत्सुकता प्रत्येकालाच असते. परंतु पुष्कळदा ही उत्सुकता केवळ उत्सुकता रहात नाही. शेकडो मैलावरून आपलं भविष्य सांगणाऱ्या ग्रह, नक्षत्राच्या माणूस आधीन होतो. त्याच्या तालावर नाचू लागतो. मग तो कितीही सुशिक्षित असला, अंधश्रद्धेवर आपला विश्वास नाही असं म्हणणारा असला तरीही आपलं भविष्य आपल्या प्रयत्नानं आणि कर्तृत्वानं घडवता येतं, ग्रह, नक्षत्र ते ठरवू शकत नाहीत याचा त्याला विसर पडतो. अशाच एका व्यक्तीची कथा 'अनकही' या अमोल पालेकर दिग्दर्शित-निर्मित चित्रपटात माडण्यात आली आहे.

देवकीनंदन चतुर्वेदी ऊर्फ नंदू ( अमोल पालेकर) हा एक इंजिनिअर. सुषमा (देविका मुखर्जी ) या तरुणीवर त्याचे प्रेम असते. त्या दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतलेला असतो. मात्र या लग्नाला नंदूचे वडील ज्योतिभास्कर चतुर्वेदी ( डॉ. श्रीराम लागू ) यांचा तीव्र विरोध असतो. कारण नंदूच्या कुंडलीत द्विभार्या योग आहे. त्याची पहिली पत्नी लग्नानंतर अकराच महिन्यात मुलाला जन्म देताना मरणार आहे हे त्याना माहीत असते. आतापर्यंत चतुर्वेदीचे एकही भविष्य खोटे ठरलेले नसते. स्वत: नंदूलाही आपल्या मित्राच्या बाबतीत याचा अनुभव आलेला असतो. त्यामुळे असल्या भविष्यावर आपला विश्वास नाही असं तो कितीही म्हणत असला तरी सुषमाशी लग्न करायला तो धजावत नाही.

सुषमाचा मात्र या सगळयावर विश्वास नसतो. भविष्याच्या भीतीनं नंदूशी लग्न न करणं तिला मान्य नसतं; पण नंदू तिचं ऐकत नाही. अशा तणावाच्या परिस्थितीतच चतुर्वेदीचे मित्र ( अनिल चतर्जी ) आपल्या थोडयाशा वेडसर मुलीला इंदूला ( दीप्ती नवल ) उपचारासाठी म्हणून त्याच्या घरी घेऊन येतात. इंदूचं लग्न झालं तर ती सुधारेल या डॉक्टरांच्या म्हणण्यामुळे तिच्याशी लग्न करून आपली समस्या सोडवायचा विचार नंदूच्या मनात येतो. सुषमा मात्र याला कबूल होत नाही. आपल्या सुखासाठी-आयुष्यासाठी एका निष्पाप मुलीचा बळी देणं तिला मान्य नसत. जो त्याग आपण करायला हवा तो इंदूनं केला तर नंदूवर हक्क सांगायचा आपल्याला अधिकार नाही असं तिला वाटत असतं.

सुषमाच्या विरोधाला न जुमानता ती गावाला गेलेली असताना नंदू इंदूशी लग्न करतो. लग्नानंतर इंदूत झपाटयानं सुधारणा होते. जेव्हा तिला दिवस जातात तेव्हा मात्र चतुर्वेदी कुटुंब सुन्न होतं. आतापर्यंत तिचा लळा त्याना लागलेला असतो. शिवाय तिचा आपण अपराध केल्याची भावनाही त्याच्या मनात असते. यामुळेच आपण तिच्याशी लग्न का केलं हे नंदू तिला सागतो; पण प्रत्यक्षात प्रसूति सुखरूप होऊन इंदू तिच्या मुलासह वाचते. याचवेळेस सुषमानं मात्र आत्महत्या केलेली असते. जीवनातल्या परिस्थितीचा मुकाबला जिद्दीनं करायला हवा. पण इतर भविष्याच्या आधीन झाल्याने माझंच जीवन मी मला हवं तसं जगू शकले नाही. नंदूशी लग्न करू शकले नाही. इंदूच्या मृत्यूनंतर मात्र अपराधी असल्याच्या भावनेनं मी नंदूशी संसार करू शकणार नाही असं तिनं मृत्युसमयी लिहिलेल्या पत्रात म्हटलेलं असतं.

'कालाय तस्मै नम:' या चि. त्र्यं. खानोलकरांच्या नाटकावरून अमोल पालेकर यांनी हा चित्रपट बेतला आहे. खानोलकरांसारख्या वेगळया लेखकाचं लिखाण दिग्दर्शनाच्या आपल्या दुसऱ्याच प्रयत्नात घेण्याचं धाडस पालेकरानी केलं आहे आणि ते त्यात यशस्वीही झाले आहेत. अंतर्मुख बनवणारे प्रसग चित्रपटात खूप आहेत. उदाहरणार्थ, नंदूच्या मित्राची पत्नी ऑपरेशनमध्ये मरणार हे भविष्य चतुर्वेदीनी आधीच वर्तवलेलं असतं. ते खरंही ठरतं. त्यानंतर हे ऑपरेशन केलेले डॉक्टर, चतुर्वेदीना विचारतात की, भविष्यात काय घडणार आहे हे तुम्ही सागू शकता, पण हे असं का या प्रश्नाचं उत्तर तुमच्याजवळ नाही. पूर्ण उत्तर माहीत नसताना माणसाच्या आयुष्याचं गणित तुम्ही का मांडता? भविष्य माहीत नसलं, तर मनुष्य उमेदीनं चांगल्यासाठी प्रयत्न तरी करतो; पण अशा प्रकारे अर्धवट भविष्य सांगून त्याच्या प्रयत्नांना खीळ घालायचा तुम्हाला काय अधिकार आहे?

सुषमानं शेवटी लिहिलेलं पत्रंही असच विचार करायला लावणारं आहे. परिस्थितीचा सामना ग्रहाच्या आधारावर नाही तर स्वतःच्या जिद्दीवर करायचा असतो हेच या पत्रातून प्रकट झालं आहे. मुळात सुषमाची व्यक्तिरेखा अतिशय चांगली आहे. ती खऱ्या अर्थानं सुशिक्षित आणि सुसंस्कृत आहे. तिला वास्तवाच भान आहे आणि भविष्यावर विश्वास नाही असं ती नंदूप्रमाणं नुसत म्हणत बसत नाही, तसं वागूनही दाखवते. खऱ्या अर्थानं ती प्रगल्भ आणि विज्ञानयुगात वावरणारी तरुणी वाटते.

तिच्यापुढं नंदूची व्यक्तिरेखा एकदम थिटी वाटते. अंधश्रद्धेवर विश्वास नाही असं म्हणता म्हणता तो त्याच्याच आधीन होतो. इंदूला फसवून त्यान तिच्याशी केलेलं लग्न आणि स्वत: सहानुभूती मिळवायचा त्याचा प्रयत्न यामुळं इंदू व सुषमा यांच्या पुढं नंदूची व्यक्तिरेखा खूप दुबळी वाटते.

दिग्दर्शक म्हणून अमोल पालेकरनं चित्र चांगलं घेतल आहे. त्याच्या हाताळणीमुळं चित्रपट बाधीव झाला आहे. दिग्दर्शकाची पकड चित्रावर पूर्ण जाणवते. खानोलकरांच्या नाटकाचा मूळ गाभा त्यानं चित्रपटात कायम ठेवला आहे. सेन्सॉरवरच्या भाष्यातूनही अमोल पालेकर दिसतो.

इंदूच्या भूमिकेसाठी दिग्दर्शकापुढे दीप्ती नवलला पर्यायच नसणार. या भूमिकेसाठी आवश्यक असा निरागस, बोलका चेहरा आणि अभिनय या दोन्ही गोष्टी आज फक्त दीप्तीजवळच आहेत. सुरुवातीची काहीशी वेडसर नंतर हळूहळू सुधारणा झालेली, नंदूनं आपल्याशी लग्न का केलं हे कळूनही विलक्षण समंजसपणा दाखवणारी इंदू तिनं सुरेख रंगवली आहे तिच्या कारकिर्दीतली ही एक महत्वाची भूमिका ठरावी सुषमाचं काम नवतारका देविका मुखर्जीनं केलं आहे. चतुर्वेदी पती-पत्नीच्या भूमिकेत श्रीराम लागू व दीना पाठक व नंदूच्या वडिलाच्या भूमिकेत अनिल चतर्जी शोभतात. नंदूचं काम स्वत: अमोल पालेकरनं केलं आहे. त्यानं काम चांगलं केलं असलं तरी तो वयानं या भूमिकेला बराच मोठा वाटतो.

चित्रपटाला जयदेवनी सुश्राव्य संगीत दिलं आहे. या संगितासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला ते योग्यच आहे. तीच गोष्ट पं. भीमसेन जोशींची. या चित्रपटातील त्यांची दोन्ही गाणी सुरेख जमली आहेत. विशेषत: 'हरि आओ' हे गाणं गायन व चित्रिकरण दोन्हीच्या दृष्टीनं अप्रतिम आहे. चित्रपटातील आणखी एक उल्लेखनीय बात म्हणजे देबू देवधराचं छायाचित्रण. प्रसन्न अशा त्याच्या छायाचित्रणामुळे चित्रपटाला वेगळाच उठाव मिळाला आहे.

अगदी निराळा विषय प्रामाणिकपणे माडणारा आणि आधुनिक दृष्टिकोन देणारा चित्रपट म्हणून अनकही आवर्जून पहाण्यासारखा आहे.

—सीमा कुलकर्णी

---

विज्ञान

---

## चित्त्यांचे पुनरूज्जीवन

आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच १९४८ मध्ये मध्य प्रदेशातील करवई जगलातील एकुलत्या एक चित्त्याला कोणा शिकाऱ्याने गोळी घालून भारतातील चित्ते संपवून टाकले. आता भारतात एकही चित्ता शिल्लक नाही. क्वचित एखाद्या प्राणी–संग्रहालयात असला तर गोष्ट वेगळी. काही राजे, सरदाराच्याकडे पेंढा भरलेले चित्ते असतीलही. पण आज भारतीय जगलात नैसर्गिक अवस्थेतील एकही चित्ता नाही.

भारतीय जगलात ३६ वर्षानंतर पुन्हा चित्ते आणण्याचा केंद्र सरकार प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश व राजस्थानच्या राज्य सरकाराकडे विचारणा केली आहे. या पाच राज्यात पूर्वी चित्ते होते व तेथील जगले, कुरणे, हवा, पाणी चित्त्याच्या वस्तीला योग्य ठरण्याची फार शक्यता आहे, असे केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांना वाटते. अर्थात त्या त्या सरकारनी अनुमती देऊन ती जबाबदारी उचलायची आहे. या नव्या वन्य पाहुण्यासाठी कोणती सोय ही राज्ये करू इच्छितात/शकतात हे पाहून केंद्रीय वन्यजीवन विभाग राज्याची निवड करतील.

चित्ते मिळविण्यासाठी वन्यजीवन विभाग दोन मार्गानी प्रयत्न करीत आहे. त्यापैकी एका मार्गाला जवळपास यश आले आहे गेल्या उन्हाळ्यात कान्हा येथे भरलेल्या 'मार्जार मंडळात' (Cat Conference) केनिया सरकारने भारताच्या विनंतीला मान देऊन चित्त्याच्या दोन जोड्या देण्याचे मान्य केले आहे. अर्थात उत्तर आफ्रिकेतील ही चित्त्याची जात भारतातून नष्ट झालेल्या आशियाई चित्त्यांहून वेगळी आहे.

भारतातच नव्हे तर आशियातील बहुतेक देशांतून चित्ते नाहीसे झाले आहेत. उघडी कुरणे, गायराने हीच चित्त्याची निवासस्थाने असतात. लोकसख्या वाढली तशी कुरणे व गवताळ जमिनी माणसानी शेतीखाली आणल्या. स्वाभाविकच हरणे, भेकर इ. गवत खाणारे प्राणी व त्याची शिकार करून जगणारे चित्ते हळूहळू कमी होतच होते. त्यात माणसाने अनेक चित्ते शिकारीच्या छदापायी मारून टाकले. आता आशियाई चित्ते फक्त इराणमध्ये राहिले आहेत. दक्षिण भारताचे पठार, मध्य भारत; गुजरात, राजस्थान, सिंध बलुचिस्तान, इराक, इराण, इस्राएल, रशिया तुर्कस्तान या सर्व देशात मोठ्या सख्येने असलेले आशियाई चित्ते आता फक्त इराणमध्येच शिल्लक आहेत. आपले सरकार केनियाप्रमाणेच इराणकडून काही (आशियाई) चित्ते मिळविण्याच्या प्रयत्नात आहे. त्या प्रयत्नांना यश येईल असा अदाज आहे कारण चित्त्यांच्या मोबदल्यात भारताने इराणला (आशियाई) सिंह देण्याची तयारी दर्शविली आहे. भारतातून चित्ते नाहीसे झाले त्याचप्रमाणे इराणमधून सिंह नाहीसे झालेले आहेत. अर्थात इराणकडून चित्ते मिळाले तर त्याची सोय वरील आफ्रिकन चित्त्यांपासून खूप दूरच्या जगलात केली जाईल. दोन्ही ठिकाणी चित्त्यांची 'लागवड' यशस्वी होऊन भारतात विपुल चित्ते निर्माण व्हायला ३०/४० वर्षे सहज लागतील!

## वृक्ष–वर्धापन दिन

'माणसांना जर नववर्षदिन असतो तर आम्हालाच तसा का नसावा?' अशी एकदा सर्व वृक्षांनी मिळून परमेश्वराकडे तक्रार केली. वृक्षाची मागणी योग्य आहे असे जाणून परमेश्वराने वृक्षाना उलट विचारले, 'मग तुमचा वर्षारभ केव्हा हवा? त्यावर वृक्षांनी विचार केला. आपल्या देशात (इस्रायल) शेवात महिन्यात पाऊस पडतो आणि झाडाची वाढ होऊ लागते. तेव्हा वृक्ष-दिन त्या महिन्यातच मागावा; पण महिन्याचा पहिला दिवस, कोणत्याही महिन्याचा पहिला दिवस–हा या ना त्या निमित्ताने काहीसा वैशिष्टयपूर्ण असतोच. म्हणून तो न मानता शेवात महिन्याचा मधला म्हणजे १५ वा दिवस वृक्षानी आपला वर्षारंभ दिवस म्हणून मागून घेतला अशी ज्यू पुराणकथा आहे. प्राचीन काळापासून ज्यू लोक हा दिवस सण म्हणून साजरा करतात. या दिवशी सार्वत्रिक सुट्टी असते १६ व्या शतकापासून या सणाला फळे खाण्याची पद्धत पडली आहे. त्यावेळी इस्त्रायल हे राष्ट्र अस्तित्वात नव्हते व ज्यू लोक परागंदा अवस्थेत होते. परक्याच्या ताब्यात असलेल्या स्वराष्ट्राची आठवण म्हणून जगभर विखुरलेले ज्यू त्या दिवशी इरेट्झ वृक्षाची फळे आवर्जून खात असत. कारण इरेट्झ हा खास इस्राएलच्या भूमीतील वृक्ष आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर इस्त्राएल राष्ट्र निर्माण झाले आणि टु शेवात–'वृक्ष–दिन' या सणाला अगदी वेगळे महत्व प्राप्त झाले. कट्टर राष्ट्रप्रेमी ज्यू नेत्यांनी वृक्षदिनाला नवनिर्मितीचा सण बनवले. वाळवटी प्रदेशात वृक्षांइतके महत्वाच दुसरे काहीच नसते. वृक्ष–दिनाला प्रत्येकाने एकतरी रोप लावावे असा सकेत आहे. आपल्याकडे राखी पौर्णिमेपूर्वी ५–६ दिवस सर्व दुकानांतून राख्या विकायला ठेवतात किंवा संक्रातीआधी तिळगूळ व भेटकार्डे याची खास छोटी दुकाने लागतात तशी इस्त्राएलमध्ये टु. शेवात पूर्वी जिकडेतिकडे निरनिराळ्या रोपांची आणि बी–बियाणांची छोटी छोटी दुकाने लागतात. मुले व मोठी माणसेही अहमहमिकेने बिया पेरतात आणि रोपे लावतात. वृक्ष–दिनाच्या दिवशी रोपांच्या मिरवणुका–दिंड्या–काढतात आणि समारंभाने ती लावतात. त्या दिवशी सर्वजण घरात न जेवता वनभोजन करतात.

वृक्षांचे महत्व ओळखणारे इस्त्राएल राष्ट्र वाळवटी जमीन आणि अत्यंत कमी पाऊस असूनसुद्धा प्रचड शेतीमाल निर्माण करून फळे, फुले व धान्य निर्यात करण्यात अग्रगण्य झाले आहे. उलट वृक्षाचे महत्व न कळल्यामुळे भरमसाट जगलतोड करणाऱ्या भारतात सुपीक जमिनीचे मरुभूमित रुपांतर होत आहे!

—भा. रा. बापट

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28

# धगधगत्या गुजरातमध्ये एक आठवडा

–अविनाश धर्माधिकारी

बाबुभाई पटेल, चिमणभाई पटेल, सनत मेहता आणि अनेक नेते,
विद्यार्थी, पत्रकार यांच्या भेटीगाठी, दंगलग्रस्त भागातून प्रत्यक्ष फेरफटका,
'गुजरात समाचार'चे जळित प्रकरण, राखीव जागा विरोधी आंदोलन
आणि त्यातून उद्भवलेल्या दंगली, पोलिसी अत्याचार,
लष्कराच्या ताब्यातील बडोदा–अहमदाबाद...

**दैनंदिनी स्वरूपात....**

**पुढील अंकात....**

